सावध

कविता

-- चं. प्र. देशपांडे.



सावध

तसे तर मनाच्या हालचाली
फक्त एकच गल्ली माहीत
तिथूनच मंडईकडे
आणि मग भाजी घेणाऱ्या
वाढत्या वयाकडे

याचा ना उपयोग माहीत
ना याच्या वंशजांचे
मनोरे पाहिलेले

कंटाळून स्वप्न पाहतानाही
तीच हरवलेली प्रेयसी
खुणावते सुऱ्याने
तेव्हा वाटते

हे असे किती चालणार
आपल्या ऑफिसातले फर्निचर
उदास दिसते हल्ली

हे आपल्या पार्टीची सत्ता गेल्यामुळे
की आपणच होत चाललोय
सावध असण्यापासून दूर दूर
--- ००० ---

चतुर

गवतात उडणारे चतुर किडे
मरेपर्यंत चतुरच असतात
कारण असो की नसो
विचार थांबतच नाहीत

रोषणाईत डुंबलेलेच
देतात संदेश की नका करू
कारणाशिवाय विचार
क्षीण व्हाल वेडे व्हाल मराल

त्यापेक्षा चतुर व्हा डाव टाका
स्वतःवरच आणि मंत्रोच्चार करत
आवाजांच्या भिंतींनी
सेवन करा गुंगी

विचार थांबवल्याने काय होईल
याच्या भीतीच्या आवाजांनी
दंगली पेटवा कृतिशील व्हा
सज्जन राहा पण शूर व्हा

हार पत्करायचा विचार
मान्य करा आणि मनाला
शरण जा मनानेच
हाडांची काडे करत
--- ००० ---

जबाबदारी

आपले आयुष्य ही आपलीच जबाबदारी
समजून आपण पाहतो थोडा निसर्ग
थोडा उद्योगधंदा थोडे रुसवेफुगवे
आणि भांडणे आणि थोडी प्रेमाची उत्तेजने

भातापेक्षा जिरा राईस चांगला
बीपी आणि डायबेटिसला
म्हणून आपण प्रचार करतो
इतरांची काळजी घेणे
हे आपलेच जगणे समजून

जग आपलेच समजून
आपण त्याला शिव्या घालतो
सत्याची चाड नसल्याबद्दल
आणि कृतज्ञतेच्या अभावाबद्दल

जग हे आपल्या आत असते की बाहेर
हे आपण विचारतच नाही प्रेमामुळे

आपण मात्र आपल्या आतच आहोत
ही आपली खात्रीच असते निःशंक

जबाबदारी म्हटल्यावर इतरांप्रमाणेच
स्वतःलाही थोडेफार माफ करावे लागणारच
--- ००० ---

खूप काही राहिलेय

मन असल्याशिवाय वाटू नाही शकत
की खूप काही राहिलेय लग्नातल्या फेट्यांची
विल्हेवाट लावण्यापासून घरातल्या
टॉमीला लस टोचून आणण्यापर्यंत

काही गैरसमज तर होणारच आहेत
आणि आधारकार्डात करून घ्यायची दुरुस्ती
महत्त्वाची असूनही मागे पडणार आहे

डिहायड्रेशनचे एक लागलेय लफडे मागे
सारखे पाणी प्या आणि जा लघवीला

निसर्ग म्हणजे शत्रू वाटणे ही तर एक सनातन समस्या
--- ००० ---

**ऊन**

तुम्हाला सावल्या नसतील दिसत
तर तुम्ही ऊन पाहता हे खोटे आहे

दुःख असते अनेक हव्याशा भावनांच्या
पार्श्वभूमीवर ठळक हे कळलेच पाहिजे

आपण आहोत हेही असते आपण
नसण्याच्या पार्श्वभूमीवर हेही दिसायला हवे

आणि नसणे हे असण्यासारखे कसे असेल
हा प्रश्नही असायलाच हवा जिवंत असण्यात
--- ००० ---

ही कविता

ना दुःख आठवणारी
ना सुख गिरवणारी
ना बियरबारच्या अंधुक प्रकाशात
चवीचवीने उदासी पिणारी
ना जग सतत आपल्या विरुद्ध
असल्याच्या सत्यात
उपरोधाने जहाल झालेली किंवा
जिला सतत बाळगावा लागतो अभिमान
सहिष्णुतेचा आणि माघारीचा अशी
किंवा जिच्या अंगावर उमटत राहते पुरळ
प्रत्येक घटनेच्या ॲलर्जीचे अशी

ही कविता आहे करणारी
निवांत
प्रत्येक घटनेला रंग देणाऱ्या
अव्याहत यंत्रणेचा
पायाच अचानक उखडून
बाजूला होणारी
--- ००० ---

आपण सर्वस्वाने प्रवाही झालो
तर कोणतीच घटना घडू नाही शकणार
हा विचार आल्यापासून मनात आपण एक
प्रचंड खडक आहोत असे वाटत राहिले
सामाजिक राजकीय स्थानिक जागतिक
आणि व्यक्तिगत खूप काही घडत राहिले
खडकाच्या आतला लाव्हाही गोठत गोठत
आणि स्वतः बाहेरून आतल्या दिशेने झिजत झिजत

--- ००० ---

सायकलमध्ये हवा भरायचा पंप

गंगू दादा हे पिक्चरचे नावही कधी ऐकले नव्हते
त्यातले ये मेहकी मेहकी रातें ये चाँद सितारे
हे गाणे कसे काय आठवले झोपेत
जगण्यात खरे तर तसे काहीच नसताना
आणि पत्नीबरोबर आलोय कुठल्यातरी लांबच्या प्रवासातून
तर बरोबर फक्त दोन पांढऱ्या पिशव्या आणि एक प्रवासी बॅग
तेही सगळे बरेचसे रिकामे आणि मी असले काही
आयुष्यात कधीच वापरलेले नसताना आणि हे काय
सायकलमध्ये हवा भरायचा पंप – कशाला
मी कधीच सायकल वापरलेली नसताना --
हे गेल्या जन्मातले तर नसेल त्या वेळी माझा
मर्डर झाल्याने आता आठवत असलेले पण साले
त्या वेळी तरी माझा मर्डर व्हावा असे काही
करू शकलो असेन का मी बंडल वाटतेय सगळेच

आता येतोय आपला स्टॉप म्हणून उतरण्यासाठी बसमधून
उठतोय तर हे असले सगळे सूर्योदय होण्यापूर्वीच्या प्रकाशात

ते काहीही असो च्यायला पण गाणे भारी आहे
कुणी नर्तकी आपल्यासाठी गातेय

च्युत्या असे घडायला श्रीमंती किती लागते गडगंज
समजतेय का काही पिढीजात लागते

तरी च्यायला तो सायकलमध्ये हवा भरायचा पंप
खटकतच राहतोय संबंधच नाहीय खरे तर काही
--- ००० ---

लिफ्ट

आमची लिफ्ट सुरू झाली
की बासरी सुरू होते
अजि म्या ब्रम्ह पाहिले
जरी कोव्हिडमुळे गेले काही महिने
ते पाहायचे ऐकायचे राहून गेलेय

आनंद व्हायला अगदी मला
ब्रम्हच लागते असे काही नाही
काही किमीच्या अंतरावरून
नुसता निरोप जरी आला
की स्वप्ने जागी आहेत
तरी माझ्या मनाचे कण न कण
म्हणतात गाणे चल्ली चल्ली
रे पतंग मेरी चल्ली रे

आणि या विश्वासातच
घडत राहतात तिकडेही घडामोडी
वस्त्रांवरचे रंग झुळुकींवर सोडत
निश्चितपणे अनियंत्रित साळसूदपणे

आठवणी थांबलेल्याच असतात सतत
पुन्हा पुन्हा सचेत व्हायला
त्यांचा तजेलदार अंधारच तर
जगवतो अमर्याद खाजगी अवकाश
--- ००० ---

बालपण

आकर्षणांची आतषबाजी
बाहेरून कुठून नाही येत
ती मीच घडवतो
आणि माझ्याच रंगीत चिंध्यांत
सेक्सी होत विसरून जातो
सर्व मार्ग कुंठित होण्याचे धोके

हे पाहिले गेलेले असूनही
की जगातल्या इतर कोणत्याही
शरीरमनाप्रमाणेच
हे मी माझे म्हटलेलेही
परकेच आहे आणि निरर्थकच आहे
याला मजा वाटणे न वाटणे तितकेच

आकर्षणांच्या उष्ण ठिणग्या
जेव्हा दिपवतात विचाराला
तेव्हा बालपणातले प्रसंग
पुन्हा हावी होतात वर्तमानावर ठाम होत

आणि दृष्टिपथात येते पुन्हा ठामपणे
तीच यशस्वी होण्याची भीती
माहीत असल्याने बालपणातले धोके
--- ००० ---

नाजूक

नाजुकता आपली व्हावी
म्हणून करायचे काहीच नसते
नाजूक असायचे असते
भीती नसते
तेव्हा नाजूक असणे असते
--- ००० ---

जवळपास इकडे तिकडे कुठेतरी
तिच्या असण्याने आपण सुखावत असतो
हे तिला माहीत असते
आणि आपण सुखावत असतो
एवढे पुरेसे असते
निरर्थक जगण्याला
अर्थ आहे असे म्हणायला
समजूनउमजून
त्यातला खोटा खरेपणा
--- ००० ---

आवाज आणि ट्रेन आणि माकड

आवाजांच्या दुनियेत
उगवली एक पॅसेंजर ट्रेन
तिच्या मागच्या टोकाशी
होता एक भास एका माकडाचा
-- ते ढकलत होते
की ओढले जात होते
ते आवाजांना कळत नव्हते
पण आवाज तरी
कसला कसला विचार करणार
हीही एक समस्या होतीच –
--- ००० ---

संस्कृती

प्रत्येक गोष्टीला
वेळेच्या मर्यादा असत आधुनिकतेमुळे
मग मातृप्रेमाच्या भावना
पूर्ण खर्च न होता राहून जात
प्रेयसीला बऱ्याचदा वेळ नसे
मग त्याही भावनांचा
निचरा होणे राहून जाई
मग अशा वेळी राहिलेल्या
सर्व भावनांच्या तो कविता लिही
आणि एकदा सुरू केल्यावर
त्या त्या भावना आणखी आणखी
निर्माण होत मस्त खर्च होत राहात
कधी रोमांच तर कधी पाणावलेले डोळे
यांना वाचकांचे भरघोस प्रतिसाद येत
त्यांच्याही भावनांना वाट हवीच असे
आणि भावना निर्माण होताना
जरा माफक दुःख का असे ना
सुटे वाटे हलके वाटे सहृदय वाटे

स्त्री-वाचक तर अधिकच
सहृदय म्हणून प्रसिद्ध असल्याने
आणि रडण्याचे कल्चर त्यांनीच जोपासावे
ही परंपरा त्यांना मान्य असल्याने
त्या तर फार खुश असत
मुळातच सुंदर देखण्या असूनही
अधिकच मेकप करून त्या
जरा मादकच होऊन येत

त्याच्या कवितांचा एकूण माहोलच
आकर्षक सुंदर आणि मनमुराद
असतो म्हणूनही बरेचजण जमा होत
आणि तरीही त्यांचेही डोळे पाणावत

त्याला अधिक मोठ्या भूमिकाही
मधून मधून सुचत आणि कळवळा
दाटून येई माणसामाणसांतले संघर्ष पाहून

मग तो सरळ माणुसकीच्या कविता लिही
माणसा माणसा माणूस हो
हे त्याचे घोषवाक्यच होते

त्याला खूप निमंत्रणे येत
चित्रपटगीतेही लिहायला येत
कुठेही लिहा भावना खऱ्याच असतात ना
पैशासाठी लिहितोय म्हणून
लोकांच्या मनांना हवेसे
मालिश करून देतोय म्हणून
भावनालाघव खोटे कसे असेल

नेहमीच्या परिचित सर्वमान्य
नैतिक नैष्ठिक भ्रष्टाचारमुक्त
ईव्हीएम हॅक न करता जिंकणाऱ्या
अशा कवितांनी
सांस्कृतिक सांस्कृतिक होत राही सगळे
सगळे निघून गेल्यावरही सभागृह बराच वेळ
गोड सुगंधित आणि मृदूच राही मग्नपणे दरवळत
--- ००० ---

स्वर्ग

आपल्यासाठी आपला स्वर्ग
निर्माण करायचे आपले कधी ठरले
ते कळलेच नाही
आकर्षणाच्या पायघड्यांवरून
संकोचाचे माप ओलांडून
आपण एकमेकांच्या मनांत प्रवेश केला
आणि आले आपल्या लक्षात
झालाच आहे की स्वर्ग निर्माण
संकोच नसणे हाच तर स्वर्ग
--- ००० ---

रहदारी

बाहेरची पहाट पाहात असताना
क्षणात जातात टेकडीवरच्या तळजाई रस्त्यावरचे
ओळमाळ दिवे जणू काही
नको ते ते वगळत आल्यावर
फक्त कविता उरावी

दिवस उगवणे म्हणजे जणू
रात्री खूप काम केलेल्या मेंदूचे विसावणे

रात्र अजूनही शांत
पहुडलेली असते
कविता करेल ते करेल
या निर्भय बेफिकीरीने

कोणतीही रहदारी
आता जणू कुणाचीच नसते
--- ००० ---

प्रेमकविता

तो प्रेयसीला म्हणाला
एक प्रेमकविता दे
ती म्हणाली
मला नाही जमणार
तो म्हणाला तरीही लिही
चांगली जमणार नसली तरीही
तिने विचारले
तो हो म्हणाला

त्याचे
तिच्या येणाऱ्या कवितेकडे
लक्षच नव्हते
कारण
त्याने मागितल्यामुळे
प्रेमकविता लिहिण्याची
तिची कृतीच
कवितेआधीची
असणार होती एक
ग्रेट प्रेमकविता
--- ००० ---

तपस्या

आशा निराशा दुःख भीती
हे सर्व तसे रूटीन झालेले होते
यातून बाहेर पडता यावे
ही इच्छाही झाली होती
त्याच रूटीनचा भाग

पण त्या इच्छेमुळेच कधीतरी
तुझा सुगावा लागला की ऐकला
कोण जाणे पण उगीचच एक नाद म्हणून
तुझे चिंतन घडू लागले
तूही असणार माझ्यासारखीच
एक रूटीन हे गृहीत धरून

पहिल्याच ओझरत्या संपर्कात
तू टाकलेस सांगून स्पष्ट
की तुला कुणीही
स्पर्श केलेला तुला नाही चालत
तसा नुसता प्रयत्न जरी केला कुणी
तरी त्याचे आपोआप हाल होतील
अशी आहे तुझी जादू
जरी मला ते करणीचे वर्णन वाटले

पण या रहस्यमय मग्रुरीमुळेच तुझ्या
मनात हवेपण जागे झाले आणि वाढतच गेले

तुला वश करायचेच अशी म्हटले तर
जिद्दच झाली तयार आणि सुरुवात झाली
माझ्या घनघोर तपस्येला जी अधिकाधिक
रूपांतरीत होत गेली वेदनेत आणि खरे तर
भरकटून वेडे होण्याच्या शक्यतेत
हेही समजत आपोआप की तुला
याची ना खेदखंत असते ना सूडाचा आनंद

मध्येच एका थकव्याच्या क्षणी
अचानक तू सांगून गेलीस की तू

मला ओळखत नाहीस आणि ओळखणारही नाहीस
इथे पुन्हा पल्लवित झाली माझ्या तपस्येची
नशाबाज हाव आणि यात असणारच कुठेतरी
एक प्रवेशाची फट ही माझ्या
रूटीनमधून आलेली कल्पना

आणि अचानक एकदा मी बेसावध असताना
दिलेस तू परिपूर्ण आलिंगन आणि म्हणालीस
दाखव ओळखून मला

माझ्या स्मृतीचे सर्व क्षेत्र उचकटून
नासधूस करून पाहिले त्यात तुझी ओळख
कुठेही कणभरही नव्हती तेव्हाच समजले
सदा अनोळखी असणाऱ्या तुला
ओळखीचा स्पर्श कसा चालेल
आणि घडू तरी कसा शकेल

हे भन्नाट होते मी दिली सोडून माझी ओळख
आणि सदोदित राहू लागलो अनुपस्थित
तुझ्या अनोळखीत तुलाही नकळत
--- ००० ---

## तह

दोन देशांत सारख्या लढाया होत राहिल्या
त्यांतला एक देश सारखाच जिंकत राहिला
त्यामुळे तह करायचे ठरले
निष्पाप जीव तरी वाचू देत या विचाराने
शांतता मान्य झाली
त्या दोघांतल्या सीमेवर तिसऱ्या एका महान देशाच्या
सैनिकांनी देखरेख करायचे ठरले त्यांचे
दोन हजार सैनिक आणि शस्त्रास्त्रांची शंभर वाहने
तिथे तैनात झाली
त्यांचा खर्च या दोन देशांनी निम्मा निम्मा द्यायचे ठरले
माणूस हा एक समजुतदार प्राणी असल्याचे सिद्ध झाले
--- ००० ---

माझ्या खुर्चीचा पक्षी

जरा नाराजच झालेला असला
माझ्या खुर्चीचा पक्षी तरीही
मला चोच मारून जागे न करता
नाही पिणार मोहाची दारू --
त्याचे कुटुंबपरिवार सदस्य
जाणत नाहीत माझी अनैतिकता --
त्यांना नाही माहीत
की त्यांच्या गॅरेजची मालकी
जातेय आता नवीनच आलेल्या
अमीन सयानीच्या डुप्लिकेटकडे
झूमता मोसम मस्त महिना
म्हणणाऱ्या आणि हेही नकळत
ठळकपणे की त्यांची मने
त्यांना अटळच असणार आहेत

एका जागी थांबण्याने
पंखांतले बळच गंजून गेले असते
म्हणून त्यांनी अनेक परदेशांत
शूटिंग झालेले सिनेमे बघितले

मंदबुद्धी असलेला
पण तबल्याची साथ उत्तम करणारा
वेटर असावा कधीच
टिपची आशा नसलेला
तसा तो कर्ता पक्षी मनाचे प्रक्षोभ
संभाळत सहज येई चक्कर टाकून
--- ००० ---

पिचकारी

तू घेतेस कोंडून स्वतःला
आणि गातेस विरहाची गाणी
मातीवर पडलेल्या उष्ण चांदण्यातली
तरल सूक्ष्म हळुवार सूचक गोड
अनेक पुरुषांना तुझ्या
एकनिष्ठतेचा आदरही वाटतो
आणि असेही वाटते की तसे नसते
तर हिला हे दुःख करावेच नसते लागले
मी मनापासून उत्कटपणे अमर्याद
काळजी घेतली असती तिची तिचे सुख
तेच माझे सुख या तत्त्वाचे गौरवगान
गात प्रसंगी जगाला अदृश्य करत

काही स्त्रिया असे दुःख वाट्याला
न आल्याबद्दल तुझा हेवा करतात
काहींना तर तुझा विरह
देतो मिळवून मीलनाचेच सुख

ही कला आहे म्हणून एक विशेष
आदर असतोच मंद प्रकाशातल्या
घुटक्यांचा तुझे हे सगळे व्यक्तिगत
थोडेच असेल सिनेमात एक
अभिनयनिपुण नटी एकाला म्हणते
तुम्हे होली खेलनेका बहुत शौक है
मगर तुम्हारी पिचकारीमे दम नही
किती आदर वाटतो तिच्याबद्दल
--- ००० ---

## प्रतिमा

कुणाचीच प्रतिमा
सर्व स्थळकाळी अभेद्य नसते
इथे ठीक चाललेल्या प्रतिमेला
तिकडे तडे गेलेले असू शकतात
चंप्रंचे एक गगनभेदी किंचाळी
वाचा-बघा ना शेवटी
किंचाळण्यापर्यंत येते
ती हास्यास्पद गोष्ट

समस्या ही वाटते की समजा
प्रतिमेशिवायच जगायचे म्हणजे
हे जगच नाहीसे तर होणार नाही
झाले तर झाले असे म्हणणे म्हणजे मृत्यूच
ती हिंमत तर नाहीय म्हणून मरत राहा मग
ती नाहीशी होण्याच्या भीतीत
--- ००० ---

स्वभावचित्रण

माझ्यावर कुणी नाटक लिहिले तर
येताना रिक्षा मिळत नाही म्हणून
मी शक्यतो रात्रीचे नाटक कसे टाळतो
ते त्यात यायला हवे असे मला वाटे
नुसतेच कुणितरी वाढवून पाहिलेले
माझे गुणदोष काय कामाचे

किंग लियरच्या आत्ममग्नतेतून
होणाऱ्या त्याच्या औदार्याचे दशावतार
ठीक पण ना त्याचे शौर्य त्यात दिसत
ना त्याची करड्या रंगाची आवड

आणि अशा स्वभावचित्रणातून
जर होऊ शकतेय जीवनदर्शन
तर कशाला असायला हवीय कादंबरी
आजच्या जगण्याचा दस्तावेज
( माझे डोके माणसाचेच तर आहे
उलटसुलट असणारच ना )

अगदी पुरेसे तपशील बास झाले
करायचेय काय पूर्ण स्वभावचित्रण

आणि शेवटी म्हणायचेय तरी काय
तर बघा
तपशीलांच्या बनावटगिरीत
माणूस कसा हरवतो हेच ना
--- ००० ---

खांब

भक्तिसंगीत ऐकताना आठवले
एक आजारपणाची खोटी रजा
मी पूर्ण वापरली होती
ज्ञानेश्वरी अमृतानुभव चांगदेव पासष्टी
यांच्यासाठी सर्वस्वाने अत्युच्च कुवतीने
माझ्या आवाक्यातल्या बुद्धीच्या

त्यानंतर नोकरीच्या कामानिमित्त
झाले होते माझे जाणे नेवाश्याला
मी स्पर्श केला होता त्या खांबाला
जिथे घडले ते अद्भूत सांगणे-ऐकणे
आणि झालो होतो मी सेंटिमेंटल
डोळे भरून आले मी झालो चकित
माझ्याकडून त्या शब्दांचा अपमान
तर होत नाहीय या खोट्या गौरवाने
खरे तर ते शब्द नुसतेच
जाऊ दिले होते मी आजूबाजूने
अनुभव जाळण्याची त्यांची
शक्ती ओळखून हिंमत न करता
त्यांचा स्पर्श स्वीकारण्याची

लौकरच सावरून मी
निघालो होतो तिथून
पाठ फिरवून त्या खांबाकडे
माझे आहे ते मन संभाळत
--- ००० ---

आडदांड

संभोग फक्त म्हणजेच नव्हे मीलन
बडे गुलामांच्या ठुमऱ्या दाखवतात
स्त्री-पुरुष अशा दोन मनांचे एकच मन होणे

हा आददांड पैलवान माणूस
हजारो स्त्रिया म्हणतील
हा जाणतो आम्हाला अंतर्बाह्य

भरघोस मिशांच्या या राक्षसापासून
आम्ही काहीच नाही लपवू शकणार
--- ००० ---

सदासतेज

कोणताही कसाही अपघात झाला
तरी असमाधानाची लिंक तुटत नाही
उरलेसुरले धैर्य वापरले तरीही
प्रेमाचे आकाश भेटत नाही
यमके भेटतात फक्त कवितेत
मनाला गेयता आठवतही नाही
अशा मनाला स्वत:चे तरी
कितीसे असणार कौतुक
ते स्वत:कडे पाहात बोलेल
तेव्हा रोमँटिक कशा लिहील कविता
त्याचे सूर्योदय विचारणार प्रश्न
उतरत्या बालपणातले आणि
कधी ना कधी अंधार दिसल्यावर
रस्ते का नाहीसे होतात याचेही
कायमचे सदासतेज सदाहरित
--- 000 ---

रात्रीचे दिवे

महागात पडलेले रात्रीचे दिवे
स्मृतीत सतत अस्वस्थता वाढवत राहतात
निष्कारणच उतरलो आपण अलिकडच्या स्टॉपला
याची खंत घेऊनच पार पाडावे लागते सर्व क्रियाकर्म
आता इलाज नसतो नकार पचवण्याला
याचा सराव करत स्मित ठेवावे चेहऱ्यावर हेच बरे
--- 000 ---

## कालबिंदू

आपण दाखवतो एकमेकांना
आश्वासनांचे झेंडे
बाजारांच्या क्षितिजांवरून
आणि समुद्रांच्या तळांतूनही
स्मिताधार देत की नक्कीच
होईल पुन्हा भेट
संपतच तर आलाय कोव्हिड
असे दर्शवत नजरेने

पण सांगता नाही येत
आपल्याला आलेला असू शकतो
कंटाळा एकमेकांचा
वा अनिश्चिततेचाही

अनिश्चिततेची घटना
इतकी दीर्घकाळ चालणे
हा खरे तर असू शकतो भ्रम
मनाने जोडत नेलेल्या कालबिंदूंचा
--- 000 ---

सर्वत्र

जगाकडे पाहताना
भावनिक बंध ठेवले नाहीत
हे हवेच आपल्या जगण्यात
असला गळेपडूपणा केला नाही
एखाद्या गोऱ्या युरोपियन स्त्रीबद्दल
आपण आसक्ती दाखवावी आणि तिने
झटकल्याचा चेहरा करावा
ते नकोच असे लांब ठेवले
जमीन आकाश झाडे पक्षी इमारती
मित्रांनाही वाटू दिली नाही खात्री
गुजर चुका हूं फिर भी जिंदा हूं
असे प्रेम ठेवले सर्वत्र
--- 000 ---

रहदारी

ढगांचे उंचवटे इतके मऊ
की स्पर्श करताच विरून जावे
आकाशात मुळीच प्रतिकार नसलेल्या

हाच तर आहे पुरावा
मी तुझे मन जाणत असल्याचा

भर राहदारीतही मी पाहतो
तिला व्यापून असलेले तुझे आकाश
रहदारीऐवजी
--- 000 ---

कप्पे

कोव्हिडमुळे दिवसातले काही तास
असतो मी याच खिडकीशी
बाहेर पाहिले तर दिसते इथून
चाळीस सदनिकांची एक हिरवी इमारत
निर्जीव असली ती स्वत: तरी
तिच्या मनाच्या चाळीस कप्प्यांत
हर तऱ्हेच्या विचारांनी असते ती
गजबजलेली कुठे टोकावर आलेली
कुठे ओथंबलेली शेवटच्या आठवणींनी
कुठे ओठंगलेली कठडयावर
वाट पाहात कुणा प्रेमिकाची

कित्येक महिने झाले
आता बदललेही असेल खूप काही
प्रत्येक कप्प्यात विचारांचे
बदलले असेल फर्निचर
बागांचे स्टेशनांचे किल्ल्यांचे
वस्तुसंग्रहालयांचे शाळांचे

मला जिवंतच वाटतेय हल्ली ती इमारत
--- 000 ---

शेवट

सांगण्यासारखे
शेवटचे काय असते
ते पाहिलेले असल्याने
त्याच्या अलीकडच्या
हजारो पुस्तकांतले
मी फारच थोडे वाचतो
फक्त वेगळ्या तपशीलांसाठी
मी मेहनत नाही घेत
आणि शेवटचे जे असते
ते फार वाचायचे नसतेच
ते जगायचे असते

थोडक्या भांडवलावर
मी खूप प्रवास करतो
मध्येच उतरतो
डोंगर पाहतो सूर्यास्त पाहतो
एखाद्या मैत्रिणीची
मनमुराद स्तुती करतो

मुख्य म्हणजे कविता लिहितो
शेवट न विसरता
--- 000 ---

असंख्य मने

जे जे दिसेल ते ते
धरून ठेवण्याची
माझ्या मनाची सवय
मी कधीही सोडू शकतो
माझ्या असंख्य प्रेयसी असतात एकाच स्त्रीत
किंवा एकच स्त्री असते माझ्या असंख्य प्रेयसींत
माझी असंख्य मनेही बाहेरच तर असतात
मी मलाच सोडून दिल्यावर
हे असेच असते
कविताच त्या सगळ्या प्रेमाच्या असूनही
--- 000 ---

केक

पूर्वी मला चहा करता यायचा
आज विचार आला तर खात्री वाटे ना
नेमक्या स्टेप्स कशा होत्या
च्यायला स्मृतिभ्रंश म्हणावा का काय

आता झोपेत प्रश्नांना उत्तरे मिळवण्याचे
तंत्र विकसित होतेय म्हणे
याची याच मार्गाने खूप प्रगती होत जावो
सगळे जगणेच झोपेत घडत राहो

झोपेतच उपभोगलेला सेक्स
नंतरच्या झोपेत आठवत राहो
शंभराव्या वाढदिवसाचा केक
झोपेतच कापला जावो
--- 000 ---

सराव

वीसशे साठपर्यंत अनेक
लागतील शोध
त्यानंतरचे तेव्हाचे साठोत्तरी
जग मला नाही पाहायला मिळणार
याची कशाला खंत आज
तरी जे आहे त्याचा तरी कितपत
आहे सराव माझ्या मनाला

चार मित्र आम्ही फिरून
आल्यावर पितो चहा
एका आंतरराष्ट्रीय अमृततुल्यात
कोणताच विषय वर्ज्य नसलेल्या

सुबुद्ध जरी असलो आम्ही बऱ्यापैकी
तरी एखाद्या बातमीने होतो आम्ही विचारमग्न
सरावातल्या सरावात
--- 000 ---

सध्या

मी ना कुणाच्या वाढदिवसाचे फ्लेक्स लिहिले
ना मंगलाष्टके लिहिली
ना स्वत:ची पन्नाशी पंच्याहत्तरी
ना घरातल्या कुणाची कुणाला सक्तीची केली
मी ओळखून राहिलो अनिश्चितता
आणि घटनांची रचना करण्याचे
मनाचे हावरट कारस्थान

माझे चांगले होवो माझे चांगले होवो
तुझे माझे चांगले होवो
त्यांचे आपले चांगले होवो
असे म्हणताना मला जाणीव राहिली
हसणाऱ्या आकाशाची

आता नाही येणार प्रश्न आता नाही येणार
समस्या आता नाही घोंगावणार माशा
अशी हवीतच कशाला स्वप्ने
असे म्हणत मी धुके न्याहाळले

मी ना अपशकुनी आहे ना शकुनीमामा
मला घटना खोट्या वाटतात
स्मृती भ्रामक वाटते
हे कधी कधी बोलावेसेही वाटते

पण हे बोलून कशाला करा औचित्यभंग
म्हणून मीही नवे कपडे घालून
उडवतो फटाके लावतो फुलबाज्या

भलावण उपरोध वा शिव्या
हे सर्व अप्रस्तुत असण्याचा आनंद
सध्या मला खरा धरून चालायचाय
सर्वांसाठीच
--- 000 ---

खाजगी

बाहेरच्या धुक्याने जॅम  झालेले
शब्द होतात एकाकी
आणि कल्पू लागतात खात्रीशीर
खाजगी आयुष्य
इतरांनी कीव करावी वा बेफिकीर राहावे असे

खाजगीपणा तर हवाय
पण जॅम होणे नकोय
हे जर विज्ञानाने शक्य नसेल
तर आता जादूटोणाही
चालणार असतो किंवा भक्तिमार्गही

सहनशीलपणे पार पाडतात शब्द
जगातली कर्तव्ये जाणेयेणे
असले महामार्गावरून तरीही
आतल्या आत कोंडलेला श्वास
दिसू न देण्याच्या प्रयत्नात
--- 000 ---

हिंसा

ती गती इथून तिथे जाणारी अशी असेल
तर अजूनही करू शकेल सूर्य पृथ्वीला अंकित
पण ती जर असेल विश्वभर तर
कोण कुणावर सांगू शकेल अधिकार
सर्व घटनाच होतील रद्द आणि
तिचा देह आणि माझे मन
दोन्ही नसतील अधीन एकमेकांच्या

असे नसेल शक्य तर हिंसा अटळ आहे
--- 000 ---

डायऱ्या

उद्दामपणे वागणे हेच आपले नॉर्मल जगणे
असे समजणारे सिनेकलावंतांचे मूत्र
वाहात राहते विना अटकाव
मानमरातब घेत राजकारण्यांचे फ्लेक्स
पाहात राहतात प्रेमाने त्या प्रवाहाकडे

जनता न्यायासाठी पूजा करते
त्यांच्या त्यांच्या पुतळ्यांची
सिनेकलावंतांच्या सह्या घेतलेल्या डायऱ्या
तिजोऱ्यांमध्ये आपापल्या ठेवून सुरक्षित

सेक्स आणि इतिहासाचा अभिमान
हे बनतात मानबिंदू सर्वच घराण्यांचे

स्वच्छ कपडे तजेलदार झेंडे शुभ्र कार्स
यांच्या मागोमाग पळत येतात
रानोमाळ फाटलेली कागदपत्रे

सगळ्यांची असते खात्री
आता यश मिळेल आपलाच माणूस
होईल देव भरवील सभा
आपल्या पूज्य पुतळ्यासमोर

ते पुतळे असतात ज्यांचेत्यांचे
मान्यताप्राप्त जीव की प्राण
या पुतळ्यांसाठी जीव देऊ आम्ही
म्हणतात सगळेच जे ते
आम्ही मरायलाही तयार आहोत
---000 ---

## लगाम

संध्याकाळची वेळ
इस पार या उस पार अशी अवस्था
उधळू पाहाताहेत घोडे
पण लगाम घट्ट ताणलेले भीतीने
दिशा चुकण्याच्या
आणि रस्ताच होऊन बसण्याच्या
ओझे भविष्याचे

आपल्याला जीव लावणारी
संध्याकाळ
दुखावली तर जाऊ नये जर
तिने दुर्लक्ष नसेल केले तर
आपल्या गतीकडे

तिची काळजी महत्त्वाची
की आपण जखमी झाले असण्याची शक्यता
हे कळत नसल्याने तीन दिवस
घोडे ताणलेले थकत उभे
--- 000 ---

प्रेमकहाणी

तो पुरोगामी होता
त्याचे तिच्यावर प्रेम होते
तिचेही त्याच्यावर होते
पण तिच्या प्रेमाचे जरा वेगळे होते
ती कधी इतरत्र एखाद्याकडे आकर्षित होई
तर कधी त्याच्या कामाला क्षुद्र लेखे
पन्नास टक्के प्रेम आणि पन्नास टक्के अपमान
असे तिचे पॅकेजच होते तसा स्वभावच होता
कधी प्रेमाचे पारडे जड होई कधी अपमानाचे
तरीही प्रेम आवडत असल्याने
बाकीचे तो तिचे व्यक्तिस्वातंत्र्य समजे

पण अपमानाचे पारडे कधी फारच जड झाले
तर त्याचे डोके फिरे नको ते प्रेम असे होई
त्याला तिचा तिरस्कार वाटे मग ती म्हणे
पुरोगामीपणात बसतो का असला तिरस्कार
असले स्वामित्व नुसत्या स्वत:च्या अपेक्षा राबवणे
दुसऱ्याचे स्वातंत्र्य हिरावून घेणे

मग तो म्हणे पुरोगामी असलो तरी माणूसच आहे ना
माझ्या जगण्याचा पाया माझा स्वाभिमान
मी सोडून का द्यावा मी भाजीपाला थोडाच आहे

ती तिचे पॅकेज बदलू शकत नसे तिचा तो
नैसर्गिक स्वभाव होता त्यानेच उदार व्हावे
असे ती म्हणे या वेळी तो गा च्या गां वरून काही म्हणे

त्याला त्याच्या जातीची अस्मिता असली तरी
धर्मद्वेषाचा तो धिक्कार करी
शेवटी माणूसपणावर त्यांच्यांत तात्पुरता समेट होई
--- ००० ---

मैफिल

माझ्या बऱ्याच कविता जागतिक
दर्जाच्या आहेत हे मला माहीत आहे
जागतिक कविता मला माहीत आहेत
पण आणखी कुणाला
असे वाटताना दिसत नाही
किंबहुना मराठीत तरी आहेत का या
विशेष म्हणाव्यात अशा
तेही कुणी बोलताना दिसत नाही

एक व्यक्ती म्हणते खरेच
चांगल्याच आहेत तुमच्या कविता
पण त्याच व्यक्तीला त्या तिकडच्या कविता वाचून
त्यांच्यावर स्तुतिपर लिहिण्यासाठी उत्साहाचे
भरते आलेले दिसते तेव्हा कळते
त्या व्यक्तीला आपल्याकडून हे हे साधायचे होते
म्हणून चांगल्या होत्या आपल्या कविता
तसे भरते नव्हत्याच आणू शकल्या आपल्या कविता

एक माणूस येऊन सरळ जाहीरच करतो
या कविता हितकारक नाहीत कुणी वाचू नयेत

एकजण म्हणतो यात थोडी गेयता आणा
दुसरा म्हणतो जरा भावनिक ओलावा आणा ना
इतक्या रुक्ष का लिहिता आणि म्हणायचेय काय तुम्हाला
तिसरा म्हणतो कळलेच नाही तर लिहून उपयोग काय

तुमच्या कवितेला परंपरेचा वास फारच कमी आहे
तुम्ही उगीचच इंग्लिश हिंदी शब्द वापरता
कधी प्रतिमा फार असतात तर कधी गद्यच नुसते

इतनी बडी मैफिल और इक दिल किसको दूं
असे होऊन जाते अगदी
--- ००० ---

प्रवक्ता

स्टार प्रवक्ता होणे एखाद्या पक्षाचा
एवढ्या तरुण वयात म्हणजे खाऊ नव्हे
शिवाय तो एक उत्तम वकीलही होता
नावाजला जात चाललेला
फक्त अठ्ठावीस ची होती ही कमाई
टीव्हीवर कॅप दिसली की लोक ओळखत
की हा तोच आहे मित्र म्हणत
अतिहुशारी भोवलीय तुला
जरा आमच्यासारखा असतास तर केस राहिले असते
पण कर्तृत्वाला महत्त्व देणाऱ्याही असतात स्त्रिया
तशीच होती एक त्याची प्रेयसी आकर्षक

टीव्ही महाचर्चेचा त्याचा अनुभव
असा होता की एकमेकांची उत्तरे नसलेले खूप मुद्दे
मांडले जात आणि शेवटी निवेदक गुंडाळे म्हणत
की बाबा शेवटी सर्वांनी देशहित महत्त्वाचे मानले पाहिजे
या कामासाठी मदतनीस म्हणून पक्षातले तीन अनुभवी विद्वान
असत त्याच्या दिमतीला पुरवायला आठवणी घटना तपशील
तो तो विषय त्यांच्या पक्षासाठी बळकट करणारे

कोर्टात अनेकदा आपण आपल्या हुशारीवर
सत्याच्या बाजूलाही हरवतो याचे त्याला अपराधी वाटे

एकदा त्याच्या प्रेयसीच्या हालचाली त्याला संतापजनक
वाटल्या त्याने तिला सात प्रश्न विचारले तिने त्यांची
नऊ उत्तरे दिली ज्यांतले आठवे त्याला जरा बरे वाटले
म्हणून त्याने घेतले तिला मिठीत ती म्हणाली
झाले ना निराकरण शंकांचे तो म्हणाला
असे कधी होत नसते फक्त एक बिंदू येतो
जिथे प्रश्न फक्त सोडून देणे घडू शकते ती हसली
म्हणजे मागच्याप्रमाणेच पुन्हा घडलेय म्हणाली
मग दोघेही हसले जगणे कळल्याप्रमाणे
--- ००० ---

## अमर होण्याची खात्री

संक्रांत आली की बरे वाटते
पुनरावृत्तीच्या आणखी एका वळशाने
अमर होण्याची खात्री वाटते
आत्मतुष्ट गोड बोलत
बीपी बऱ्यापैकी नॉर्मल राहते
पेलू शकतो आपण आजचे-उद्याचेही
माफक सुखदु:खांचे प्रसंग
आपल्या अनुभवी शहाणपणाच्या
सुरक्षित किल्ल्यामधून असे वाटते

ट्रंप आणि शी जिनपिंग यांना नसते गरज
अशा किरकोळ अमरत्वाची
त्यांची घट्ट निर्ढावलेली दगडी मने
अविचल असतात आध्यात्मिक
जग राहो अथवा जाओ अशी शांत
त्यांना ना गोडीची गरज ना लशीची
भीतीवरच्या असते

पुनरावृत्तीचे छोटे छोटे डोस
आणि एकच मोठा कायमचा प्रसाद
या फरकामुळेच स्वत:च्या वा दुसऱ्याच्या
मृत्यूचे  सावटच नाही जाणवत
त्यांच्या कठोर डोळ्यांना
जगाची काळजी वाहणाऱ्या

आपण मनांनी जगतो
हे कळण्यापेक्षा न कळणे
कधीही अधिक चांगले आणि
आरोग्यदायी
--- ००० ---

विचारमग्न

आपल्याला वाटते हे बाहेर घडले
पण जे घडले ते आतल्या विचारांनीच घडले
संबंध खरचटले वेदना चालू राहिली
म्हणजे काय काय झाले

कुणाचे तरी विचार इतरत्र मग्न झाले
अनवधान झाले दुसऱ्या मनाला आले
दुर्वासाचे रूप क्रोध अवतरला
आतल्या विचारांतूनच
विचार खरचटले दुतर्फी

हे किती चालेल असे कधी होईल नीट
विचाराचा आटापिटा सुरू झाला
व्यवस्था तर लावायलाच हवी
त्याच जखमेवरून सुरू झाले प्रयत्न
तडजोडीचे पुन्हा गोडवा आणण्याचे
त्याच जखमी विचारांनी

चहू बाजूंनी भिरभिरले विचार
आणि मुद्दे होते
दुसऱ्याच्या डोक्यातले न दिसण्याचे
लावलेल्या वा लागलेल्या अर्थांच्या
खरेखोटेपणाचे बेफिकिरीचे दुसऱ्याच
तातडीच्या मग्नतेचे नकळत सहज
टाळता आले असते अशा

जखमी विचार करत राहतात जखमी प्रयत्न
जखमी प्रेम होत राहते अधीर तडफडते

असे काहीच नाही घडणार शांतवणारे
याही समस्येची विचारच घेतोय
यंत्रणा ताब्यात ..... थकवा येतोय .....
या थकव्याने झोप तरी यावी ....
--- ००० ---

धोका

वाटायचे नुसते
की न जाणो
काही अघटित घडेल
पण संध्याकाळनंतर
सहज यायची रात्र
समोरच्या इमारतीत
झळकत असलेल्या
लग्नाच्या रोषणाईबद्दल
बोलत किंचित स्मिताने

जे घडून गेले
ते पुरेसे होते का
आणखी एक पाऊल
पुढे टाकण्यासाठी
की डिस्टर्ब होईल
सगळा खेळ
हव्याहव्याशा
आटापाट्यांचा

नुसती उपस्थिती येणे
हा ठरणार होता प्रतिसाद
जणू दुतर्फी अज्ञानात
आणि ठरणार होता करार
भविष्यात कोणत्याही दिवशी
कोणत्याही कारणाने
मिठीबाहेर न पडण्याचा

काय घडेल
हा उत्तेजक सस्पेन्स
व्हायचा एक
हवासा धोका

आणि मग सहज यायची रात्र

--- ००० ---

आतल्या आत

रस्त्याच्या या कडेला पडले होते
एक कारने चिरडलेले मांजर तीन दिवस
त्याच्या घाण वासामुळे मी पुन्हा कधीच
त्या बाजूने चाललो नाही
घटस्फोट न घेता जाये करत राहिलो
पस्तीस वर्षे इमानेइतबारे वर्तमानपत्रे
वाचत राहिलो नोकरी पाळत
आमच्या एखाद्या फंक्षनला एवढे मोठे असून
आमचे साहेबही येत सर्वांना वाटे
किती नॉर्मल हे जगणे किती निरपेक्ष
किती छान आणि कुटुंबवत्सल

मी का कशा केल्या सगळ्या अब्नॉर्मल निवडी
हे कधीच कुणाला दिसले नाही
याला सहनशक्ती किती लागली
हे माझ्याच मनातल्या मनात राहिले

पूर्ण जगाची नॉर्मल्सी
अशीच चालत असणार बारा गावची
सगळेच त्यागी आणि सहनशील
असल्याने आतल्या आत

साहेबांना तरी काय हेच सिद्ध
करायचे असणार की बघा मी
मोठेपणा नाही डोक्यात घेत कर्मचाऱ्यांवर
प्रेमही करतो घरी गेल्यावर म्हणतही असतील
बायकोला की च्यायला जावे लागते पण आता
कंटाळा आला जर त्यांची ही सवय नसेल
झालेली चांगुलपणाची आणि तरी
गेले असतील विसरून त्यांनी
घटस्फोट न घेतल्याचे
आतल्या आत
--- ००० ---

## आपण एकटे होतो

आपण एकटे होतो
तेव्हा आपण खूप केविलवाणे होतो
आपल्याला अपमान सहावा लागतो
तेव्हा आपण खूप केविलवाणे होतो
कुणी फसवते तेव्हा
कुणी बदनामी करते तेव्हा
कुणी क्षुद्र समजते तेव्हा
कुणी गैरसमज करून घेते तेव्हा
कुणी काही आरोप करते तेव्हा

कुणाचातरी खूप राग येतो तेव्हा
कुणाला सुधारायची गरज वाटते तेव्हा
जे जसे आहे ते तसे खटकत राहते तेव्हा
मतभेद समोर येतात तेव्हा

जगात काय बदल व्हायला हवेत
हे आपल्याला जाणवते तेव्हा
सगळी माणसे स्वार्थामुळे अंधळी झाली आहेत
असे वाटते तेव्हा
आपण फार फार केविलवाणे होतो

जितके केविलवाणे तितकेच हिंसक होतो
आपले आपण संतप्त धोक्याचे
--- ००० ---

तबकडी

एवढ्यातेएवढ्याने त्याची तबकडी सटके
त्याचे शेजारी म्हणत
टाईट घे ना करून ती जरा
तो म्हणे टाईट करताना दुखते फार
मग एकजण म्हणाला तिच्यावरूनच तू टीव्ही घे
म्हणजे तिची ताकद विभागली जाईल
तो म्हणाला की गेल्या वर्षी पाहिले तसे करून
तर टीव्ही चर्चा जास्तच भयानक झाल्या
आणि कोण काय म्हणतेय ते मला
एरवीही कळेनासे झाले
यावर मग सरळ त्याच्या बायकोने एक
जालीम उपाय केला होता तिने तिच्यावर
कपडे वाळत टाकणेच सुरू केले होते

एक दिवशी त्या रस्त्याने चालले होते पंतप्रधान
तबकडीवर कपडे का टाकलेत वाळत
त्यांनी विचारले तर ती म्हणाली की तुम्हीच आहात
याचे कारण तुम्ही भांडणे लावता आणि ही तबकडी सटकते
सामान्य माणसाला तुम्ही वापरता सॉरी सॉरी
ते म्हणाले आणि तिथून चटकन सटकले
--- ००० ---

राजकन्या

मला गरजच नाहीय
उगीचच उन्हातान्हात गंभीर होण्याची
किंवा उच्चारलेले चंद्रसूर्य संभाळत बसायची
पण याच जगात नीट चालावेत
गरजेचे सर्व चित्रपट
एवढाच हेतू असतो
तोही फलाशा न धरता
तरीही भालेबिले घेऊन येतातच
पूर्वीच मयत झालेले शूरवीर
त्यांच्या पिंडांना धक्के लागल्याने
तेवढा तर मीही सावध असतोच
त्यांचीच राजकन्या
माझ्या ताब्यात असल्याप्रमाणे
स्वखुशीने
शस्त्र नाही चालणार
आवाज वाढवायचा नाही
आणि शिव्या बंद
एवढ्या तीनच अटींवर
जिंकतो मी सामना
खूपच आधी शेवटच्या चेंडूच्या
त्यांचे इंटरेस्टच समाप्त झाल्याने
--- ००० ---

आपला सर्वश्रेष्ठ कवी

हजार आहेत बाबी
आणि हजारो होतील अग्रक्रम
जेवढी मते तेवढ्या लिंक्स
आणि निवड तर होणार आहे एकच
अनुभवातून आलेली मते
प्रगाढ अभ्यासातून आलेली
सामान्यांच्या हिताची
आता काय अर्जंट आहे हे समजून
आधी जिवंत तर राहा
मग पाहू करमणुकीचे
या विचारातून आलेली
आम्हालाही द्या काही
असे म्हणत न्याय मागणारी
गोली मार भेजेमें
हे गाणे लिहिणाराच होता
आपला सर्वश्रेष्ठ कवी
--- ००० ---

थक्क

मी निसर्गदृष्ये पाहतो
थक्क होतो
मी अमूर्त चित्रे पाहतो
थक्क होतो
मग कळते
इतक्या व्हारायटीची गरजच नाहीय
नुसतेच दिसणे पाहून
थक्क होणेही पूर्णच तर आहे
--- ००० ---

द्वेष

द्वेष देतो निश्चिती
आणि सुरक्षितता
अनिश्चित करत
टिकून राहणे
--- ००० ---

चेहरा

चेहरा बदलतो
आजारी होतो
सततच्या वादांनी
पण न्यायासाठी
स्वत:वर एवढा
अन्याय तर अटळच
--- ००० ---

आपोआप

धर्म जात भाषा रंग झेंडा
यांचे गटनिहाय
वेगवेगळे शब्द निश्चित केले
कोणत्या शब्दाने कोणत्या भावना
उद्भवाव्यात या सवयी लावून टाकल्या
शब्दांची वेळोवेळी दाबायची बटणे झाली
लोकांचा त्रासच गेला आता फक्त
जगत राहा बाकीचे आपोआप घडत राहील असे झाले
--- ००० ---

सत्यात

तापमानावर माणसाची सत्ता नाही
हे लक्षात घेतल्यावर त्याची चिडचिड कमी झाली
झोपताना त्याने विचारांना विरजण लावले
लैंगिक अपेक्षांसारख्याच राजकीय स्वप्नांचे
त्यांचे सुख आवडल्याने दिवसाही
त्याने स्वप्नातच राहायचे ठरवले
प्रश्न तेव्हा आला जेव्हा वेगळी स्वप्ने
आली संघर्षात एक तर तुम्ही करा
मर्डर नही तर आम्ही करू
असा उभा राहिला माहोल
आता माघार शक्यच नव्हती स्वप्नासाठी
सत्यात घेणे भागच होते मरणाचा धोका
--- ००० ---

सौंदर्य आणि काळ

दलाल-मुळगावकरांचा काळ संपला
म्हणजे काय ते सौंदर्य कालबाह्य झाले
की ते अप्राप्य असल्याचे कायमचे क्रौर्य

कोरले गेले मनावर
आकर्षक आणि बुद्धिमान स्त्री
च्या ऐवजी आता काय कुरूप

आणि गोडवा नसलेली काहीशी क्रूर
हवीय की काय लहरी बेगुमान
तडफडत ठेवून निघून जाणारी

अवयवांची उलटापालट आणि
रंगांची ससेहोलपट झालेल्या
स्त्रियाही होताहेत सेक्सी हे कसे

मने झालीयत वाकडीतिकडी
फुटकीतुटकी आणि हिंसक
आता स्त्रियाही हव्या आहेत आक्रमक

सुखाचे आयामच बदललेयत
पुरुषत्वाला द्यायची आहे आता
तीव्र सहनशक्तीची सत्त्वपरीक्षा

ती घेणारी आता प्रेयसी नको आहे
हवी आहे तिरस्कार करणारी ठाम
नकार देणारी अपमान करणारी हडळ
--- ००० ---

म्हटल्यास

लोक म्हणतात अमुक कवी ना ग्रेट त्यानेच
दिली दृष्टी पाताळातले गटारी जग बघण्याची

का लागतो आपल्याला कुणीतरी ग्रेट
कुणी परिपक्व आपल्याला कळते त्याचे महत्त्व
हे बघण्याचे ते बघण्याचे
म्हणजे आपोआपच आपणही परिपक्व
असे तर म्हणायचे नसेल आपल्याला
तो गेला बळी आपल्यासाठी
आपण फक्त परिपक्वता वापरणारे आहोत
आपलीही कदाचित की काय
म्हटल्यास आत्मभक्षणासाठी
--- ००० ---

बेढब

फुटकळ आशावाद
सतत जिभेवर
किती वेळ चालेल
नको त्या अनुभवाचा अग्नी
धगधगणे मनात
माहीत नसलेले जनावर
जगाचा घास घेणारे
असे क्षण आरशात बेढब
--- ००० ---

खेलने की चीज

वेदना म्हणजे अंधारातून आलेली किंचाळी
निबिड काट्याकुट्यांसह मार्गहीन
आणि समोर धर्मांचे नारळ सस्मित
आणि हमखास कम्युनिस्ट सस्मित
रक्तप्रवाहांचे सुरक्षित ठेकेदार
सपनोंके सौदागार ड्रीमगर्लससह

राज कपूर बिचारा भोलाभाला
सुख वाटत फिरणारा राजेश खन्ना
कॅन्सरग्रस्त गाण्यातून
आश्वस्त करत

हमे कुछ नही चाहिये बस
बारातियोंका स्वागत पान परागसे कीजिये
आपण म्हणजे बस
मुलींच्या बापांचे भांड्यांत पडणारे जीव

वेदनेचा एक असह्य विचार
आणि त्याविरुद्ध तीतून सुटण्याचा विचार
चिनॉयसेठ
ये बच्चोंके खेलनेकी चीज नही है

खून निकल आता है
--- ००० ---

कावळे

आपण जणू निसर्गापासून
वेगळे असल्याप्रमाणे चालली होती माझी स्टोरी
पण माझ्याच शरीरातून येऊ लागले जेव्हा
कावळ्यांचे आवाज तेव्हा बाहेरही गेले लक्ष
आणि या दोन्हींच्या अनवधानात
आपण कुठे कसे चाललो होतो ते कळेनासे झाले

मुळात होती भीती
दोन्ही निसर्ग एकच असू देण्याची
स्वत:च्या काळजीच्या भीतीपोटीच
ओढवले होते हे संकट कावळ्यांचे

आता होते अधिक मोठे आणि अधिक अटळ आव्हान
कावळ्यांना निसर्ग म्हणून मान्य करण्याचे

मरू दे बघून घेईल आता
माझ्यातला निसर्ग असे झाले
--- ००० ---

संपर्क

आधी ती होती शकुंतला
मग झाली स्नेहलता
त्यानंतर चालूच राहिला सिलसिला
मंजिरी परांजपे पासून
ते आसावरी औसरीकर पर्यंत
मध्येच ती एक बिनसिनेमावाली
माधुरी दीक्षित झाली
छान गेला तोही काळ
शिवाय मेधा ओक रश्मी जाधव
अस्मिता शेख प्राची पवार
अशा बऱ्याच

वेडे आहात की काय
इतक्या जणींशी
भेटणे-बोलणे कसे शक्य आहे
काव्य-शास्त्र-विनोद-साहित्य-कला-
धर्म-अध्यात्म-तत्त्वज्ञान-मानसशास्त्र
अशा गोष्टींमुळे भरपूर संपर्क झाले इतकेच
आमचे सगळ्यांचेच काळ त्या त्या वेळी छान गेले

आधी माझ्या मनाचाच पिच्छा पुरवणारा मी असल्याने
मला त्या सगळ्यांतच गती होती शिवाय
माझे हृदय अजून सहृदय राहिले होते
सतत एखादी राजकीय बाजू घेत
कडवट-रागीट-कर्कश-उपरोधिक-विषारी
न झाल्यामुळे आणि त्यांच्यांत इंटरेस्ट घ्यायला
मला वेळ आवड अनुकंपा आकर्षण
आणि प्रसंगी समर्पण भावना असल्यामुळे

नावे रूपे अनेक पण खरे तर एकच होती ती
एकदा तर ती लांबच गेली पण दुरावा नाही आला
मीच पुन्हा एकोपा साधला तर इकडे माझी जागा रिकामी झाली
मी मर्यादित होतो पण रिकामी जागा अमर्याद होती
--- ००० ---

## एका ठिकाणी

आपली अमुक एक कविता
वाचकांना आवडली नसल्याचे समजून
त्यावर उतारा म्हणून एकूणच फटकून
मी धारातीर्थी पडायचे ठरवतो
पर्वा न करता शुभाशुभाची
वा घरोघरी चालणाऱ्या
कोणत्याही वाढदिवसांची

एखाद्या कवीच्या कवितेत
आले स्त्रियांचे उल्लेख खुले
तर भुवया उंचावणारे वाचक
आधी करू लागतात कवीचेच मोजमाप

ज्यांच्या आवडीत असतो
लैंगिक मर्यादांचा नकाशा
आणि ठरलेल्या मार्गावरच्या
सर्व देवांना नमस्कार करत जाणे
ते वाचक सर्व अध्यक्षांना लखलाभ

मी कधीच नाही लिहिणार मंडपात
वाजवायची कविता
मीच नाही थांबत एका ठिकाणी
तर तुम्हाला कसा थांबू देईन
--- ००० ---

मशीन

एका अभ्यासकाने शोधून काढले
सामान्यत: मराठी कवीची शब्दसंख्या
साडेसातशेच्या पुढे नाही जात
त्यामुळे एका कवीने
आशयात गुंफून
मशीनच्या भागांची नावे टाकायला
केली सुरुवात नावीन्य आणि वाढ म्हणून

लोक म्हणाले मशीनचे पार्टस
पेरतो हा भडवा कवितेत आशय म्हणून

कवी म्हणाला नाही तरी काय
प्रेम राग दु:ख हे पार्टस नाहीयत का मनाचे
आणि मनाला मशीन का नाही म्हणायचे

तेव्हा कुठे मुख्य प्रश्न आला समोर
की बाबा मशीन नसणारी कविता म्हणजे काय

मराठी समीक्षकांनी इथे
पोबारा या शब्दाचा अर्थ वापरला
--- ००० ---

चमत्कार

आधीचे नकार नंतरचे
होकाराच्या मार्गातले पिवळे
आणि मग सगळे हिरवेच हिरवे
हे सगळे सिग्नल्स आता मिक्स होतात
मी नुसती वाट पाहण्याचा अवकाश
ती हजरच असते खरे तर
वाट पाहण्याचेही नसतात परिश्रम

कधी कधी मी काय लिहिले त्याला
अर्थच नसतो काही त्यासाठी प्रयत्नही नसतो
जे लिहून होईल तो असतो एक चमत्कार
परिश्रमहीनतेचा

वाचकांनीही मस्त बिनधास्त रिलॅक्स  व्हावे
आणि विसरून जावे बास
--- ००० ---

खरे तर

प्रेयसी हा शब्दच दर्शवतो
एक आठवणीतला साचा
एक लोभस प्रतिमा
आश्चर्य लोप पावलेली

खरे तर ती नसते दहा वीस वा
पाच वर्षे सहवासातली
ती नसते घटनांचे कढ
गतकातरता जोपासणारे

ती असते क्षणोक्षणी ताजी अनपेक्षित
लोभसतेची सवयही न जुमानता
कोणत्याही वयाला परिपक्व करणारी
अनुभवी मनाच्या मान्यतेची गरज नसलेली
--- ००० ---

परफॉर्मन्स

वृत्तपत्रात नाव आले म्हणून सडेतोडपणे
पाणी पिणारे लोक ग्लॅमरच्या आखाड्यात उताणे होतात
अर्थातच अंगाला माती लागते मग तेच लोक
त्यांची कविता इथल्या मातीतली आहे म्हणून
बीए ला लावले जातात नंतर ते नगरसेवकाकडून
पालिकेतही लावले जातात महापौर नेहमी म्हणतात
नुसतेच उंदीर मारत बसणे ही आमची संस्कृती नाही
आमचे बापजादे मदर इंडियात एका मॉबसीनमध्ये होते
ही आमची ओळख नका विसरू

खूप बांधकामे चाललेल्या आजच्या जगात
महत्त्वाकांक्षा म्हणून पानाच्या टपऱ्या किती टाकणार
आणि ताणतणावावरच्या औषधांची चैन करताना
संबंध तरी किती स्त्रियांशी करणार नशीब इतकेच
की आहेत पुरेशा स्त्रिया जगात आणि आता त्यांनाही
तेच स्वातंत्र्य देण्याची वेळ आलीय हे या ठिकाणी
नाकारता येणार नाही

पुन्हा पुन्हा तेच  तेच प्रश्न उगाळत बसायला
आपण काही जुन्या जमान्यातले मोर नाही
भटजी वा चांभार तर नाहीच नाही
तरीही ऊठसूट टेंडर फोडल्याचे आरोप
होतच राहताहेत म्हणून तर शेवटी
साधे सैन्यात सैनिक होणेच बरे
असे वाटत राहते काखेत स्प्रे मारता मारता

मन गजबजले की प्रत्येकालाच वाटते
नको हा आवाज नको हे मेंदूतल्या शिरा तुटणे
त्यापेक्षा नारळ फोडून शांत बसणे बरे

खोटारडेपणा आणि खरेपणा असा काही
फरकच नसतोय शक्ति आणि उत्तेजकता असली की झाले
शेवटी परफॉर्मन्सच महत्त्वाचा
--- ००० ---

पेंडिंग

चालढकल करणे हे एक सूत्रच समजा
त्यामुळे खूप गोष्टी पेंडिंग
राग वा गैरसमज घालवणे
आपल्या मनातल्या संशयाची शहानिशा करणे
असूया मत्सर द्वेष यांची व्यवस्था म्हणा
की विल्हेवाट लावणे
निराशा वैफल्य एकाकीपणा
आत्मचीड आत्मकीव यांचे रूपांतर
आत्मविश्वासात करणे
प्रेयसीचे प्रतिसाद नेमके हवे तसे
का येत नाहीयत ते पाहून
तिला दुरुस्त करणे
बॉसच्या घरी बेस्ट आंबे पाठवून
त्याच्या पोरांना खुश करणे वगैरे

माझे ऐका हे सगळे आहेत
दु:खाचेच प्रकार झटकन
घालवता येतील असे

यांतले काहीही एक घ्या समजा संशय
त्याच्या सीमारेषा आपण अस्पष्ट समजतो
म्हणून त्याला अमर्याद हाताबाहेरचा समजतो
नीट बघा त्याच्या सीमा स्पष्ट बघा तो एक मर्यादित
वस्तू असल्याचे स्पष्ट बघा
असे तुम्ही बघताक्षणीच तो पूर्ण
नाहीसाच होईल आणि सोबत सर्वच ते पेंडिंग

आता नाहीच आहे काही पेंडिंग
तर चालढकल कसली करणार

आले ना लक्षात चालढकल घालवायचा नसतो प्रश्न
पेंडिंग घालवायचा असतो

आता तुम्हाला आहे तेच सहन करणे आवडत असेल तर ते वेगळे
--- ००० ---

खिडक्या

समोर दिसणारा अंधार
हा काही स्वप्नाला पर्याय नसतो
त्या ऐवजी पाण्याचे रस्ते करून
त्यांवरून घरंगळत सोडावेत

शब्द हमखास धडाडणाऱ्या विचारांचा
धूर बनत मस्टर चेक करणारे मुकादम

कशाला नाही ते वा नको ते प्रश्न
म्हणत टेबलावरच्या चांदण्या ठेवाव्यात
आवरून आणि तरीही बेशिस्त संपू नये

आकर्षणांची तसे टिटव्यांचे आवाज
उगीचच भाव वाढल्यामुळे चेहरे पडलेले

ज्याचे त्यालाच सावरावे लागतात शेवटी
नव्या कोऱ्या दु:खांचे कढ

नुसतेच कुणीच कुणाचे नसते
एवढेच म्हणून भागणार नसते
खरे मुळात कुणी
आहे तरी का हेही विचारावे लागते
नाही तर वेळेवर निघायचे या विचारात

खिडक्या लावायच्या राहून जातात
--- ००० ---

बलात्कार

स्वेच्छेने नाही जन्मलेली ही मानवजात
बलात्कारातून उगवलीयत ही मने
काहीच नसण्याने काहीच नसण्यावर केलेल्या

काही नाहीच आहे तर मुळात पाप कसले
आता सर्व मनांत स्वेच्छा उगवणे
हाच फक्त आहे पापी बलात्कार

याला ना शासन आहे ना परिमार्जन
आपोआपच मने भोगतील फक्त हेच असेच
शक्य आहे असे म्हणण्याची फळे

यातून ना कुणाला धडा मिळेल
ना कुणाला वेगळे काही सुचेल
याची दाद फिर्याद वा नोंदही नसेल

स्तनांना भिडलेल्या बाळांप्रमाणे
मायेने खात्रीशीर पोषण करणारे
विषकन्यांचे भयानक पण नसलेले जग
--- ००० ---

मर्मदृष्टी

तुम्ही सूर्यास्त पाहात असाल तरी चालेल एक वेळ
पण त्याच वेळी तुमचे डोके दुखत असायला हवे
तुम्ही उत्तम हॉटेलात जेवत असताना आनंद
झाला तुम्हाला तरी चालेल पण कुठेतरी
बालपणीच्या दारिद्र्याची आठवण हवी
तुम्हाला एकाकीपणा नसेल तुम्हाला चक्कर येत नसेल
बॉसने तुमचा हरामखोर म्हणून अपमान केला नसेल
तुमची सध्याची प्रेयसी तुमची वाट पाहणारी प्रेमळ
असेल आणि तरीही साधेपणामुळे ती तुम्हाला
खूपच कमी चार्मिंग वाटत असेल

तरच तुम्ही कविता लिहू शकता तीत तुमची
थोडीफार बोंब हवीच हवी आणि असतेच ना
कोणताही कवी जिवंत असल्याचीच तर लिहितो कविता
मेलेल्या किंवा जन्मालाच न आलेल्या
कवीला कविता लिहिता तरी येईल का

जे आहे त्याचीच पुनरावृत्ती करा
आणि जे आहे ते गृहीत धरा
मग या अनिर्बंध अंगणात तुम्ही
कितीही कौशल्य दाखवा
तुमचे दु:ख कसे वेगळे आहे ते सांगा

चलेगा वाहवा होईल एक वेगळ्याच
मर्मदृष्टीचा कवी म्हणून तुम्हाला ज्ञानपीठ मिळेल
--- ००० ---

विशेषणे

तुम्हाला खूप विशेषणे नसतील सुचत
क्षणोक्षणी तर तुम्हाला कुणीही नाही म्हणणार
संवेदनशील तुमच्या तळहाताच्या रेषांतून
सापडेल चेहरा एका क्रूर माणसाचा जो म्हणेल
मी अंधश्रद्ध आहे माझ्यावर श्रद्धा नका ठेवू
तरी तोच चेहरा जिंकेल वादावादीत
तुमची बाजू विचारातच न घेतल्यामुळे
--- ००० ---

ससा

रात्रीची वेळ
कुठले तरी चॅनेल
भर उन्हातले शहर
बाँबचा पांढराशुभ्र धूर
प्रचंड सशाच्या आकाराचा
आकाशाला भिडलेला

कुणी कुणावर
टाकलाय बाँब
कशासाठी चाललेय युद्ध
जानमालाचे नुकसान
किती झाले असेल
हे आजचे आहे की जुने

दिसत तर नाहीय कुणी
खूप उंचावरून पाहिल्याने

आणि तपशील
कळून तरी
काय पडणार आहे फरक
माझ्या वा कुणाच्याही जगण्यात

खूप दिवसांत ससा
दिसलाच नव्हता मात्र

असो
झोपायला जावे आता
--- ००० ---

## झुरळ

माझ्या बाथरूमच्या आरशाचा
वरच्या उजव्या भागातला थोडा पारा उडाला आहे
आणि त्याचे झाले आहे एक झुरळ
कायमचे उपस्थित

ते झुरळ आहे हे फक्त मलाच माहीत आहे
इतरांनी कुणी त्याला भिऊन
किंचाळायचा प्रश्नच नाही येत

ते माझ्या सर्व दिनारंभांना साक्षी असते
हसते मला शुभेच्छाही देते

मी संध्याकाळी परततो तेव्हा
अचूक त्या वेळचा माझा मूड
ते पकडते आणि सोबत राहते

माझ्याशी कोणताही संघर्ष न करणारे
सतत मला अनुकूल असणारे आणि
मला पाहताच सचेतन होणारे
असे कुणी वा काही हवेच होते जगण्यात

पण हल्ली हल्ली वाटते च्यायला
ही तर सतत माझी कॉपीच होतेय
चिडवत टवाळी केल्याप्रमाणे

त्यापेक्षा बायको बरी
ती नक्कल करत चेष्टा तरी नाही करत
या विचाराने तिच्यामाझ्यातले वातावरण
जरा सुधारत चाललेय

पण ते झुरळ काही पिच्छा सोडतच नाहीय
या विचाराने आता
त्याच्यामाझ्यातले वातावरण बिघडत चाललेय
--- ००० ---

## शब्दाबाहेर

शब्दाबाहेर न जाण्याचे कौतुक
मुळीच नको आहे या कवितेला
सर्वांच्याच शरीरांबाहेरच
असणार आहे हिचे जगणे

वर्षानुवर्षे जोपासणे चालू आहे
कविता म्हणजे मनाची बटीक असल्याची अफवा
जगणे म्हणजे फक्त राजकारण
असे म्हणणाऱ्यांकडून

दु:खी राहा हिंसक राहा
कविता म्हणजे हरेक क्षणातून टपकणारे रक्त
असे मानायला लावायचे राजकारण
खेळत आलेत सर्वच टोळीबहाद्दर

ही कविता दाखवेल
या जगाबाहेरची शांतता
जी आहे खुद्द प्रत्यक्ष जगणे
कधीच कोणताही शब्द न मोडता
--- ००० ---

वाद

कुणी म्हणाले दगडवाद कुणी फूलवाद कुणी
मूर्खतावाद कुणी स्वप्नवाद कुणी मनवाद कुणी
शरीर कुणी मनू कुणी मंडल कुणी कमंडल
कुणी तराजूवाद कुणी तलवारवाद
कुणी वृत्तबद्ध, कुणी मुक्त कुणी स्वच्छंद कुणी शून्यवाद
--- अशा खूप भेदाभेदांचे साहित्य आणि त्याची चर्चा
आणि कोणत्या गटांनी निर्मितीत आघाडी घेतली तेही

पण या सगळ्यांतून सर्व माणसांसाठी प्रस्तुत
असा एकच काही प्रवाह असेल का असे विचारताच
सगळेच म्हणाले साहित्य म्हणजे तुकडे तुकडेच असणार
तुकड्यातुकड्यांना तुकड्यातुकड्यांनी आपले वाटणारेच
कुठेच काहीच पूर्ण नसते तर साहित्यात कुठून असणार

हा समारोप पटल्याने सर्वजण
आपापल्या मार्गांनी निघून गेले
सर्वांचाच एकाकीपणा तीव्र झाला होता
--- ००० ---

किस

सारख्या हृदयाच्या गप्पा नकोत
कधीतरी खेड्यातल्या स्टँडवरचा
चहा आठवा जेव्हा तुमची जीभ भाजली होती
भूतकाळाप्रमाणे आदल्या दिवशी तुम्ही होता
मुंबईतल्या चौपाटीवर जिथे तुमचे तारुण्य
ओढून नेले होते ओहोटीच्या लाटेने
आणि तुमचे आयुष्यातले सगळे आजारपण
फेस होऊन परतले होते
कित्तीजणांनी सांगितले तुम्हाला
जीवनेच्छा बाळगा जीवनेच्छा बाळगा
तर तुम्ही मधुबालाचे गाणे म्हणत
गाडी गाडी खेळत बसलात

आणि आता वेळ निघून गेल्यावर म्हणताय
माझे तुझ्यावर खूप प्रेम आहे माझे तुझ्यावर खूप प्रेम आहे
हवे तर एक किस घ्या आणि फुटा आता
--- ००० ---

## आयुष्यातला सगळ्यात वाईट दिवस

एक नातेवाईक कुटुंब माझी पत्नी आणि मी
सिनेमाला गेलो होतो त्यांची तिकिटे काढलेली होती
आमची काढायला मी पाकीट काढले तर
पुरेसे पैसे नव्हते परत जाऊन
पत्नीकडूनच आणावे लागणार होते
मी लांब होतो तिच्याकडे आहेत का
ते विचारावे म्हणून मोबाइल काढू म्हटले
तर तो खिशात नव्हता त्या ऐवजी
एक त्रिकोणी डबी होती तीत पत्नीचाच फोन आला
माझा मोबाइल तिच्याकडे असल्याचे तिने सांगितले
पैशांचे विचारायचे राहिले आणि आता
मी माझी दुचाकी कुठे पार्क केली होती
तेच आठवेना एरिया नुसता आठवत होता
वाटेत सारखे कुणी ना कुणी भेटे सगळ्या स्त्रियाच कशा
एक ओळखीचा बुटका तरुण भेटला
मला द्या किल्ली मी आणतो तुमची गाडी म्हणाला
म्हटले आधी ती शोधायला हवीय चल शोधू
बेचाळीस एकवीस नंबर बघ तेवढ्यात लघवीला
जाऊन यावे लागले तिथेही दोन स्त्रिया भेटल्या
एक तर नकळत अंगचटीलाच आली
बाहेर पडून पुन्हा शोध सुरू केला
त्याच बोगस डबीतून पत्नीला कळवले की तुम्ही
या बघून सिनेमा मला नाही येता येणार
गाडी सापडतच नव्हती मला वाटते तो तिकडचा
असणार तुम्ही गाडी पार्क केलेला एरिया तो तरुण
म्हणाला पुन्हा एक स्त्री भेटली मी पुलप्स खूप
काढतो असे तिला सांगितले ती हसली
आजच्या इतका वाईट दिवस माझ्या आयुष्यात
कधी गेला नव्हता मी त्या तरुणाला म्हणालो
जाऊ द्या हो होते असे चला तिकडे बघू तो म्हणाला
आणि जाग आली म्हटले मरू दे
सगळ्यात वाईट दिवस स्वप्नात घडून गेला
पत्नीला सांगितले तर तिने नाराजी दर्शवली
मग नेहमीप्रमाणे चहा आणून दिला

--- ००० ---

कळणे न कळणे

मी अर्थ लावला म्हणजे मला तुझा हेतू कळला
असे नाही होत हे मला कळते पण अर्थच न लावता
जगायचे कसे हे नाही कळत तुला काय
किंवा मला काय कळण्यापेक्षा
आपले कळून घेणे अव्याहत चालू आहे
हेच हवे असते तू लावलेले अर्थ तर
बऱ्याचदा मला  माहीतही नसतात
तरीही मी जणू तुला पूर्ण ओळखून असल्याप्रमाणे
तुझ्या मनाचेही नकाशे बिनदिक्कत
सादर करतो तुझ्यापुढे तेव्हा तू म्हणतेस
की मी चुकीचे अर्थ का लावतोय हे तुला कळते
आणि याचा पाया म्हणजे आपल्यांतले प्रेमच
असे तू निरागसपणे आणि अभावितपणे म्हणतेस
आणि याचेही काही हेतू तर नसतील
असा एक अर्थ लावण्याचा मार्ग येतोच माझ्या मनात

मी किंवा तू चुकीचे जर का समजून
घेत राहिलो एकमेकांना तर अर्थातच
ते म्हणजे हे नाते न कळताच संबंधात राहणे होईल
मला तर असेही वाटते की ही शंका
तुलाही येत असणार पण संबंध संभाळण्यासाठी
तू ते न कळणे स्वीकारत असणार

म्हणजे आता कळतेय मला सगळे
चालतेय तुझ्याच मनाप्रमाणे जरी कळून घेण्याचे प्रयत्न
माझे जास्त असले तरी आणि हे तुला कळत असणारच
त्याशिवाय का तू निश्चिंत आणि समाधानी राहू शकतेस

मलाही तुझ्यासारखे जमायला हवे फार
कळूनच नाही घ्यायचे पण कळलेय
असे समजून निवांत राहायचे
फार तफावत पडू न देता

हेच ते तुझे न भांडता न कळता जिंकत राहणे
--- ००० ---

## दोन्ही

पोकळी जर अमर्याद असेल तर तीत
ग्रह तारे वस्तू माणसे मने
असूच नाही शकणार कारण त्या गोष्टी
जर बिनपोकळी असतील तर
पोकळी मर्यादित होईल
म्हणजेच पोकळीला वस्तूंच्या मर्यादा
असे होईल किंवा मग वस्तू स्वतंत्रपणे
आहेत मर्यादित आणि बाकी बाहेर
पोकळी अमर्याद असे म्हणावे लागेल
तेही खोटे ठरेल कारण वस्तूंप्रमाणेच वस्तूंमुळे
पोकळीही मर्यादित म्हणजेच तीही वस्तूच ठरेल
म्हणजेच विश्व हे एक तर वस्तूरूप आहे
वा निव्वळ पोकळी म्हणजे काहीच नसणे आहे
दोन्ही एकत्र कसे असेल ?

आणि समजा असेल सगळेच वस्तूरूप
तर घटना घडवण्याचे किंवा सुखदुःख
भोगण्याचे मनाचे स्वातंत्र्य म्हणजे काय ?
--- ००० ---

## भ्रम

मी अशा भ्रमात आहे की माझ्या खूप कविता
जागतिक दर्जाच्या आहेत म्हणजेच मुख्य म्हणजे
इथल्या सगळ्यांना तर त्या आहेतच प्रस्तुत

हा भ्रम स्वीकारणारे आणखी कुणी नाही भेटले
माझे कपडे वाळले की ते इस्त्री करून
मी तयार ठेवणारच ना तुम्ही म्हणालात
की मुळात मी कवीच नाहीय चालते ना
माझा आग्रहच नाहीय की माझ्याच
कंपनीचे लोणचे विका म्हणून किंवा
माझा नंबर तुमच्याकडे सेव्ह करून ठेवा असाही

समजा माझ्या कविता पोचल्याच नाहीत कुठे
सर्वांनीच आपापले फोन सायलेंटवर टाकले
तरी त्यात मी वा माझ्या कविता नष्ट नाही होत
माझा भ्रम मी चालू ठेवला की
तुम्हीच नष्ट होता

संग्रह नाही बक्षिसे नाहीत अध्यक्षपद नाही
कवी म्हणून कुणी पाहात वा ओळखतही नाही
चलेगा यात माझी हार नाही होत पण मी
मी माझा भ्रम चालू ठेवण्यात मात्र तुमची हार आहे

माझा भ्रम आवडणारे आज ना उद्या कुणी
भेटतील वा जन्माला येतील कवितेबाबतच्या
इथल्या प्रचलित भ्रमातून बाहेर पडतील
नंतर ते माझ्या कविता विसरून गेले तरी चालेल
--- ००० ---

एखादा अर्थ

मी हुंगत असतो असा एखादा अर्थ
जो करेल गवताचे रूपांतर ढगात

का बाबा असे करायचेय तुला
तर जे आहे ते सगळे विचारात जिरतेय म्हणून

विचारात जिरणे का बाबा वाईट
तर मन एकाच ठिकाणी थांबते म्हणून

समज तुझी जीभ झाली पक्षी
तर समुद्र आनंदी होईल का

मन थांबले की जग थांबते
सगळे अर्धवट राहते शत्रुत्व येते

हे नुसतेच या ऐवजी काहीही
असे नाही वाटत का

काही माहीतच नाहीय कसा होईल
प्रत्येक परिस्थितीचा खरेपणा नाहीसा

का नकोय तो खरेपणा जिभेचा
कारण ते होतेय नुसतेच विचारांचे गवत

जगायचे तर आहे पण समुद्र नको आहे
ढगाचा आकार पक्ष्याचा असायला हवाय

आहे तेच चालू ठेवायचेय या विचाराबरोबरच वाटते
की मग ते काल्पनिक कशाला हवेय असू दे

आहे ती परिस्थिती खड्डे बोंब मारामाऱ्या
आणि अव्याहत दुरुस्त्या करत राहण्याचे धंदे
--- ००० ---

याहून नवे काही

अनुभवाची पाळेमुळे कितीही मोठ्या
जगातून येत असली तरी
मी माझ्या दाढेमागे ठेवलेली
माझी प्रिय तंबाखूगोळी
ही माझ्या पदवीप्रमाणे मला
सुरक्षितता पुरवत राहते

हलकेच उमलू दे फूल वा
लोखंडाचे असू दे वर्तमानपत्र
मी तुझ्या आठवणीचा अनुभव
करून घेतो सदोदित
परिचयाचा जसा समोरच्या
फांदीवरचा कावळा

आणि मला माहीत आहे
तुला आवडते ही माझी दगडी आसक्ती
माझ्या पूर्वजांसह माझ्या
सर्व प्रवासाची नोंद असलेली

हेच असे विसरणेच तर हवे असते तुला

आणि तुझे समक्ष असणे तरी काय असते
दिसतेच ना तुझ्या डोळ्यांतून
तुझ्या घराची उघडी टाकलेली
सर्व कहाणी आणि आधीच उडून गेलेल्या
तुझ्या भूतकाळाची रिकामी जागा

आपण दोघेही वाट पाहात असतो
याहून नवे काही घडण्याची
अज्ञात पण सनसनाटी
--- ००० ---

## आईसक्रीम

धर्मस्थळांच्या इतिहासभूगोलाबरोबर
जी शांतता भासते
ती पाहता जातींच्या चिंध्या
आणि पंथांचे बांध
काढून टाकले जातात
मनाच्या अवकाशातून
कारण अंधारात जरी होत असले बलात्कार
तरीही भाषेला धारही असते आणि फासही
असतात शंभर वर्षांनंतरही वाचा फोडणारे

मनाला मार्गच नाही राहात आळशी होण्याहून
आळस आणि शांतता दोन्हींना मिळते आईसक्रीम
--- ००० ---

## अंतिम पायरी

कोणत्याही कारणाने
मोडत गेलेल्या खुर्च्या
म्हणजे उताणे पडलेले बगळे
चंचू तशीच उघडीवाले

पांढरा मृत्यू तारुण्यातले
उघड करतच असतो रहस्य
स्त्री वश होण्याचे कोणतेही
फलक न लावता
एका शोकात्मिक सांभारात
पडावी स्वप्नाची इडली तसा

तिचे अनुकूल अत्तर
सांगावा धाडते
ऐकलेल्या सर्व मैफली
स्थगित करण्याचा
आठवणींचे पूर्ण क्षेत्रच
तिच्या स्तनांवर गोंदण्यासाठी

आता मात्र अंतिम पायरीच
बाकी असते दुविधा संपवण्याची

तिला घाई नसते
प्रश्न कुणाचा असणार
उत्तर कोण देणार
याचा कोणताही ताळमेळ
नसलेले बगळे
असतात अबोल
आणि ती बसून असते एका
मोडक्या खुर्चीवर सामाजिक

वाट पाहण्यात
नुसतीच तीव्रता वाढत राहते
अंतिम पायरीवर
--- ००० ---

ताबा

हलकेच माझे विश्व
विरळ होत जाते
अवतीभवतीच्या हिरव्या रंगाने
मला आठवेनासे होतात
मला लहानपणी भेटलेले
सगळे शिल्पकार
जे खोदू शकत
मनांचे दगड
आणि थांबत
तेच काम करत

कविता अडकून पडू नये विचारात
म्हणून मी ताबा दिला सोडून
सततच्या उद्वेगावरचा

क्षणभर घाबरलो
--- ००० ---

प्रेयसी आणि कविता

मी बोलत असतो सगळे
प्रेयसीबद्दल सेक्सी उत्तेजक मनमुराद
पण शेवट करतो कवितेचा कवितेवर
जणू ही कवितेचीच होती कविता

मी कवितेचा खूप बारीक विचार करणारा
सभ्य सज्जन बिनढोंगी खरा
वाटतो लोकांना ते म्हणतात
त्यांना माझ्या
कवितेवरच्या कविता खूप आवडतात
कारण त्या उद्बोधक तर असतातच
शिवाय त्यांतून घेण्यासारखेही खूप असते
तो एक वेगळाच अनुभव असतो
मनात पुन्हा पुन्हा घोळवत ठेवावा असा
सांस्कृतिक जगणे समृद्ध करणारा
शिवाय त्यातून
कविता म्हणजे काय तिच्या
येण्यासाठी आतुर असणे म्हणजे काय
सतत तीच मनात असल्याशिवाय
कशी ती प्रसन्न होत नाही हेही कळते

इथे मिठी म्हणजे असते शब्दांची तीव्रता
इतके स्पष्ट सगळी आतली बात
उघड करणारे असूनही
किती संयमशील

आम्हाला हा कवी एवढ्याचसाठी आवडतो
की हा छक्केपंजे नाही करत
आम्हाला हवा तसा अगदी आमच्यासारखाच
नितळ नैतिक पण नेमका आणि मर्यादशील आहे

हीच कविता एखाद्या चीप कवीने लिहिली असती
तर ती त्याच्या प्रेयसीबद्दल असती
--- ००० ---

अ-विचाराने लिहिलेली कविता विचाराने दुरुस्त नाही करायची --

भावगीते

माझा मोबाइल विरघळणारा होता
पुरावा सहज नष्ट होईल असा
त्याच्या आत होते विचारांचे जंगल
मसाज करून घेताना फक्त
त्या विचारांचे रंग बाहेर येत
आणि वेडच लावत तरुणींना
कारण त्यांतून त्यांना ऐकू येत
भावगीते आणि मध्ये मध्ये
झालेली एक एक कुजबूज
गवतातून सापाचे जोडपे
गेल्याप्रमाणे निर्भयपणाने

फॉर्मस भरणार तरी किती म्हणून
सरळ राजीनामे देऊन टाकले
तीन सल्ला पदांचे आणि दोन
कवींच्या संघटनांचे
कारण ते भित्रे होते लपूनछपून
लिहिलेल्या कविता ते निनावी म्हणून
देत किराणा दुकानदारांना
पैशांऐवजी

कायमची गुप्त राहतील
अशी मने सोबत असल्याने
विद्यार्थी-विद्यार्थिनी सरळ जात
आखुड पोषाखांत पोहायला

मानवी जगण्याचा जणू आता
एकच प्रश्न उरला होता शेवटचा
एक तर मने खुली ठेवून धोके पत्करा
किंवा मग त्यांना ठार करून
म्हणत बसा अव्याहत भावगीते
--- ००० ---

ॲन सेक्सटन चा खेकडा

ॲन सेक्सटनने तर कधीच केली आत्महत्या
तिला सहन नाही झाला त्या
काळीज करकचून पकडणाऱ्या खेकड्याचा छळ
पण ती माझी प्रिय मैत्रीण आहे
कारण त्याच खेकड्याचा अनुभव मीही घेतो
ती आणि मी एकत्र जगतो
आम्ही फक्त दोघेच नाही तर सर्वच
भूतकालीन आणि भविष्यकालीन कवी
खेकडेग्रस्त

खेकड्याच्या हुकमतीतल्या अर्थांना
आमच्यांतले बरेच कंटाळलेत
ते अर्थही छळवादच आहेत हे त्यांना कळते
आणि त्या अर्थांचा कंटाळा टाळण्यासाठी त्यांच्याबरोबर येणारे
संगीत सौंदर्य आणि अलंकारांचे झळाळते भूलभुलैये

मग आधी ते वळू इच्छितात पूर्ण
निरर्थकतेकडे
जी अर्थातच सोडून देते सर्व आभूषणे
ज्यांच्या पकडीतून सुटलीच नाही
ती माझी प्रिय मैत्रीण

खेकड्यांचा हुकूमच आहे
त्यांच्या प्रदेशाबाहेर कुणी जाता तर कामाच नये
पण तसा विचारही करायचा नाही

घाबरलेले सर्व खेकडेप्रेमी विरोध करतात
निरर्थकतेला
निरर्थकतेच्या कवींना बहिष्कृत करत
ते राहू इच्छितात खेकड्याच्या पकडीत आत्मतुष्ट
खेकड्याच्या विरोधात जाण्यातला धोका पाहून
ते सजवतात त्यांच्या कविता स्वत:च्या आणि
एकमेकांच्या सुंदर अश्रूंनी आणि सुरेल रुदनांनी
--- ००० ---

## सटासट सॅल्यूट

तो आला की सटासट सॅल्यूट पडत
सटासट म्हणा की खडाखड पण त्याचे लक्ष नसे
तो गढलेला असे शौर्य आणि जिंकण्याची इच्छा
आणि भीती आणि या जगाची
अशीच मारायला हवी या भावनेत
आणि घाईत असे तो हे इथले एक उरकून
जायचे असे त्याला एका जिगरबाज कामगिरीवर

लहानपणी होळीसाठी काही गोवऱ्या
वा काही इकडेतिकडे पडलेले लाकडी सामान
एकदोन मित्रांसह तो चोरून आणे आणि मित्रांसमोर
आपल्याला काहीच नाही त्याचे विशेष
असा चेहरा ठेवे मित्रांना खूप आदर वाटे
काहींना भीतीही वाटे त्याची

आपण त्याच जगण्याला जोडून आताही जगतोय का
हा विचारही मनात येऊ द्यायला त्याला वेळ नसे
खरोखरच्या सततच्या कामांमुळे घाईत असणारा माणूस
हाच खरा आजच्या जगात आजच्या जगाचे जगणे जगणारा
ही त्याची आपोआपच धारणा असे
भरपूर पैसा भरपूर चैन आणि अनेक
देश-धर्म-जातींच्या एकापेक्षा एक स्त्रिया
आणि या सगळ्यासह एक सुरक्षित अविचल
हवामान आतबाहेर तीव्रतेचे प्रसंग सोडता
हेच त्याला आपोआप अंगवळण वाटे

लोगोंमे जिगर नही होती मन छोटे होते हैं उनके
वरिष्ठाला सलाम ठोकणे आणि तो येताच शेपट्या हलवणे
हे मान्यच करावे लागणार अशांना मरायला घाबरणे
म्हणजे सामान्य किडामुंगी असणे
हे तो सहज समजून असे

लोकच काय त्याची बायकोमुलेही
त्याला घाबरून राहात
--- ००० ---

लोकशाही

सर्वांचे सात्त्विक चेहरे पाहून
जनता सद्गदित होते रडूच येते तिला
काय हे प्रसंग येताहेत बिचाऱ्यांवर
दोष तर कुणाचाच दिसत नाहीय
कोणती नियती का घडवत असेल हे
या विचाराने जनता
सर्वांसाठी प्रार्थना करते

प्रत्येक वेळी असेच होते
बिचाऱ्या जनतेला सर्वांचेच पटते
सर्वांनाच निवडून आणावे
असे तिला वाटत असते
पण लोकशाहीला मर्यादा असते
किंबहुना हा तिचा दोषच असतो
प्रत्येकाला एकच मत उपलब्ध असते

इथेच आधी मारले जाते
जनतेचे विचारस्वातंत्र्य
सर्वच भाषणांना गर्दी करून
सर्वांनाच टाळ्या वाजवणे वाया जाते
जनतेला वाटत असते की या
सर्वांवर प्रेम करावे या सर्वांच्या इच्छेप्रमाणे
होऊ द्यावे राज्याचे भले यांतले
कुणीच उपाशी राहू नये

लोकशाहीच्या या अंगभूत त्रुटीमुळेच
ते सर्व सात्त्विक होतात बिचारे एकमेकांचे शत्रू
आणि कधी याचे कधी त्याचे ऐकून
जनतेलाही स्वीकारावे लागते विभाजन

आपले भले करण्याची इतकी तळमळ
असलेली ही माणसे पाहून आषाढीकार्तिकीला
सर्व जनता त्यांच्या भल्यासाठी प्रार्थना करते
--- ००० ---

पापी आणि नंगे

सगळेच पापी असतात सगळेच
नंगे असतात सगळ्यांचीच फाटलेली असते
कुणाचे काही दिसू लागले तर
सहानुभूती बाळगा झाकून न्या
बिचाऱ्याच्या भागाचे प्रदर्शन नको
आपपर भेद नकोच कुणीच
कुणाचेच काही उघडे पाडायचे नाही

येशू म्हणाला होता ना की जो
स्वत: पापी नसेल त्यानेच फक्त दगड मारावा
तर सगळेच दगड गळून पडले होते
खरे तर ती स्वत:लाच केलेली माफी होती

पण म्हणजे काय तहहयात अमरपणे
याच नालायकांना करू द्यायची पापे
आणि आम्हीही पापेच करणार असलो तरी
इतरांचे भले आम्ही यांच्यापेक्षा जास्त
करणार आहोत याला काहीच नाही महत्त्व
असे कसे होईल

मुख्य पाप खरे तर अज्ञान किंवा
सफाईचा वा कार्यक्षमतेचा अभाव हे आहे
ज्याच्यामुळे कुठेतरी काहीतरी उघडे पडते कुठेच
काही पाप घडतच नसल्याप्रमाणे
चालायला हवे सगळे मग प्रश्नच नाही येणार

आपण सुखात जगतोय हे सांगणे दाखवणे जसे
महत्त्वाचे असते तसेच सगळे वातावरण पुण्यशील
ठेवता यायला हवे यात फार तर एकदोन टक्के मरतील
सगळेच काही प्रमाणात दु:खी होतील पण शेवटी
कर्मण्येवाधिकारस्ते हे तर पटतेच ना सर्वांना
शिवाय भ्रष्टाचार वाईट महिलांचा सन्मान
एकच काळजी घ्यायची सर्वांनी
पूर्ण जनतेने नोटा पर्याय वापरू नये म्हणजे झाले
--- ००० ---

शंख

कधीकाळी समुद्रकिनाऱ्यावर
एका नाजुक संध्याकाळी
सापडलेला नक्षीदार शंख किती दिवस
तसाच राहील मनाच्या कुपीत
हे सांगता नाही येणार
त्याचे रंग बदलतील त्याला
भाषानैपुण्य प्राप्त होईल
तो वेगळ्याच पक्कतेने चमकू लागेल
बहरूही लागेल एखाद्या
वेगळ्याच अनपेक्षित प्रदेशात
जगण्याच्या ओघात अवतरलेल्या

त्याला ती वाटेल त्याची सहज
उत्क्रांती वाढ नियतीची देनही कदाचित
त्या प्रदेशावर फिदा होत
तो विसरूनही जाऊ शकतो
जुन्या आणाभाका मिठ्या आणि चुंबने

पण इतरांप्रमाणेच त्यालाही नसते भान
की तोही एक तुकडा आहे मन नावाचा
मृत्यूनंतरही
स्वतंत्रपणे वाढत राहावा तसा
आयनेस्कोच्या ॲमिडीच्या संसारातले
प्रदीर्घ रहस्य बनून

तो घेरला जाणारच असतो
विश्वास अविश्वास निष्ठा प्रतारणा
व्यभिचार क्रौर्य आणि बेफिकिरी
आणि आत्ममग्नता यांच्या जंजाळात

आणि त्याचा निकाल लागणे कधीच
अवलंबून असणार नसते कोणत्याच निर्विवाद
सत्यावर
सर्वच स्त्रीपुरुष स्वेच्छामरणी असल्यामुळे
--- ००० ---

वास्तव

यांना वाटते असेच घडेल
तसे घडूच नाही शकणार

त्यांना वाटते अमूकच घडेल
तमूक घडूच नाही शकणार

कधी यांचे अंदाज खोटे पडतात
कधी त्यांचे अंदाज चुकतात

वास्तव आपल्याला हवे तेच असेल
आपल्याला हवा तोच आकार घेईल

असे यांनाही आणि त्यांनाही
वाटत असते खात्रीच असते

वेगळेच काही दिसू लागले तर
त्या त्या वेळी दोघेही बिथरतात

भ्रमच तयार करतात तीव्र
खरे काही वेगळेच असल्याचा

मग वास्तव राहते कडेला
भ्रमांचेच राज्य सुरू होते

वास्तवाधारित अपेक्षांच्या संघर्षांहून
वास्तवाधारित भ्रमांचे संघर्ष

होतात अधिक तीव्र अधिक हिंसक
जात धर्म आयमाय निघतात

भूतकाळ उकरले जातात
वर्तमान आणि भविष्यही उकरले जातात
--- ००० ---

विचार

काहीच नाही राहात जसे च्या तसे
बरे असो की वाईट हे तत्त्व
टिकून राहण्याला नेहमीच आव्हान देते
पण माणसाचा विचार फणा काढतो
मी तर निसर्गाचा स्वामी मी
टिकवून ठेवेन सर्व फुले प्रेते
माझ्या घट्ट पकडीत तो म्हणतो

त्याच्या ताणाचा किडनीवर होतो परिणाम
ती फेल होते किंवा हृदयावर
तर हृदय फेल होते

विचार एक वेळ मरायला तयार असतो
पण हार मानायला नाही
नष्ट व्हायला नाही

विचार मरेपर्यंत जिवंत राहतात
प्रेते फुले

हे सगळे बोधप्रद उपलब्ध असते
तत्त्वज्ञान धर्म आणि कवितांतून

विचाराला
तेही टिकवून ठेवायचे महत्त्व असतेच
--- ००० ---

जाँच

हा चांगला तो वाईट
हे दोघांच्याही पाठीराख्यांचे
आधीच ठरलेले असते
आवश्यक त्या अनुकूल माहितीवर आधारित
ते पाठिंबा देत राहतात
दोघांचीही माहिती दोघेही खोडत राहतात
पण एकनिष्ठ तत्त्वशील पाठीराखे अडिग
राहतात दोघांनीही आपापल्या मतांप्रमाणे
कोण श्रेयस्कर हे पक्के ठरवलेले असते
दोघांनाही उपरोध आणि कुत्सित हसणे
सारख्याच कार्यक्षमतेने जमत असते

मते कुणाची बरोबर याचे सत्य सांगायला
कोणताही देव कधीच अवतरत नाही
आणि त्या त्या वेळी दोघांनीही स्वीकारलेली आणि
एकमेकांकडून खोडली गेलेली माहिती
खरी की खोटी याची जाँच कोण करणार
ते काम सीबीआय एटीएस वा ईडी
कुणाच्याच कक्षेत येत नाही

हे आणि ते एकमेकांना घटनाद्रोही म्हणतात
पण सिद्ध काहीच होऊ शकत नाही
सर्व संघटना कायदामान्यच असतात

तरीही काळाच्या ओघात काही सिद्ध होते
काही प्रभाव यशस्वी होतात
विचारस्वातंत्र्याचे मूल्य
कार्यरत राहात
सहिष्णुतेला वाव देत राहते
--- ००० ---

## अनावश्यकतेची गरज

चंद्र आपल्याला वाटते आहे तिथेच आहे
पण तो हळूहळू अस्ताला जात असतोच
सगळे विश्व पशू पक्षी प्राणी विशेषत: माणूस
हे काही निर्माणच नसते झाले
तर हे निर्माण झालेच नाही
हे कळलेही नसते कुणाला
मग कशाला ही कोट्यवधी
तपशीलांची शिस्त ना कुणाचे
बॉसिंग असणार होते ना कुणाला
बोलणी खावी लागणार होती
इतक्या या तपशीलवार अनावश्यकतेची गरजच काय होती
बारा डोळ्यांचा माणूस कधी हा चंद्र पडून दुसराच येणे
कधी आकाशातून लाव्हा पडणे असा केऑस अराजक असते तर

माणूस करतो कौतुके पहाटेच्या पक्ष्यांच्या किलबिलाटाची
आणि स्वत:च्या संवेदनशीलतेचा अभिमान बाळगत
विषमता जोपासतो युद्धे करतो एक इंचही भूमी
कुणाला घेऊ नाही देणार म्हणतो आणि एकमेकांच्या
स्वार्थीपणाबद्दल क्रोधाविष्ट होतो जिथे शक्य असेल तिथे
स्वत:ची नि:शंक सात्त्विकता आणि मूल्यनिष्ठा
विजयी करण्याचे प्रयत्न करतो आणि स्त्रियांनाही
न्यायाचे जगता यायला हवे असे वर्षानुवर्षे म्हणत राहतो

काहीजण म्हणतात या व्यवस्थेत राहूनच
ही व्यवस्था बदलायला हवी
--- ००० ---

मूड

कोणताही मूड तयार होणे
शरीरातल्या प्रवाही प्रक्रियांना
अडथळा करते
मनातला सगळा कचरा
उन्मुक्तपणे बोंब ठोकून बाहेर फेकणे
म्हणजेच असते ' तुका टाकावा थुंकोन '
ही होळी तर रोजच सततच
घडायला हवी याचाच अर्थ
पौर्णिमेचा चंद्र कितीही सुंदर असला
तरीही तो मनात साठवण्यासाठी
हावरटपणे वचावचा
खात राहिल्यास नक्कीच
बीपी बिघडेल

चंद्राप्रमाणेच कविता फक्त असते
तिला अर्थाचा मूड द्याल तर
अर्धांगाच्या दिशेने जाणेच ते

या सत्याच्या कवितेला लोकप्रियतेचा मूड नकोच असतो
--- ००० ---

सत्ता

नीती आणि अनीती यावर
ओशो म्हणतात तुमची
कृती नाहीच महत्त्वाची
आत्ता जे आहात ते नसा
मग प्रश्नच नाही राहणार

व्यक्ती तर येतात एकत्र
पण समाजदूरी राखत
राहतात संसर्गहीन
पण मानसिक संसर्ग छळत राहतो
न दिसता कुणालाही न कळता

प्रतारणा म्हणजे मनात
अपराधी भाव बाळगत
प्रेम करणे अर्धवट रत होणे
तेव्हाचे ते गेले आत्ताचे हे पूर्ण
हे तर सरळ निष्पापच

करो अनाचार वाचे हरिनाम उच्चार
हो का भलते कुळ शुचि अथवा चांडाळ
देव जोडे तरी करावा अधर्म
अंतरे ते कर्म नाचरावे
म्हणाले तुकाराम

सावित्रीचा भोक्ता दूरीचा पुरस्कर्ता
फाटत फाटत जगता जगता
ओशाळे हसत झेंडा जपता
ओशो तुकारामांना नमन करून
शिस्तीत मिळवतो आदर प्रेम सत्ता
--- ००० ---

सप्तपदी

वाऱ्यात सप्तपदीप्रमाणे चालणारे
वैराण विचार फेकाफेक
करू लागले सुभाषितांची
आणि माणुसकीच्या मूल्यांची
आणि स्त्रीकडे पाहण्याचा
दृष्टिकोण कसा बदलायचा याची
तेव्हा एखाद्या लहान स्टेशनवर
न थांबता धुरळा कागद उडवत
जाणाऱ्या प्रेतांची आठवण झाली

भोसडीच्यांनो एवढे जर समजतेय
तर अशी बोंब का चाललीय
तुमची आणि जगाची
यावर ॲसिड टाकून बघावे एकदा
असे स्वप्नही नाही का पडू शकत
तुम्हाला

पक्षी उलटेसुलटे उडतात
त्यांच्यावर तुमचा
काहीच नाही कंट्रोल
हेच जर शेवटी
सांगणार असाल तर मुळात
तुमच्या विचारातच खोट आहे
याची करा ना हेडलाईन

कशाला उगीच
तडफडत बसताय
--- ००० ---

तपस्या

उत्फुल्ल प्रसन्न ऊर्जादायी
नाराज वा खट्टू वा निराश करणारे
सगळे बाहेरून येणारे
अनुकूल प्रतिकूल प्रतिसाद
सगळेच तर मानसिक जगण्याचे
कोंभ अंकूर तरारते पीक वा बहरते वृक्ष
वा मुर्झा जानेवाले दिलके टुकडे

आपल्याच मनाची तर ही निर्मिती
कधी स्थळकाळाचे नेमके ट्यूनिंग जमलेली
तर कधी कमी वा जास्त वेगामुळे
हातातोंडाशी येता येता दिशा चुकून
हाताबाहेर गेलेली

बिनचूकपणा वा हमखासपणा कभी हां कभी ना
यांसह मन पाहिले की ना आत ना बाहेर
देवघेव झाली जगणे झाले तपस्या झाली
--- ००० ---

ओळख

ओळख झाली संवाद सुरू झाला
सहजच पक्ष्यांचे पंख
वगैरे विषय निघत गेले
भाषा कधीच आहे तशीच
एकसारखी नाही राहात
हा म्हटला तर भाषेचा दोष
आपला कसा म्हणता येईल

भाषेचे धागे हळूहळू सुटे होत गेले
प्रत्यक्ष विषय वेगवेगळे असले
तरी कळायचे ते कळत गेले
आधी जणू काही एकतर्फीच
सुटलेले बाण कुठून कोणते आले
ते नंतर कळेनासे झाले

तुलाही हे हवेच होते पण
स्वीकार न करता
माझी हरकतच नव्हती

भाषा खूपच निकट सलग
आणि क्षणांचे स्थापत्य
एकत्रितपणे घडवणारी
कधी झाली ते जणू कळलेच नाही
असा निसर्ग अबाधित राहिला

एकमेकांचे भूतकाळ आले सहजच
पण येतायेताच त्यांना कळत गेले
की इथे ते उपरे आहेत
जे जसे असेल ते तसे आहे
हेच फक्त प्रवाही राहिले

कोणतेही सवयीतले शब्द आले नाहीत
निष्पाप नाते म्हणजे काय
यावर एक शब्दही बोलला गेला नाही
तरीही नकळतच सगळेच

सफल संपूर्ण घडले
मनांचे पक्षी झाले

विश्वास या शब्दाची गरजच नाही भाषेत
अशी भाषा शुद्ध झाली
--- ००० ---

निसर्गकथा

आधी सहज चांदणे
मग कोवळे ऊन
मग वाढती प्रखरता
मग वारा
मग सोसाट्याचा वारा
मग ढग आणि गडगडाट
आणि मग मनसोक्त पाऊस
सर्वकाही लुप्त करणारा

हीच आपली वारंवार
निसर्गकथा
मग मोसम कोणताही असो
--- ००० ---

## खाई

देव असोत की मानवी विभूती
त्यांचा गवगवा करून लाखोंना
दुय्यमपणाच्या आणि आदर्शांच्या खाईत लोटून
त्या सर्वांची आद्यता घालवून त्यांना भूतकाळात गाडत
क्षुद्र जिणे देऊन आपली राजकीय उद्दिष्टे राबवणे
हा एक समाजमान्य गुन्हाच

लेखकाने त्याच्या आयुष्यात आलेली माणसे
त्यांची पात्रे करून स्वमतांच्या पुष्ठ्यर्थ वापरणे
बाजारगप्पांचे भांडवल घेऊन आणि व्यक्तींच्या जगण्यातला
इतरांना त्यांच्या भित्र्या रटाळपणामुळे वाटणारा
सनसनाटीपणा वापरून स्वत:चे लेखन
चमचमीत करणे कुणीतरी विश्वासाने सांगितलेली रहस्ये
स्वत:चे कल्पित म्हणून वापरत त्या व्यक्तींना ओशाळे करणे
स्वप्रदर्शनासाठी कुणाची बदनामी होऊ देणे हेही गुन्हेच

आणि बदनामी म्हणजे तरी काय तर या सगळ्या गुन्ह्यांतून
तयार झालेल्या भंगार मानसिक साच्याला धरून नसणे
--- ००० ---

महायुद्ध होईल का

बरा होऊन इस्पितळातून डिस्चार्ज मिळून
घरी आलेल्या रोग्यामुळे तुम्हाला आनंद नाही का होत
तसेच आहे हे शिक्षेचा तुरुंगवास भोगून झाल्यावर घरी परतणे
जल्लोष होणारच मिरवणूक निघणारच याला तुम्ही हसता
कारण तो तुमचा स्वकीय नसतो तो किती चांगला आहे
हे तुम्हाला माहीत नसते त्याचा कोणताच फायदा तुम्हाला
मिळालेला नसतो त्याने रात्रंदिवस घेतलेले कष्ट तुम्ही
पाहिलेले नसतात तुम्ही हेही नाही पाहात की तो
राजकीय षडयंत्राचा बळी झाला होता आरोप खोटे होते
पुरावे आणि साक्षीदार सहज हवे तसे घडवता येतात
उत्तम वकीलांचे कौशल्य करू शकते होत्याचे नव्हते
आणि मुळीच नसलेलेही सिद्ध होऊ शकते ठळक स्पष्ट
असल्याचे ही जगरहाटी आहे चालते सगळे घटनेला कायद्याला
धरूनच पण मानवी बुद्धिमत्ता तुम्ही नाकारू नाही शकत

त्यामुळे कोणत्याही पक्षाचा असो खून असो की बलात्कार आरोपी
राजकारणातला असेल तर तो राजकीय कैदीच समजला गेला पाहिजे आत त्याला तशी खास सेवा मिळाली पाहिजे आणि बाहेर आल्यावर त्या शिक्षेची नोंद त्याच्या बायोडेटात केली गेली पाहिजे आणि मुख्य म्हणजे त्यासाठी त्याला महिना लाखभर रुपये तरी निदान पेन्शन मिळाली पाहिजे राजकारणात असण्यासाठी किती माणसे संभाळावी लागतात कार्यक्रम अटेंड करावे लागतात मदत द्यावी लागते दारूपाण्याचे किती खर्च असतात या ताणतणावांतून थोडे रिलॅक्स होण्यासाठीही किती खर्च येतात हे तुम्हाला माहीत नसले तर जाणून घ्या शेकडोंना खुश ठेवावे लागते आधी बाहेरच्या बाहेर मिटवायची यंत्रणा लागते नंतर कोर्टाचे खर्चही जबरदस्त असतात चालते सगळे कायद्यानेच घटनेनेच विश्वास तर ठेवायचाच सर्व आधारस्तंभांवर पण सत्य वा असत्य शेवटी आपणच तर घडवणार
ये पॉवरकी बात है और रहेगी सत्यमेव जयते हेच तर शेवटी खरे असते

शार्प शूटर तर बाळगावे लागतातच पण मुख्यत: तुमचे मन शार्प हवे
खऱ्याखोट्याच्या चर्चा हिरिरीने पोटतिडिकीने जीव गहाण ठेवून
करता यायला हव्यात लाजायचे नाही आपले माणूस ते आपले माणूस
शत्रूंच्या मतांचा मुकाबला करायचे बेष्ट मनसुबे रचत राहायला हवे
फारच कधी शांततेची गरज पडली तरी एकटेपणा टाळायचाच आपल्याच टोळीत
जगात महायुद्ध होईल का यावर हसत-खेळत चर्चा करायची धिस इज लाईफ
--- ००० ---

माकड

कुणितरी विस्कटलेले
स्वप्नांचे ढीग
विचारपूर्वक दिशा
शोधू पाहतात

एखाद्या ताणाने बेजार
झालेल्या ऑफिसात
उगवावेत अचानक
रुमालांचे प्रेमबंध

तसेच आठवते जमिनीवर
वाहात गेलेले
भूतकाळाचे रक्त
खरीदलेले अंधारात

आता काळजीच नाही
असे म्हणत म्हणत
झोपी जाताना
तळपाय खाजत राहतात

उपाय नकोच आहेत
रहदारीत पडलेले
खेळण्यातले माकड
परत मिळाले की झाले
--- ००० ---

## लस

लस इज ए मस्ट
पंतप्रधानांनीही घेतली
दोन्हींमधली ही चांगली की ती
दोन्ही उत्तम कोणतीही घ्या
कच्चा माल पुरवठा
थांबणार आहे म्हणे
लसी आधी आणि नंतर
दोन दोन दिवस दारू बंद
गुठळ्या होतात असे ऐकले रक्तात
तिकडे तर म्हणताहेत
की हा रोग होऊन गेलेल्यांत
नंतर दर तीनातला एक
मेंदूदोषग्रस्त होतो
भीतीनेही सध्या
मानसिक गोंधळ वाढताहेत

काही विशेष त्रास नाही होत
घेऊन टाका
घेणे कधीही चांगले
नंतर खूप गर्दी होईल
आत्ताच घेऊन टाका
होऊ द्या हो नंतरही तो रोग
पण जीव तर वाचेल

हे ठेवत असतील का साले
ते नीट तापमानात
तसे नाही झाले
तर काय होऊ शकेल

रोग होऊन गेला लसही घेतली
तरी पुन्हा झाला जगण्यातच
अनिश्चितता आहे नियतीबियती सोडा
घेणे हेच बरे वाचले तर पाहिजेच
घेऊन टाका
--- ००० ---

कथा

तू आल्यामुळे आयुष्यात
पुढे कशी घडत गेली माझी कथा
हे मी सांगत असतानाच अभावितपणे
तू सांगू लागलीस याच कथेचे
तुझ्या जगण्यावर होत गेलेले
तुझ्या आप्तेष्टांना चकित
करणारे उजळ उत्साही उत्कट
तुझ्या दिसण्याचे परिणाम

तेव्हा अचानक
अवकाळी पावसाचे नेपथ्य
रचले गेले अजाणतेपणाने

तू सांगू लागलीस
तेव्हा आधी वाटले होते
या दोन वेगवेगळ्या कथा आहेत

ते जाऊ देत सगळे
पण आता
या दोन कथा एकच
असल्याचे दिसताच

काय होतील त्याचे परिणाम
याची खरेच तुला
जाणच नव्हती की आता

काहीही संभाळण्याचे
आपोआप
विसरलीच होतीस तू

माझ्या हातात काहीच नसल्याप्रमाणे
बचावहीन होत आपोआप
मी आक्रमक झालो होतो
--- ००० ---

## बाहुल्या

तुमच्या या एका प्रकरणाचे मोठे घबाड
पुराव्यांसह आमच्या हातात आले आहे
तसेच आमचेही काही तुमच्याकडे असेल
तर आधीच सांगा मग दोन्ही स्थगित ठेवू

असूनही न सांगाल तर होईल काय
आम्ही बिनधास्त तुमचे काढू बाहेर
आणि मग चिडून तुम्ही आमचेही काढाल
दोघांचेही नुकसान होईल ते टाळावे

आणि नसेलच असे काही आमचे सध्या तरी
तुमच्याकडे तर तसेही सांगा उद्या सकाळी दहाला
आमचा माणूस सिद्धिविनायकला असेल
तिथेच तुमचाही पाठवून तडजोडीचा मंत्र सांगा

आपण शत्रू नाही आहोत स्पर्धक आहोत फक्त
परिस्थिती बदलत असते फासे पडत असतात
योग्य वेळी योग्य कर्तव्ये बजावावी लागणारच
आपण शरण असण्याचे ठिकाण एकच आहे

तिथूनच हलणार सूत्रे सगळी तुम्ही समजा
तडजोडही नाकारलीत तर तुमचा
राजकीय शेवट समोर येईल त्याला
आमचाही इलाज नाही हे समजून घ्यालच

तुमच्या पोराला पाठवा आमच्याकडे
शत्रुत्व थोडेच आहे प्रगती करून देऊ
आपण कठपुतळी बाहुल्या आहोत
त्या त्या वेळी ते ते करतोच आपण

धर्म म्हणजे तरी काय डोके शांत ठेवून
हे सगळे न मम म्हणून करत राहणे
आमचे भविष्य सध्या आमचा ऊर्जितकाळ
सांगतेय मित्रच तर आहात सामील व्हा यात

--- ००० ---

बदल

हे प्रचंड
त्रासदायक आहे बदल
तर हवाच आहे पण कशात कसा
जग तर बदलतेच आहे क्षणाक्षणाला
तरीही ही असह्यता कसली
कुणाच्या बुद्धीने बदलायला हवेय
हे हजारो शाखांचे अगणित
विचारांचे उत्तरे
आधीच माहीत असलेले झाड

गुरु म्हणतात तुम्हाला हे नाही दिसत
की असे एक जगणे आहे जिथे
चालणे ही विश्रांती आहे
आणि थांबणे हा शीण

तुम्ही विश्वविरोधी जगता
ते सोडा लगेच
अन्यथा सगळे बदल असतील
फक्त आहे ते
टिकवण्याचे प्रयत्न

झालेला बदल तुम्हाला
तुमच्या ताब्यात असायला हवाय
आणि तुमचे शूटिंग
घेतले जायला हवेय
इतरांना दाखवण्यासाठी
तुमचे सस्मित झेन जगणे

तुम्ही नसतानाच्या जगात
तुम्ही जगू नाही इच्छित
पण तुम्ही असतानाचे जग
तुम्ही सहनही नाही करू शकत

निसर्गसौंदर्याचे किती कौतुक तुम्हाला
--- ०oo ---

आट्यापाट्या

आट्यापाट्यांचा खेळ
चालला होता मोकळ्या मैदानात
सुरुवातीला
या खेळाला तिचा नकार होता
आम्ही दोघेही चित्रकार असल्याने
त्यावर बोलावे एवढेच
असावे तिच्या मनात

मला तर केसांचे वळण
कपड्यांचे रंग या सगळ्यांतच
होते इंटरेस्ट पण तिला
लपायचे होते सुरक्षित नकारात
त्यामुळे सहजच
मी हा खेळ सुरू केला

चित्रांचे बोलता बोलता
मी स्त्रियांचे दिसणे
त्यांचा उत्साह त्यांची
फुलांची आवड
या विषयांकडे
नकळत गाडी वळवत
तिला उद्युक्त करू
लागलो नकळत
तरीही ती बरोब्बर वाट अडवत
राहिली माझ्या मनातले तिने
ओळखले आहे हे जाणवू न देता

असे होत राहिले होता होता
ती या खेळात सामीलच झाली
हे तिला कळले तरी नसावे
किंवा ते आवडत गेल्याचे
तिला लपवायचे तरी असावे

मी जिंकणार होतोच पण घाई नव्हती
--- ००० ---

## प्रिय शत्रू

कोव्हिड काय किंवा एडस काय
हे काहीच नाहीत त्याच्यापुढे
त्याच्यावर ना औषध ना लस
ना प्रतिबंधक उपाय
ना दृश्य संसर्गाची गरज

माणसे स्वत:च काळजी घेतात
त्यांच्या पिल्लांची की ती
जन्मल्यापासूनच बाधित होत जातील
त्या हमखास विध्वंसक विषाणूने
जो दिसूही नाही शकत
कोणत्याही प्रयोगशाळेत

त्याच्यामुळे लाखोंचे जगणे
हराम होते लाखो आत्महत्या करतात
लाखो मरतात वेडेपणात

त्याची लक्षणे ठायी ठायी असतात
पण ती सहज स्वीकारत सगळेच
म्हणतात संस्कृती बदलायला हवी
व्यवस्था बदलायला हवी
जुन्या रूढींतून बाहेर पडले की झाले

हे अमुक जातीमुळे झालेय तमुक
धर्मामुळे झालेय किंवा ढमुक हलकट
सत्ता गेली की सगळे नीट होईल

हा रोग तर हवाच तो तर
अपरिहार्यच पूर्ण मानवजातीलाच
पण त्याची लक्षणे नकोत दु:ख नको
हे असे टिकवण्यासाठी खूप लागतो विचार
विवेक बुद्धिप्रामाण्य तर्क वैज्ञानिक दृष्टिकोण
तसेच आदर्श श्रद्धा मते आणि उत्तरांची खात्री
या प्रिय शत्रूसाठी कुछ भी

--- ००० ---

लालची

मन माखले कुंकवाने आणि हार घालून
जगाच्या पायावर घातले माझी हत्या
झाल्याशिवाय मला कुठेही
सहभागी व्हायची बंदीच होती

घरसंसार मुलेनातवंडे
यांचा लालची मी मान्य करत गेलो
जगाने माझ्या मनाचे अनावश्यक
वाढणारे भाग कट करणे आणि मला
मापात आणि आदरणीय ठेवणे

मग जगाला त्रासच नको म्हणून
मीच आक्रसून घेत राहिलो
माझे विचार भावना
ज्यांच्यांत ग्रथित होते
माझे भविष्यातले तडीपार होणे

तरीही ही शिस्त न जुमानता
जे जे येत गेले मनात
जे जे दिसत जाणवत गेले
ते ते सर्व मी गुप्त ठेवत गेलो

सर्वांनी जगू दिले तितकेच
मी जगलो आणि जे काही
गुप्तपणे जगलो नको कटकट म्हणून
ते जगलोच नाही असे सत्य घडवले

कला संस्कृती यांच्या आवडी
समाजमान्य बाळगल्या आत्मतुष्ट
ज्यांनी कुणी ही रचना धुडकावून
डोके वर काढले
त्यांचे मनात गुप्त कौतुक केले बाहेर
त्यांची संतापयुक्त निंदा केली शेवटी सस्मित
मी समाधानी आहे असे सर्वांना सांगितले
--- ००० ---

## वैध

गडगडाट सुरू झाला की
माझी वाचा बसते
आणि माझ्या स्वप्नातून
शब्दच नाही फुटत
मग मी
आल्यागेल्याला एकच विचारतो
की तुमचा जेव्हा जन्म झाला
तेव्हा पाऊस पडत होता की नव्हता

कोणतेही यमनियम न पाळता
खुशाल निघून जावे
एखाद्या अंत्ययात्रेला
तसेच माझे मित्र आणि आप्तेष्ट
आणि हितचिंतक गेले निघून
सहलीला तेव्हा मात्र
माझ्या विचारांवर बुरशी जमली
मी यावर कोणतेही प्रयत्न न करता
येईल ते येऊ दे दु:ख
अशी स्ट्रॅटेजी ठेवायचे ठरवले

कित्येक वर्षे मी
गांभीर्याने प्रत्येक चव
लक्षात ठेवत गेलो
पण काय झाले शेवटी
आठवणींचा साठाच
जप्त केला गेला पावसाकडून
ते माझे वैध उत्पन्न नाहीय म्हणून

आता मी ना कोणते डाव आखतो
ना मार्ग ठरवतो

आपल्या अनुभवावर आधारित जगणे हे
नुसते निरर्थकच नाही तर कंटाळवाणेही आहे
हे आता मी समजून असतो

--- ००० ---

## हेतू आणि अर्थ

आता यापुढे नाही करायचे अकांडतांडव
हे ठरवावेसे वाटायचे कारण एकच होते
कधी एकट्याने तर कधी अनेक समूहांतून
काही ना काही कंडेम करायची मला सवयच
लागली होती लागले होते ते व्यसनच होते
लोक जेव्हा दिसत चर्चा करताना
की काय बाबा आयुष्याचा हेतू
किंवा जगण्याचा अर्थ तरी काय यावर
तेव्हा नेहमीच काही ना काही
कंडेम करणे हेच माझ्या मनात
उद्भवणारे उत्तर पाहून
मला लाज वाटू लागली होती

हे असे मानवी जगणे सडवणारे
कोण कोण आहेत ते मला
निश्चित माहीत असणे
हाच तर माझा प्रॉब्लेम नसेल

माझे जणू एक न्याय्य म्हणणे होते
की बाबा जगातल्या वाईट कृतींचे उगम
थांबले की मग
कशाला शोधावा लागेल
हेतू वा अर्थ
मी जे जे कंडेम करतो ते ते
क्षणात परिवर्तित करून टाकता आले
तर कुणीही काहीही
कंडेम करायचा प्रश्नच काय राहील

म्हणजेच ते सगळे चांगले नाही होत
तोवर मला व्यसनमुक्त कसे होता येईल

सारांश या भंगार जिंदगीत काही ना काही
हेतू आणि अर्थ लागणारच लाजून उपयोग नाही
--- ००० ---

मनोमन

आधी ओढा होता मग शहर वाढत गेले
तसतसे त्यात घाण पाणी वाढत गेले
मग घरबांधणी संस्था आली तिने
आपल्यापुरती ओढ्यावर स्लॅब टाकली
जवळच शेजारी बाग केली बागेच्या कट्ट्यावर
आपण बसलो तरी जमिनीखालच्या घाण पाण्याचा
आवाज येत राही प्रश्न भीतीचा होता मनात
अमुक असे नाही पण भीती होती तीच
निरनिराळी रूपे घेई हृदयाचा ठोका चुकल्याचे कळे
ही भीती आपली तब्येत मातीत घालणार
हे कळूनही काही उपाय चाले ना कुणी म्हणाले
रामदासांचे आत्माराम वाचा त्यात आहे सगळे
तुम्ही ठरवून नको ती भीती म्हणाल
तर उलट ती तुम्हाला करकचून धरून ठेवेल

टाकायचे तर सगळेच टाकावे लागणार
भीती नसेल तर मी तरी कुठला कसा असणार
याचीच चिंता असेल तर जा घरी आणि बस
तुझ्या बागेच्या कट्ट्यावर तुला पाहिजे तेवढेच आणि तसेच
तुझे मन राहावे असे म्हणायला तू काही
या जगाचा बाप नाहीस हे रामदासांचे पटे ना

मग कुणी म्हणाले मानसोपचाराचे बघा त्या तज्ञाला
प्रॉब्लेम सांगितला तो म्हणाला आपल्याला
राजकीय भूमिका असते की नाही तशीच भीतीही असणारच
तिच्यासाठी मन हवे पण हिच्यासाठी नको
असे नाही होऊ शकत मी देतो त्या गोळ्या घ्या
सध्या बरे वाटेल मग खुशाल तुमच्या
बागेच्या कट्ट्यावर बसून मोकळी हवा खा

त्यानंतर मला एक मित्र भेटला रामदास हे चातुर्वर्ण्य
मानणारे होते म्हणून तो त्यांना शिव्या देत होता
महाराजांची आणि त्यांची भेटही नव्हती झाली
हे त्याचे म्हणणे मला पटले आणि मनोमन समाधान वाटले
--- ००० ---

## सोचो

हवेतला प्राणवायूच
कमी कमी होत जाऊ शकतो
समुद्र मर्यादा सोडू शकतो
आकाशातून एखादे प्रचंड धूड
येऊन आदळू शकते पृथ्वीवर
कल्पनेतही नसलेले विषाणू हल्ले करू शकतात
अचानक मानसिक विकृती वाढू शकतात
सुरक्षितताच संपल्याने माणसे
अधिकाधिक हिंसक आणि एकमेकांचे
जिणे अशक्य करणारी होऊ शकतात
वनस्पतींवरच अचानक असाध्य
रोग येऊ शकतात पाणी अकल्पितपणे
विषारी होऊ शकते असे खूप काही

यावर शास्त्रज्ञ काय म्हणतो की लौकरच
माणसाने वस्तियोग्य दूसरा ग्रह शोधून
तिकडे वस्ती करायला हवी

हा इथला संपूर्ण माहोल असा च्या असा
तिकडे नेता येईल की याच्या अभावीही जमून जाईल

भेळ खाऊन टाकलेले कागद प्लास्टिकच्या पिशव्या
आणि लालभडक थुंकण्याने तो नवा ग्रह
माखून टाकायला खूप वर्षे लागतील
तोवर माणूस जात जिवंत राहील

तरीही अनिश्चिततेची आणि नष्ट होण्याची भीती
ही भयानक भीतीदायक गोष्ट कशी घालवणार

जन्मापूर्वीच मेंदूतच बदल घडवून
ती भीतीच नष्ट करायला हवी पण मग तर
ते वेगळेच काहीतरी असेल
माणूस जगला असे होऊ शकेल का – सोचो –
--- ००० ---

मूक कवी

गायक वारंवार गुरूचे वा भगवंताचे नाव घेऊन
कान पकडतो माझे यशबीश काही नाही ही सर्व
तिकडची कृपा म्हणतो काहींना वाटते हा ढोंगीपणा आहे
पण ते जे काही आहे त्याला लोकच असतात जबाबदार
कलावंताने त्याचे यश असे सारखे पुसून टाकले नाही
तर लोकांना ते त्यांच्या जगण्यावरचे आक्रमण वाटते
तसे झाले तर मग कलावंताची वैगुण्ये
हायलाईट करणे सुरू होते हे कलावंताला
समजत असते म्हणून तर त्याला
माणूस म्हणूनही श्रेष्ठ राहावे लागते हा पुरस्कार
माझ्या आईचा आहे वा आमच्या टीमचा आहे
वा मराठी भाषेचा आहे असे म्हणावे लागते
यात धोका एकच असतो की वारंवार हा नम्रपणा ऐकून
लोकांचाही त्यावर विश्वास बसू लागतो मग ते
त्याच्याबद्दल सहानुभूती बाळगू लागतात

एखाद्या कवीला मनोमन समजत असते की तो
जे लिहितो आहे ते पूर्ण मानवजातीसाठी आहे
या अर्थाने ते जागतिक आहे पण ही समज
घातक असते मराठीत चाकोरी सोडून काहीही आले
तर ते फेटाळायची हे साहित्यच नाही
असे म्हणायची ब्राम्हणी परंपरा आहे
स्वत: शाबूत राहणे यालाच इथे
सांस्कृतिक समजले जाते सर्व जातिधर्मांचे
कलावंत समीक्षक इथे ब्राम्हणीच असतात

वर्षानुवर्षे स्वत:च्या सुखदु:खांचे अनुभव मते
मूडस आणि क्रोध वा विषण्णता वा निसर्गप्रेम
आणि माणूस कसा माणुसकी विसरत चालला आहे
याच चाकोरीत फसलेले या संकुचिततेला आव्हान द्यायची
हिंमत नसलेले इथले सर्व जातींतले ब्राह्मण
कोणत्याही क्रांतीला चेचत राहतात

हे ओळखून एखादा कवी मूकपणे लिहीत राहतो कविता
--- ००० ---

## परके लोक

शक्य तो नकोच कामाचे विचार म्हणून
मी रस्ता पकडतो
या रस्त्यावरचा आता हा शेवटचा दिवा
इथून पुढे जाईन मी आठवणींच्या प्रदेशात
चादरीच्या झालरी एंजॉय करत

या अंधारात आठवावा लग्नसमारंभ
हे एखाद्या विजोड प्रतिमेचे रूप
पण अंधारात भांडणे नाही होत

शेजारच्या खेड्यातले एक शेतकरी
सधन जाहीर करतात माझा अहेर
अमुक साहेब दहा रुपये
पण अंधारात
ते कुणाला ऐकू जात नाही

त्यांनीच मला प्रेमाने दिले होते
एक कुत्र्याचे पिल्लू जगण्यात सतत
सस्पेन्स चालू असल्याप्रमाणे
आवाज काढणारे सोनेरी शेपटीचे

मी घरात सांगूनच ठेवले होते
कधीही येऊ शकतो माझ्यावर आरोप
काल्पनिक प्रतिमा देऊन
लोकांना लुटल्याचा
माझ्यावर अवलंबून न राहण्याची
सवय लावून घ्या

मुळात मी शहरी असलो तरी
अंधारात काय फरक पडतो
उलट हेकट आणि हुशार लोक
मला सतत परकेच वाटत राहात
--- ००० ---

ग्रेट कविता

ग्रेट कविता  लिहायची आहे का
मग हे करा
ही कविता लिहायला सुरुवात
करण्याआधी हे काही ग्रेट आहे म्हणून घाबरून
सुरुवातच पुढे ढकलायची
असे होता कामा नये मनात
स्वत:च्या मानापमानाच्या जखमा
स्थगित ठेवायला हव्यात
कंटाळा जसा नाही चालणार तसाच
भळभळता उत्साहही नाही कामाचा

ही कविता ग्रेट ठरेल मग
अभ्यासक्रमात येईल मग
शेकडो विद्यार्थी ती अभ्यासतील
ही स्वप्नेही नकोत मुळात
तुम्ही कुणाला सुसंस्कृत
करायला निघाला आहात
ही भावनाच नको

तुमच्या जगण्यावर झालेले
अतिक्रमण निवारण तुम्ही
कविता लिहून करणार आहात का
वाचणार आहेत का ती मंत्रीसंत्री
न्यायमूर्ती वा चौथा स्तंभवाले विद्वान पत्रकार
की पूर्ण जनताच उसळून येणार आहे
आणि सगळे अन्याय एकच की वेगवेगळे
हे तरी समजलेय का तुम्हाला

तुम्ही खूप दु:खी वा उदास वा एकाकी आहात
संभोगानंतरच्या मस्त शांततेत आहात
की काय की काय हे सांगून होईल का
ग्रेट कविता
हे सर्व वगळून सुरुवात करा
( माझा नाही काही दावा हो माफ करा )
--- ००० ---

लशीच्या दुसऱ्या डोसाचा मेसेज

लशीच्या पहिल्या डोसाचा मेसेज आला
दुसऱ्या डोसाचा नाही आला विचारले
तर म्हणाले अहो सर्व्हर प्रॉब्लेम असतात
तीन तीन दिवसांनीही येतो मेसेज
मला त्यांनी तात्पुरते वाटेला लावले
असेच मला वाटले मग विचार आला
डोस घेण्याचे तर काम झालेले आहे
मरू दे तो मेसेज पण कुणी म्हणाले असे नाही

प्रमाणपत्र हवेच जवळ दोन डोस झाले असतील तरच
कुठलाही प्रवास करता येईल एवढेच काय
त्याशिवाय घराबाहेरही पडता येणार नाही
असे काहीही येऊ शकतात नियम असू दे मरू दे
घरात बसून राहीन काहीही प्रॉब्लेम नाही
मला कुठे जायचेय परदेशात नोबेल वा तत्सम काही घ्यायला
आणि देशाचा मान वाढत असेल तर देश तातडीने
योग्य ते करेलच ना

एवढी मोठी रेल्वे चालते बिनबोभाट या देशात
म्हणजे हुशार कार्यक्षम लोक आहेतच इथे
पण त्याहून खूपच मोठ्या प्रमाणात आहेत
हलगर्जी अकार्यक्षम आपल्या एखाद्या चुकीचा
पुढे काय होईल परिणाम हे न समजणारे आळशी
डल कामचुकार बेफिकीर आणि उदासीन त्यांतले काही
ओळखीपाळखीतून लागलेले माजुर्डे आहेत तर काही
इतके लाचार आणि गरीब आहेत की
असेच पोसावे त्यांना सहानुभूतीने

असे होतच राहणार अगदीच काही आर्थिक
फटका नसेल बसत वा कायद्याचीच काही
जगणेच गाळात घालणारी अडचण नसेल येत तर
शांतपणे सहन करावे झाले

नीट पाहिले तर ते तसे व्हायला आपणही आहोतच की कारणीभूत
--- ००० ---

पिकप

मुळात पहाटे संपणारा हा कुठला साहित्य परिसंवाद
होता कोण जाणे पण त्यात माझ्या लेखक कवी मित्रांबरोबरच
माझ्या नोकरीच्या क्षेत्रातलेही लोक सामील होते पहाटे सगळे एकत्र
बाहेर पडलो होतो कला साहित्य यांच्याशी त्या क्षेत्रातल्या लोकांव्यतिरिक्त
इतरांचा संबंधच काय असे वाटणाऱ्या या भंगार समाजात हे एकूणच अप्रूप होते
माझी दुचाकी मी एका ओळखीच्या घरासमोर लावली होती त्यांनी मला पाहून
आदरपूर्वक विचारपूस केली मग मी गाडी घेऊन निघालो एका लेखक मित्राला
डबलसीट घेतले पण जरासा चढ लागताच गाडीचे अवसान गेले त्याला म्हटले
पिकप गेलाय गाडीचा तुला उतरावे लागेल तेवढ्यात मागून इतर काही
परिसंवादातूनच सुटलेले सहविचारक आले नोकरीच्या क्षेत्रात एक पद्धत असते

एखादीच तक्रार आली असली तरी तुमच्याबद्दल तक्रारी येत आहेत म्हणायचे
तसे एकजण म्हणाला तक्रारी आहेत तुमच्याबद्दल म्हटले काय कशाबद्दल
तर मी म्हणालो होतो की महाराज शाहू फुले आंबेडकर गांधी टिळक सावरकर
कर्वे असोत की तुकाराम ज्ञानेश्वर नामदेव चोखा असोत ती सर्व माणसे ग्रेट असली
तरी त्यांच्यावरची नाटके ग्रेट नाही होत ते भुरटे हिंदी मराठी चित्रपट होतात
हे आणि यांच्या बाजूचे चांगले विरोधी ते वाईट असा बालिश प्रकार होतो
हीरोने वीस वीस जणांना लोळवणे घडते नुसते नाटक हे मानवी संबंधांचे
असावे लागते सर्व गुंतागुंतींचा आवाका घेणारे मराठी लेखक आणि प्रेक्षक
हे पोरकट विभूतिपूजक असतात त्यामुळे ती नाटके उथळ सपाट होतात
हे काहींना खटकले होते म्हणजे यावर रोषच होता त्यांचा मी म्हणालो होतो

मुळात मुलांना चरित्रे ही आदर्श म्हणून देऊच नयेत नक्कीच तो मोठ्यांचा संघर्ष
त्यांना समजावा पण ते मोठे आणि आपण सगळे दुय्यम तिय्यम अशी
मानवी जगण्याची नासाडी होऊ नये प्रत्येकाचे स्वातंत्र्य विशेषता प्रतिभा मर्मदृष्टी
अबाधित राहायला हवी हेही अनेकांना पटले नव्हते यावर रोषच होता त्यांचा

मानवी संबंधांचे नाटक म्हणून मी उदाहरण दिले होते नाटकाकाराच्या शोधात
सहा पात्रेचे तर काही म्हणाले जे कुणाला माहीतच नाही त्याचे उदाहरण कशाला
काही म्हणाले ते एक अत्यंत बोअर न कळणारे फालतू नाटक आहे त्यापेक्षा
उध्वस्त धर्मशाळा कितीतरी ग्रेट त्यात लागू आणि ओम पुरी अशा दिग्गजांनी
काम केले होते ते काय उगीच आणि नेमाडेही म्हणाले की असे संवाद मराठीत
प्रथमच आले मी म्हणालो तो हिंदी सिनेमा आहे त्यावर रस्त्यात खवळले ते फुटू
लागले होते मी एकटाच दिवे लावून माझ्या बिन पिकप च्या गाडीवरून घरी गेलो
--- ००० ---

एखादा अब्ज कमीजास्त

आणखी पाच अब्ज वर्षे पुरेल इतके इंधन
सूर्याकडे आहे म्हणतात सध्या चिंताच नाही
ते काही प्रमाणाहून अधिक संपले की इकडे
पृथ्वीची वाटच लागेल ते कोण कंट्रोल करू शकेल
जीवसृष्टीच्या अधिवासासाठी पृथ्वी
आणखी तीन अब्ज वर्षे समजा सक्षम असेल
पण सुमारे दोनच अब्ज वर्षांत इथला
प्राणवायू बोंबलेल आणि बहुतांश
प्राणीजगत खतम होईल एखादा अब्ज कमीजास्त

सहज आपले एक असू दे
म्हणून चालले आहे हे सगळे
वसंत ऋतू कोकिळा वगैरे डोन्ट वरी
अजून खूप पिढ्या चालेल ते

माणसाचेच डोके फिरले तर तो स्वत:च
हे सगळे सत्वर संपवू शकतो
किंवा काही विषाणू
एकत्रित हल्ला करून
माणसाला मातीत घालू शकतात

मग पूर्वी इथे माणूस होता
हे ना कुणाच्या माहितीत असेल
ना कुणी त्याचे संशोधन करील

यातूनही समजा माणसासारखे काही आलेच
तर त्या जुन्या माणसाच्या असंबद्ध माहितीचा
त्याला काहीच उपयोग नसेल कशाला तो
वंशशास्त्र आणि इतिहास धुंडाळत
प्रेरणास्थाने शोधत बसेल

माणूस जगला तर स्मरणशक्तीवर चालणारी सर्व कामे
यंत्रमानव करतील यंत्रमानव निर्मितीसह
माणूस फक्त आता करावे तरी काय असे म्हणत राहील
--- ००० ---

## कादंबरी

लेखकाला कुणावर अन्याय करायचा नसतो
कुणाची बदनामी वा भलावणही करायची नसते
त्याने जी माणसे पाहिली अनुभवली त्यांतूनच तर
घडणार त्याची पात्रे पण तो त्यांची सत्यता
पुसून टाकतो त्यांची ओळख नष्ट करतो
सत्य घटनेवर आधारित असण्याचा आधार
त्याला नको असतो विश्वासाने नकळत
आणि अनाहूतपणेही ही माणसे आली
आपल्या जगण्यात आपण त्यांचा विश्वासघातही
नाही करणार आणि त्यांचे गुणदोषही
नाही उघडे पाडणार पात्रांचे गुणदोष असतील
ते त्यांचे असतील ते कमीजास्तही असतील
अधिक सौम्य वा तीव्र वा वेगळेही असतील
त्यांच्या निमित्ताने इतरही कुणाला ओशाळे वाटू नये
याचीही काळजी लेखक घेऊ इच्छितो

लेखनाने त्याच्या काळाचा दस्तावेज घडवला पाहिजे
ही बालिश अपेक्षा आता लेखक नाही मानत
ना माणसाचे ना काळाचे हुबेहूब चरित्र
लेखकाला चितारायचे असते

काही माणसांचे गुप्त जगणेही
जाणून असतो लेखक तो गुप्तपणाही
जसा च्या तसा नाही अवतरत त्याच्या लेखनात

पात्रांची आणि सत्यांची रूपे पालटतात
तरीही त्याची कादंबरी
एकसंध खरी होते
हेच तर असते त्याचे पाहणे
आणि व्यक्त होणे
त्याच्या लेखनातून
की

सत्य हे सत्यावर अवलंबूनच नसते
--- ००० ---

आत्मज्ञान

आपण वाळत गेलो तर
आपण नाहीसेच होण्याचा
धोका निर्माण होतो
हे समजून त्या चिंतेने
वाळत चालले पाणी

त्रास म्हणजे तरी काय असते
मनच ना ते समजले की झाले

मग मन मनाला म्हणाला
किंवा म्हणाली
की लिंग असते का आपल्याला

तेव्हा आले लक्षात
स्त्री आणि पुरुषाची
क्रोधाची रसायने थोडीफार
वेगवेगळी असतात पण मने मात्र
एकसारखीच असतात
स्वयंचलित

म्हणून मग सर्वांनीच
आत्मज्ञानाची कास धरणे
अनिवार्य झाले जरी
काही हुशार म्हणाले
अहो मनाचे ज्ञान
मनालाच तर होणार
उगीचच
गूढ विद्येच्या मागे लागून
जादूटोणा कशाला

त्यांचे म्हणणे होते
आपण आहोतच विषारी
हे विषच करेल निर्माण
उद्याचे निर्विष जग
--- ००० ---

जागतिक

अर्थपूर्णतेच्या नादी लागून
तीच तीच रद्दी पुन्हा पुन्हा चावण्यात
काय अर्थ आहे
इथे जागतिक काही
निर्माण होत नाही म्हणून रडत
पण कशामुळे होतात शब्द
सगळ्या माणसांच्या मनांत
मुक्त प्रवेश असलेले
हा प्रश्न तरी कधी घेतलात का समोर

युद्धे हवीत यादवी हवी
प्रचंड दुष्काळ हवा
किंवा अकल्पित आपत्ती
आणि त्या सगळ्याचे प्रचंड
अभ्यासपूर्वक तपशीलवार
खूप पाने भरून वर्णन हवे

ही तुमची
जागतिक ची कल्पना
तुमची कादंबरी ग्रेट होण्यासाठी
आधी इथे हजारो
मरायला हवेत तडफडत

किंवा मग एक सत्ता उलथून
जनक्रोधातून दुसरी येण्याचे
क्रांतीचे सूर्यगान

ज्या लेखकाच्या भाग्यात असतात
असे अनुभव असा काळ
तोच होऊ शकतो जागतिक
हे तुमचे ठरलेले आहे

माणसाच्या रूटीन जगण्यात असलेले
हेच सगळे जागतिक पाहिलेले तुम्हाला दिसत नाही
--- ००० ---

## आपद्धर्म

मला मत आहे पण अभिनिवेश नाही
असे म्हणणारा एक प्रामाणिक विदूषक
खूप उंचावरून पडला जाळीत
त्याला काहीही झाले नाही
पण लोक हसले
तो समजला की लोक त्याच्या
पडण्याला हसले

नंतर प्राण्यांचे खेळ होते
प्राण्यांना फक्त शारीरिक असते काम
त्यांच्याकडूनही होतात विनोद
पण त्यांना ते कळत नाही
कारण त्यांचे मन अगदीच
प्राथमिक असते

प्रामाणिकपणाचे स्तोम
माणसात फार असते कारण
तो खूपच हलकट असतो

प्रत्येक च्यूत्त्याला वाटते
बुडते जन हे न देखवे डोळा
त्याची सगळीकडून फाटलेली असून

कुणी म्हणतो की मन
सर्वांनाच असले तरी
काही मने निरागस आणि विशाल
असतात
फलाशा नसलेली
डावी असल्यामुळे

तेच फक्त असतात या पृथ्वीवर
माणूस किडामुंगी यांचे हितचिंतक
हिंसेला आपद्धर्म समजणारे
--- 000 ---

काफ्का ग्रेट होता

सर्व संबंधांचे दबाव
स्वीकारत गेल्यामुळेच तर
मलाही लागलीय सवय
स्वत:ची एक प्रतिमा बाळगण्याची
आणि वेळ वकत पाहून ती
अशीतशी सादर करण्याची
हीच तर व्यवस्था आहे जगभरची

प्रतिमेचे ताण सुखदु:खे
मानापमान यांनी जर्जर होत
कधीतरी निकडीने तिचा
शेवट गाठला जातो आणि कळते
ती नष्ट होऊ शकते

आता ती नष्ट होण्याची नसते भीती
फक्त ती विकृत होण्याची असते तिलाच
कारण या व्यवस्थेत सभ्य
श्रेष्ठत्व नसेल तर छी:थू होण्याचा धोका
मरू दे च्यायला करतच राहावे
हा खोटेपणा हीच जिंदगी मानून

लेखक कलावंत घाबरतात
काय म्हणतील आप्तस्वकीय
मित्र हितचिंतक समाज
आणि टाळत राहतात ते
प्रतिमेचे बिंग उघडे पाडणे

सेफ अंगणात खेळत राहतात ते
फक्त मतभेदांचे आणि दृष्टिकोणांचे
वैविध्य आणि माध्यमकौशल्यावर
भिस्त ठेवत होत राहतात
पारितोषिक विजेते

काफ्का ग्रेट होता हे कबूल करत
--- 000 ---

पुरोगामी

द्वेषाशिवाय माणूस जगूच नाही शकत
हे तर जागतिक सत्य आहे
जग तयारच का झाले हा नाही प्रश्न
ते आहे इथूनच सुरू होतो
वैज्ञानिक दृष्टिकोण आणि दु:ख
असणारच हे मान्य करून
शांततेचा बुद्धिप्रामाण्यवाद

तर्काने दाखवता यायला हवे
तुझा द्वेष कसा अहितकारक
माझा कसा समर्थनीय

आपापले आत्मतुष्ट चेहरे
असायला हवेत साम्य दाखवणारे
आपापल्या विभूतींशी

या एकूण प्रकाराला अंधश्रद्धा न म्हणता
म्हणता यायला हवे पुरोगामी मानवहित
--- 000 ---

धन्यवाद

समोर जी दिसतेय
ती माझ्या स्वप्नांची वाफ आहे
असे तुम्ही म्हणताय पण मीही हे
जाणूनच आहे की कोणतीही स्वप्ने
टोपलीत नाही भरता येत

याउलट तुमची अवस्था आहे
घरातलेच सामान वापरून
तुमचे मन बनवते ज्या वस्तू
त्या तुम्हाला जागतिक
श्रेयाच्या वाटतात तरीही मी कधीही
तुमचे प्रबोधन करायला येत नाही

तुम्ही सगुण उपासनेची चेष्टा करता
पण जगाचा इतका विध्वंस
करणारे रोगट गटार
तुम्हाला गोड का वाटते

संरक्षण सिद्धतेवर होणारा खर्च
वाचला तर पूर्ण मानवजात
खाऊन पिऊन सुखी राहील
हे का नाही दिसत तुम्हाला

प्रार्थनास्थळे नसणाऱ्यांचा देव तरी
कुठे भले करतोय कुणाचेही
त्यांना नाही लागत का वेळ आणि खर्च

सगुण असू द्या की निर्गुण तुमच्या मनांना
उभे राहायलाच आधार लागतो एक विचारदेव
विध्वंसाची पूजा सगळ्यांनाच मान्य असताना
तुम्ही ही असली किरकोळ हुशारी का दाखवत बसता

तुम्हाला उत्तर देता देता मी आत्मशोध घेतला आहे
असे समजा एकदम अंगावर नका येऊ धन्यवाद
--- 000 ---

श्वास घेता यावा

श्वास घेता यावा
म्हणून दगड तळत बसावे
आणि अबोध मनात तरंगत राहावी
कल्पित प्रेयसी म्हणून ढग ओलांडावेत
असे खोटे आयुष्य
स्वीकारलेला हा समाज
बरोबर वा योग्य काय
हे नि:शंकपणे माहीत असलेला
मला स्वीकारू नाही शकणार
माझे स्वत:चे असणे
मलाच शंकास्पद असल्याने

अमुक झाले तर काय कराल
असे प्रश्न अर्थातच
आम्ही एकमेकांना विचारू शकतोच
विचाराने सगळेच
अर्धवट म्हणजेच खोटेही असल्याने

त्यांना माझे आश्चर्य वाटते त्यांच्या
मनाची अवस्था त्यांना
अभेद्य सत्य वाटत राहिल्याने
माझे मन त्यांच्यासारखे
नि:शंक नसणे हेच
त्यांना बालिश क्रूर
बेफिकीरीचे असंवेदनशील
आपमतलबी कुंपणावरचे वाटते

ते मला शिव्या देतात याचा अर्थच
त्याच कारणाने ते
माझ्याही शिव्या खात असतात

सगळी मने एकच करायची जादू
त्यांना येत नाही म्हणून ते उद्विग्न क्रोधाविष्ट असतात
--- ००० ---

विषमता

वाताहात झाली तरी पुन्हा
शुभारंभ करून मोठे झालेले महाशय
त्यांच्या दातांची काही आली समस्या
तर सरळ आधी एस्टीच्या लाल डब्बा
गाडीने एक चक्कर मारून येत
त्यांच्या एका खेड्यातल्या बालमित्राकडे
आणि यातच होते त्यांच्या यशाचे रहस्य

एक बालमित्र असावा आणि तो
खेड्यातला असावा एक साधा ग्रामसेवक
हा एक उपचारच होऊन बसला
पुढील पिढ्यांसाठी
पण तंतोतंत त्या महाशयांसारखा
स्वभाव करून घेणे शक्यच नव्हते

वाताहात होणारे बरेच असत
पण ते तर नेहमीच लाल डब्बा वापरत
तरीही तसे परिणाम मिळत नसत

मग स्वभाव तसा करायचे क्लासेस निघाले

समाजसुधारणा करणारे बंधुता
जगण्यात आणणारे नसतात का आदर्श
तसेच हेही फक्त प्रॉब्लेम असा होऊ लागला
की एकाच माणसाला एकसमयावच्छेदेकरून
अनेक स्वभाव बाळगता जोपासता येणे
अशक्य असल्याचे लक्षात आले
मग श्रीमंत होण्यातली आव्हाने घ्यावीत
की विशाल हृदयी समाजसेवक होण्याची
यांतून ज्यालात्याला निवड करावी लागली

काहीजणांच्या श्रीमंतीमुळे विषमता वाढते
असे समाजसेवकाला वाटू लागले
--- ००० ---

सापाला अन्न

सापाला अन्न मिळावे
म्हणून जसे बेडूक आणि उंदीर
तसेच डासांना रक्त मिळावे
म्हणून माणूस
असे तर नसेल
माणसासाठी आहेतच ना
धान्ये भाज्या कोंबड्या बकऱ्या मासे

खरे तर राज्य
जिवाणू-विषाणूंचेच आहे
ते कधीही खतम करू शकतात
सगळी जीवसृष्टी
माणसाला दिसावी ती झलक
अशीही सोय आहेच

पण कशासाठी हा गुंताडा
निसर्गाला शहाणा म्हणावे
की बिनडोक की असंगत
अनावश्यक गधडेपणाचा निर्माता

मानवी बुद्धीला सगळे कळणार आहे म्हणतात
सध्या नुसतेच हे एकमेकांत
प्रतिदेह तयार करायचे कारस्थान दिसतेय
निदान डासांचे तरी
गूढबीढ काही नसलेले
--- ००० ---

बदल

व्यावसायिक कारणानेच भेटी होत छान खेळीमेळी होती
तेव्हा तो पॉवरफुल होता आता भेटलो तेव्हा तो तसा नव्हता
हे मला नंतर कळले आता माझ्या लेखी तो नसणार महत्त्वाचा
असे समजून तो आक्रमक झाला होता कधीही तो मला नष्ट करू शकतो
हे तो दाखवत होता खरे तर मी अनवधानाने त्याच खेळीमेळीत होतो
माणसे अशी त्यांच्या त्यांच्या कारणांनी बदलत गेली तर करावे काय
मी तर परिस्थिती बदलली तरी असे गैरसमज करून घेऊन नाही वागत
असेच मला वाटते
पण दुसऱ्यांना वाटू शकते ना की आता मी तो पूर्वीचा असणे शक्यच नाही
त्यामुळे मी कसाही असलो तरी निश्चित काहीच उपयोग नाही असेच वाटते
--- ००० ---

गप्पा

राजकारणात नेमके काय चाललेय
हे आपल्याला कळूच नाही शकत
तरीही बरोबर-चूक ठरवावेच लागते
यावर तिचेमाझे बोलणे होई
जेके म्हणतात तसे भूतकाळमुक्त जगणे
म्हणजे काय किंवा ओशोंचे तर
मनापलिकडे या नावाचे पुस्तकच आहे
म्हणजे कसे असेल ते जगणे यावरही
आमच्यांत बोलणे होई तिच्या मोलकरणी
न आल्याने ती कशी वैतागलेली आहे
तिच्या नवऱ्याला प्रमोशन मिळाले पण
त्यांच्यांतला दुरावा कसा कायम आहे
तिची जाडी वाढत चालल्याने तिने कसे
आहारनियंत्रण आणि योग आणि व्यायाम
हे अत्यंत प्रामाणिकपणे मनावर घेतलेले आहे
किंवा हल्ली मी वाचन कमी करून जगातले
उत्तम चित्रपट का बघतो आहे मी दारू खूप
कमी केली असली तरी अजून ती चालूच कशी आहे
माणूस सवयींमध्ये कसा गुरफटलेला असतो
असे खूप

यात कुठे काय होते प्रेमाचे बोलणे
ना कोणतीही सूचकता ना मानसिक मिठी
फक्त एक विश्वास होता कुणाला काय
वाटेल याची काळजी नव्हती ये जोड
कभी टूटेगा नही हे माहीत होते

न चुकता रोज अनेक विषयांवर बोलणे होत राही
ओढच वाटे जणू ते सहजच जगणेच तर
होते नुसते पण खूप समृद्ध

या सर्व गप्पांना सहवासांना आत्मीयतेला
दोघांनाही माहीत असलेली दुतर्फी तीव्र
आसक्ती मात्र होती प्रत्येक क्षणात प्रवाही
--- ००० ---

रस्त्यावरचे काही खडे

त्याच्या काही कृतींना लोक वेडेपणा म्हणत
एकदा त्याने रस्त्यावरचे काही खडे
चांदीच्या वाटीतून घरात आणले
त्याचे म्हणणे ते प्रतीकात्मक मौल्यवान
म्हणून आणलेत समजा एखाद्या प्रगत परग्रहावरचे यान
आले इथे तर ते घेऊन जाईल हेच खडे
आणि पूर्ण पत्ता लावेल इथे
काय काय घडले आणि काय काय
आहे याचा कारण इथल्या
प्रत्येक कणात समाविष्ट आहे
पृथ्वीचा पूर्ण भूतकाळ
जशी प्रत्येक माणसाच्या कणाकणात असते
त्याच्या सुखदु:खांची पूर्ण कथा

तशीच पृथ्वीही आहे
या विश्वाची पूर्ण कथा सामावून
असणारी कळत नकळत सर्व काळात
विश्वाच्या उत्पत्तीपासूनची पूर्ण कथा
वाचण्यासाठी कुठेही
लांब जायची गरज नाही

तरीही एकेका तुकड्याचा अभ्यास केला
म्हणजे ती पूर्णतेची समज असेल असे नाहीच
तपशीलांचे ढीग म्हणजे पूर्णता कशी असेल

पूर्ण पृथ्वीचा म्हणजेच पूर्ण विश्वाचा
रहस्यभेद हवा असेल तर
तो पृथ्वीला धरून नाही होणार
तिचा पूर्ण त्याग करावा लागेल

त्याहून सोपे म्हणजे
स्वत:चाच त्याग करणे
कणाकणात आहे पूर्णता
हे समजत असेल तर
--- ००० ---

घरसामान

अजूनही स्वप्नात मी मला परवडेल
असे भाड्याचे घर शोधत असतो किंवा
टेम्पोत घरसामान भरून
या गावाहून त्या गावाला जात असतो

व्रण सावल्या जखमा किंवा खूप
बोलणाऱ्या अबोल्या
हा संचय सतत मी जगत असतो
जाणता अजाणता

आज काय त्याचे जे फक्त
माझेच असू शकते
आता आकसलेले संक्षिप्त झालेले
गोळीबंद स्मरण

असू दे असू दे मन म्हणते
जगत राहायचेय मला
जो भी है
ते बरेही वाटतेय
हवेसेही वाटतेय
आणि सुरक्षितही

मुसाफिर जाएगा कहां हेच खरे
इथेच ठोका तंबू रुक जाओ

रुक जाना ओ जाना हमसे दो बातें
करके चली जाना
के मोसम है दीवाना
हे गाणेही आहेच की
त्याच मनात

संज्ञाप्रवाह ही एक
अभेद्य आणि भारी गोष्ट आहे
भरजरीही आणि नैवेद्याला
साखरही नसावी

यामुळे पारंपरिक दु:खीही

खरे काय खोटे काय
कधीच कळले नाही
आता काय त्याचे
जो भी है
वो तो रहेगाही
--- ००० ---

पंच्याहत्तर

पंच्याहत्तर पूर्ण
हे विशेष वाटते ते शंभरच्या संदर्भात
बरोब्बर झाले तीनचतुर्थांश म्हणून
अन्यथा झीज नेहमीप्रमाणेच चालू असते

लहानपणी सायकल शिकताना
फुटलेला गुडघा आणि नंतर
अपेक्षांना अहंकाराला
जात गेलेले तडे आणि मध्येच
लागलेला हिरवागार मऊ गवताळ भाग
या स्मृतींचे ना जगाला देणेघेणे
ना मला काही कोणतीही निराकरणे
मिळायला त्यांचा उपयोग

ना जगण्याचे अर्थ शोधले
ना हेतूंचे मूल्य जोखले
स्वभाव हेच कळणे वाटले
मेंदू सतत चालू ठेवला

पंचवीसतीस वर्षे ऑफिसात काम करताना
हजारो सह्या केल्या त्यांनी घडले
काही भौतिक बदल ते तर आता
आठवणारही नाहीत
जसा माझ्याही दिनक्रमातला
तीनचतुर्थांश भाग

हिंसाही घडलीच असणार माझ्या स्वभावामुळे
त्या स्वभावाच्या जबाबदारीचा अहंकार
स्वीकारावाच लागेल आणि म्हणूनच त्याचबरोबर
एकूणातच सर्वांची माफी मागायचाही

आपल्या स्वभावाने आपल्याला फसवत आणलेय
असेच वाटतेय पण म्हणजे
कुणाच्या कुणाला कोण जाणे
--- ००० ---

एक गंभीर सत्य

एक गंभीर सत्य येतेय का लक्षात
भीतीला टक्कर देत राहिले तर
ती टिकते वाढते धडधड वाढवते
किंवा चुकवते मधलेच काही ठोके
तिला प्रतिकार म्हणजेच असते जणू
तिचे जीवनद्रव्य

प्राणवायू तर पोचतच राहावा सतत सत्वर
पण ध्येयवादाचे सत्कारहार
गळ्यांत घालत भीतीऐवजी शौर्य
असायची गरज नाही

सर्वांना कुटुंबे आहेत
फायदे हवेच आहेत
पण तुझे बिझिनेस रिस्क
तूच घे रे बाळा
आता वचनापासून कसे ढळता येईल

सर्व गोष्टींचे तणाव म्हणजे काय
तर मनच अव्याहत चालू
राहणारा कारखाना
आणि विचार चाललाय मनाची
प्रतिकारक्षमता वाढवायचा

कोणते औषध वा अन्न
आहे आवश्यक कोव्हिडच्या
आधी मध्ये आणि नंतरही
जे घालवेल अनिश्चितता

ती तर क्षणभर वाटतेय काल्पनिक
ती सोडून देणेच घडायला हवेय की काय
घटनांतून बाहेर पडण्यासाठी
--- ००० ---

दु:खाच्या हवेत

तुम्हाला भावनांचे चकवे
आणि धक्के आवडतात भावतात अश्रू
प्रेमाचे वा आनंदाचे वा दु:खाचे
आवडते पुन:प्रत्ययाचे हळुवार पीस
आवडतो भावनिक अर्थ
छुप्या विचारातून येणारा

ओले ओले राहात
तहानेले असणे
आठवणी स्वप्ने आणि
आजीच्या आठवणी असणे
आणि शब्दांनी मारलेली
फुंकर तुमच्या जखमांवर

जगण्याचे तत्त्वज्ञानच कळते
तुम्हाला पार गटारात न पाडणाऱ्या
माफक असंख्य भावनिक पेगांतून
सांध्यरंगी भरगच्च संभार असलेले
वाटतात तुम्हाला अध्वर्यू

खूप दु:ख भोगलेले ग्रेट
तडफडीची नक्षी दाखवणारे
म्हणजे तर
गुप्त लैंगिक सुखाचा प्रसाद वाटणारेच

देवा आम्हाला जगू दे माफक दु:खात
आम्ही मुक्ती मागतच नाही उलट मस्त
गोड मेकप केलेले सुंदर चेहरे
हवेत दु:खमीलन स्वीकारणारे

दु:खाच्या हवेत व्हायला हवेत
हळुवार संभोग
समान देवाच्या अनुग्रहात
अभिषेक करत
--- ००० ---

स्थलांतर

उड्डाण पूलावरून उडाले पांढरे स्वच्छ बगळे
तेव्हा ते म्हणाले सकाळच्या कोवळ्या उन्हात
आमची शुभ्रता चमकावी
म्हणून पडत नसते ऊन

ऊन त्याचे ते जगते स्वतंत्रपणे
पण आमच्यासह

स्वस्थता मिळावी म्हणून
हिंडायचेच असते जगभर
ती मिळू नाही शकत हे माहीत असून
तात्पुरत्या अनुभवाशिवाय

हास्याचे निर्माते लेखक नट
आमच्यांतले
नदीकिनारी बसतात तेव्हा
हेवा करतात प्रवाहाचा

एका ठिकाणी थांबून स्थलांतर कसे होईल
आणि स्थलांतरासाठी थोडेच उडायचे असते

बदलत्या हवेत उडल्यामुळे ते घडते एवढेच
--- ००० ---

## दोष

मी जेव्हा जेव्हा देवाला वा माणसाला
शिव्या दिल्या तेव्हा तेव्हा आकाशवाणी झाली
हेच दोष तुझ्यातही आहेत रे बाजारबुणग्या

डाळिंबाचे दाणे सेक्सचे प्रतीक म्हणून वापरले
तर झोपेवरचे मोर कशाला नाराज होतील
त्यांना फार तर स्वप्नेच हवी असतात उधाणलेली

आत्मतुष्ट नीतिमान वेडे चिंध्या होत फाटून जातील माझ्यासारखे
--- ००० ---

कडवट

तो एकाकी आहे निराश आणि कडवट आहे
आपोआपच त्याचे शब्द झालेत काटेरी
तशाच काटेरी मित्रमैत्रिणींत तो रमतो
त्या तेवढ्याच लोकांना कळते जग
कसे जी च्या जी त चालले आहे ते
सगळे सहज सोपे साधे स्पष्ट असूनही
आपमतलबी जग घडवते विषमता
अन्याय छळ रोग आणि हातभट्टीच्या
दारूचे विष

जो तो आहे बेफिकीर इतरांबद्दल
याचा त्यांना प्रचंड क्रोध असतो
माणसांनी स्वार्थी राहण्यापेक्षा समावेशक
राहणे कधीही चांगले एवढेच तर
त्यांचे म्हणणे असते सुदैवाने त्यांना नोकरी असते
पण बेरोजगारांबद्दल त्यांना खूपच असते
संवेदनशीलता सहानुभूती आणि ती परिस्थिती
निर्माण करणाऱ्या व्यवस्थेची चीड
त्यात सामील मैत्रिणी त्यांना वाटतात
रणरागिणी आणि इतर स्त्रिया व्यवस्थेच्या दासी

त्यांच्या विचारांना अभिव्यक्ती देऊन
दातांच्या कण्या करून अतितळमळीने सत्य
सांगायचा प्रयत्न करून काही वर्षांत
ते थकतात म्हणतात साला खऱ्याचा प्रश्नच नाहीय
राहिलेला तुम्ही जे बोलताय त्यावर
विश्वास निर्माण करायचे कौशल्य हवेय फक्त

त्यांना तर फक्त खऱ्याची असते चाड
लोक किती मूर्ख सत्य सोडून पळतात
श्रद्धा भक्ती विभूतिपूजा भूतकाळ अस्मिता
यांच्या मागे हे कधीच नाही सुधारणार भोसडीचे
असे म्हणत ते अधिकच कडवट होत कुत्सित हसतात लांबून
--- ००० ---

## भिऊ नकोस

भिऊ नकोस मी तुझी पुस्तके फाडणार आहे
तूच आहेस तुझ्या इतिहासाचा शिल्पकार
या क्षणात नाही तर मग उद्या
देवाने ठेवलेत तसेच राहू देत तुझे किडके दात
माळ्याने न्यावे पाणी तसाच तू पडून राहा
तुझ्या प्रेयसीच्या मिठीत
चोरी नको करूस कधीच यशस्वी ओकाऱ्यांची
परस्त्री मान खात्यासमान तुझ्या बँकेतल्या

तुझ्या भरवशांना होऊ देत राजकीय टोणगे
अगं अगं म्हशी म्हणत तू विश्लेषण कर
तू पाहिलेल्या सूर्यास्ताचे
कानामागून येऊन गार पडलेली तुझी सावली उचल
रात्रंदिन तुला देवाणघेवाणीचे प्रसंग
असल्याप्रमाणे सारखे पुढे कर तुझे तुटके हात
आम्ही जातो आमच्या बारमध्ये असे म्हणत
आठव तुला आवडलेल्या तुझ्या शिक्षिका

स्वत:ला परीस समज मिशांवर ताव दे
अंगाला मुंग्या आल्या तरी सुळी नको जाऊस
उडू दे तिरपिट माशा मार
पाऊल मुद्दाम वाकडे पाड तोल सावरूच नकोस
बाळबोध राहा दुर्बोध नको राहूस
पोपटपंची कर किंवा पोवाडे गा
झिलकरी परदेशातले असतील एवढे बघ

जीवन सुंदर आहे असा जप करत
वेश्यांच्या मुलांचे संगोपन कर
हीच होऊ दे तुझ्या पायाखालची वाट
बळी पडू नकोस स्वातंत्र्याच्या प्रलोभनांना

गाढवही गेले आणि ब्रम्हचर्यही गेले
असे झाले तरी कंटाळू नकोस ठाम राहा
--- ००० ---

कारणमीमांसा

एवढी मोठी इमारत
क्षणात जमीनदोस्त केली गेलेली पाहिली
प्राणवायूअभावी मरणारी माणसे
पडणारी झाडे घरे लागणाऱ्या आगी

या कशाचीच सखोल समज माझ्याकडे नाही
मी टिकिटिकी बघत राहतो टीव्हीकडे

घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीला असणार
खूप गुंत्यांची कारणमीमांसा
कारणे आहेत म्हणून घडतेय ते बरोबर असेल का

मी एक निर्बुद्ध असंवेदनशील आपमतलबी
दिखाऊ माणुसकीची मूर्ती असलेला
जगाचा हितचिंतक आहे

मुसळधार पावसाचे सांगितले की मी म्हणतो
कारणे असणार विध्वंसक माणसे पाहूनही
सर्वांबद्दल सहानुभूती बाळगत मी म्हणतो
कारणे असणार मागच्या काही
वर्षांपासून हे घडत आले असणार

चांगले बरोबर घडू द्या ना पण वाईट
खरेच नको तर मी कुठे कसा करू
हस्तक्षेप हे मला कळत नाही

जिथे शक्य आहे तिथे देशहित प्रथम म्हणत
बाजू संभाळणाऱ्यांना माझे पाठिंबा देणे
हेही घडेलच ना एक कारण
भविष्यातल्या घटनांचे

मरू दे मी आहे तोवर सगळे म्हणतो बरोबर
आणि माझ्यानंतरचेही सगळे बरोबरच असणार ना
--- ००० ---

( ' टिकिटिकी ' हा शब्द मला लालूप्रसाद यादवांमुळे कळला. सभागृहात एकदा जॉर्ज फर्नांडिस यांच्याकडे पाहून ते म्हणाले होते, " तुम्ही ने तो हमे समाजवादके पाठ पढाये थे, अब क्या हमारी ओर टिकिटिकी देख रहे हो ? " )

--- ००० ---

शरीरसुखापेक्षा

त्या गावात गडगडाटासह पाऊस पडला
याचा अर्थ नक्कीच आपले यश जवळ आलेय
त्या राज्यात लोकांनी मुंडन केले
म्हणजे आता शंकाच नाही
त्या देशात एका नाटकावर हल्ला झाला
क्या बात है अब जरूर जीतेंगे
कोल्हापूरच्या स्थानिक वर्तमानपत्रातले
व्यंगचित्र गाजतेय याचा अर्थ तोच तर होतो
माध्यमांतून व्हायरल होतेय आगीचे गाणे
त्याचे पडसाद उमटताहेत चीनमध्येही
याहून दुजोरा कोणता हवाय

मस्त वाटते अशी यश जवळ आल्याची चिन्हे दिसणे
पूर्वक्रीडेसारखा आनंद होत राहतो आता होणारच
माणसाचे भले म्हणून रोमांच येतात अंगभर
पण नतद्रष्ट निर्बुद्ध माणसे ही सुचिन्हे
पोचू देत नाहीत पूर्णस्फोटाला आनंदाच्या

असे पूर्वीही अनेकदा घडलेय आजही घडतेय
भविष्यातही निदान एवढे तरी घडत राहावे
हीच सदिच्छा आहे

मागचे सर्व विसरून प्रत्येक वेळी
नव्याने रोमांच येतात हे काय कमी आहे

आपण कितीही अल्पसंख्य असलो तरीही
आपली स्वप्ने सर्वांच्या हिताची आहेत
सध्या शरीरसुखापेक्षा विचारसुखही मस्त सुखावतेय

--- ००० ---

जाने भी दो यारो

दोन्ही रस्त्यांनी जायची इच्छा असूनही
एकच पोषाख निवडावा लागणे
बजेटच्या मर्यादेमुळे
हे करते कुणालाही विचारवंत

अनुभवाने कळते कोणतेही गटार
स्वच्छ कसे असेल
पण आपण ना निरुद्योगी आहोत
ना आपली प्रतिमा आपल्याला
गोंधळातली करायचीय

त्यामुळे एक तर या कॉलनीत राहा किंवा त्या
हे मानावेच लागते आयुष्यभर मग
साधकबाधकपणाची कटकट नाही राहात
शिवाय हे ना या बाजूचे खंदे
पैलवान आहेत असे आपले
एक मुख्यपृष्ठही तयार होते

अमरिका मे मालूम है क्या
गटरका पानी अलग और पीने  का पानी अलग
असा उत्तम संवादही मग
जाने भी दो यारो म्हणता येतो

युद्ध वाईट असले तरी आमची मुले
शूरच हवीत आमची सिद्धता
हवी धडकी भरवणारी
पहिल्या पाचांतली भवानी तलवार

त्याशिवाय विचारवंत कसले होणार झ्याटाचे
बरोबर-चूक योग्य-अयोग्य नैतिक-अनैतिक
आणि सत्य काय आणि हितकारक काय
हे एकाच वेळी सांगता यायलो नको ?
--- ००० ---

की काय

तुझ्या यशाने भारून जाण्यात
शक्ती वाया गेलेले लोक
तुझ्या कविता कितपत
अवधानाने वाचतील
हा विचारच तुला शिवत नाही का

योद्ध्याच्या मोठेपणाची
सहज शांत झूल पांघरून
तू सह्या देत राहिलास
अध्यक्ष होत राहिलास
लोकांचे चकित भारलेले डोळे
रिचवत राहिलास

त्यामुळे तुझे वाचक वाढले पण
काय ग्रेट काय ग्रेट
या घोषात तुझे शब्द धूसर होत राहिले

लोकांना अशा यशाच्या तुलनेत
न्यूनगंडात जगणे चालू ठेवता यावे
यासाठीच लिहिल्यास का तू कविता
ते काम तर इतरत्र हजार प्रकारे चालूच आहे

तू द्रष्टाही आहेस तुला दिसले
भविष्यात यावरही होतील वाद
की तुझ्या कविता तूच लिहिल्यास
की अन्य कुणी यानेही तू
खुदू खुदू हसत तुष्ट झालास

मानवी सुखदु:खांचे तू खूप
जटिल पट उभे केलेस ते कशासाठी
तोच कंटाळवाणा सश्रम यशाचा भिकारडेपणा
सगळ्यांच्या जगण्यात अधोरेखित व्हावा यासाठीच
की काय
--- ००० ---

हॉकिंग म्हणाले

प्रतिमेची गरजच नष्ट झालेली असल्याने
माझ्यापुढे देव अवतरण्याचा चमत्कार
घडूच नाही शकणार
खडकाळ डोंगर मलाही नवीन नसले तरी
तहान लागल्यावर साधे
पाणी पिणारा माणूस आहे मी

वेदना दु:खे वा मरणग्लानी
म्हणजे काय ते मी चांगलेच
अनुभवून आहे माझ्या बाजारात
मी अजिबात माज नाही करत

कधी माझे डोळे थकतात
दृष्टीच गेली तर काय
हा विचार येऊन जातोच मनात
औषधशास्त्रातली प्रगती
मानायला तयार असतो मी
एक मानवनिर्मित चमत्कार

हॉकिंग म्हणाले की माणसाने लौकरच
परग्रहावरही वस्तीचे जमवावे
अन्यथा दिसणाऱ्या दुश्चिन्हांप्रमाणे
पृथ्वी नष्ट झाली तर
मानव प्राणीही नष्ट होईल
परग्रहावर जाऊ शकणारे कोण असतील
तर बहुतेक आमचे पोशिंदे राजकारणीच
त्यांच्या रूपांत तरी राहू दे जिवंत मानव

एकदा विश्व अमर्याद आहे असे म्हटले तर
वस्तूंचे मर्यादित अस्तित्व खोटेच म्हणावे लागेल
असे मला वाटते मग काय एवढे महत्त्व असेल
मानव जिवंत राहण्याचे काही नाहीच आहे तर
कशाला अट्टहास काही नसणेच तर फक्त असू शकते अमर्याद
--- ००० ---

## उस्ताद

ते नेमके काय चालले होते गणित
त्याला किती टप्पे होते आणि
किती वेळ लागणार होता उत्तर यायला
हे कुणाच्याच हातात नसल्याप्रमाणे
दिङ्मूढ होत नि:शब्द उत्सुकतेत
थांबून होते हजार लोक काही समझदार
होते निश्चिंत आनंदात जेव्हा उस्ताद
अमजद अली खानांची सरोद
त्यांच्या दोन तबला साथीदारांसह
विहरत होती कालावकाशात

जेव्हा सेकंदाच्या हजाराव्या भागावर
तिघांचेही गणित एकत्र सुटले तेव्हा
सर्वांचेच जीव आनंदाने भांड्यात पडले

पण हे नव्हते लक्षात आले कुणाच्याच
की आपला सर्व भूतकाळ फस्त झाला आहे
या कालसमुद्रात

त्या समुद्राने तुरंत परत केला होता
प्रत्येकाचा मृतदेह ज्याच्यात्याच्या
किनाऱ्यावर ते पाहून

आपापला डी एन ए पडताळून घेऊन
सर्वजण परतले आपापल्या घरी

आपापली ओळख
पटली होती की हरवली होती
याचे न सुटणारे गणित संभाळत
--- ००० ---

बैल जिवंत आणि सरावलेले

डबा जोडताना गाडीला
आवाज होतो पण आता तो
राहणार असतो सोबतच
अनुभवासारखा भल्याबुऱ्या
पन्नास वर्षांनीही आठवणाऱ्या कधी
सांगावासाही वाटणाऱ्या
अंधारात जणू ठरलेल्या
चाकोरीतून चालत राहावी
बैलगाडी बैल जिवंत
आणि सरावलेले असल्याने

आद्य मी असे काही नसतेच बहुतेक
कपाळावर काही वेळ बोट उभे
घासल्यावर उमटायचा उभा व्रण
गंधासारखा काही दिवस
टिकणारा चालू राहावे
नामस्मरण आणि घडावी
चुरचुरणारी यात्रा तसा

आता ना गणती ना हिशोब
स्वभाव घडला तो घडला
बोलताना कधी चेहरा
चिडका होणार हे फिक्स आहे कधी
सत्यज्ञान असल्याप्रमाणे
आत्मविश्वासी आणि उपरोधिक
कधी ठरवून कुत्सित वा प्रेमळ

इतक्या विचारवंतांची पुस्तके
वाचली ती काय उगीच
आता कोणती पुस्तके वाचायची
कुठे विश्वास ठेवायचा हे तर
अंगभूत जमलेल्या बुद्धीने
घडणारच ना आपण कोण शेवटी
--- ००० ---

गोठलेले शब्द

मन काल शांत आणि प्रसन्न होते
सकाळी तसेच आजही हवे म्हणून
आटोकाट प्रयत्न सुरू केले
तर आभाळ फाटू लागले घराच्या
गच्चीला ताण येऊ लागला
आणि पाय ठणकू लागले

आपलाच नेहमीचा रस्ता असूनही
रहदारीने तुंबावा आणि हवालदिल व्हावे
आपल्या नाकातोंडातले श्वास
तसे दैवदुर्लभ झाले सगळे आसमंत

खरे तर मला माहीत होते की काल
मी कोणतेही प्रयत्न नव्हतो करत
आपोआप मला हवेत
मोकळा गारवा जाणवला होता

आता पुन्हा नाहीच घडणार का ते तसे
या माझ्या दु:खी विचाराने
खिंडार पडू लागले
माझ्या भूतकाळाला आणि कमावलेले
सर्व घालवणारा जुगार झाले जगणे

हेही कळत होते की मीच
बिघडवत होतो साधी पावले टाकणे
आणि तरीही
न थांबता जिद्दीने मी अधिकच
घसरून पडत होतो
विचारांच्या शेवाळ्यात

गोठलेले शब्द तडे जात फुटत होते
--- ००० ---

## नदी

माझ्या मनात एक नदी आहे
तिला काठ नाहीत पण ती
माझ्यापुरती आहे

ती कधी कधी माझ्या बाहेरही
उसळी घेते तेव्हा मी जरा घाबरतोच
आमचे प्रेम गुप्तच राहायला हवे
समाजाच्या कोणत्याही
मान्यतेत ते बसणार नाही हे मी जाणतो

खरे तर लोकच तिला घाबरतात
टाळतात आणि तिचे नावही
नको म्हणतात
त्यांना वाटते त्यांच्या पुढील
पिढ्यांची कारकीर्द ती खतम करेल

आकांक्षा आणि लढाऊ बाणा
गेला वाहून तर राहीलच काय
या विचाराने ते एक मार्ग काढतात

काठ असलेली सुंदर नदी ते पूजेला घेतात
प्रसादाला ते मलाही बोलावतात
मी गेलो तर भ्रमाला बढावा देणे होणार
काय करू मी आतल्या आत
माझ्या नदीला विचारतो

तिच्यावर ना माझा हक्क असतो
ना मालकी पण मुक्त प्रेमात ती मला अनेकदा
नष्ट होण्याचे क्षण देते

ती काहीच नाही म्हणत पण आमचे प्रेम
लपवण्यासाठी मीच भक्तिभावाने
प्रसादाला जातो आणि तिचा अंगारा लावतो
--- ००० ---

फ्री

मी जेव्हा फ्री असतो तेव्हा
कुत्र्यांचे पक्ष्यांचे वाहनांचे
माणसांचेही सगळे आवाज
माझ्यातूनच येत असतात
झाडांचे इमारतींचे रंग
आता मला
चकित करत नसतात

याचे बाहेर काही जाणवत असणारच
काहींनी मला क्षुद्र लेखून पाहिले
काहींनी मला जातीत फिक्स करायचा प्रयत्न केला
एक एक समस्या असे सोडून मी पूर्ण
स्वातंत्र्याचे बोलणे
त्यांना संतापजनक स्वार्थी क्रूर
वाटत होते

माझ्यातली एक एक गोष्ट
जणू ते रद्द करत चालले होते
मला ही आव्हाने
वाटण्याचा प्रश्नच नव्हता
ना ते क्षुद्र होते ना मी उदात्त होतो
सगळे मिळूनच तर आम्ही माझ्यातून
नाकारत होतो मनांचे सर्व पवित्रे

हे जसजसे जाणवू लागले तसतसे
त्यांनी अंग काढून घ्यायचे ठरवले
त्यांना जे वाटते तेच फक्त
अंतिम आणि श्रेष्ठ आहे यावर ते
अधिकाधिक ठाम होत गेले

मला प्रश्नच नव्हता मला ना
प्रसिद्ध व्हायचे होते ना अमर शेवटी
टवाळीपेक्षा दुर्लक्ष करणेच बरे असे त्यांचे झाले असावे
--- ००० ---

सहस्रार

दिसू लागली पुन्हा
दिलजमाईची चिन्हे
अंधारात पाणी निद्रिस्त असताना

तसे तर पायऱ्या
नाकारताही आल्या असत्या
सिग्नल नाही असे दाखवत

हे काही जंगल नाही
भेटतातच इथे माणसे
जरी सर्व विचारमग्न

व्यर्थी असणे जेव्हा
दुतर्फी समजते तेव्हा
निरागस होते उत्तेजित होणे

भलत्याच वेळी सरी
वाजत राहतात मोबाईल्स
मनाचा ऑर्केस्ट्रा करत

आता तरी द्यावी घ्यावी
वचने अभेद्यतेची
दुतर्फी माफी देतघेत

आपलेच हे सिंहासन
आपलेच राज्य या व्यस्तकाळात
सहस्रारचक्र भेदणारे

ये आता अनिर्बंध
विसर सर्व वस्त्रे
एकत्र होऊ या अदृश्य

--- ००० ---

खवैय्येगिरी

वाहोटीला लागण्यापेक्षा
खवैय्येगिरी कधीही चांगली
उपटसुंभ असण्यापेक्षा
कोणताही नवस बोलून
निश्चित काही मार्ग निवडणे
हे मानसिक
कारकीर्दीसाठी कधीही उपकारक

आपल्याच कवटीत असते
विषारी हवा हे माहीत असते
पण तो असतो ठामपणाचा परिणाम
हे आपण जाणून असतो

वेश्यांनी चर्चा करावी एकमेकींच्या
अनुभवांची आणि जीवनस्तरांची
तसेच कुठे ना कुठे गुंतलेले
मतभेद जोपासणारे पंटर
कोपऱ्याकोपऱ्यावर लक्ष ठेवून असतात

तुम्ही हिंदुत्ववाद बघा ना वापरून
एक तर मला सणासमारंभांची आवड नाहीय
आणि हल्ली मला वेळच नाही होत
ऑफिसातून घरी यायलाच साडेनऊ होतात
आणि आमचे एक काका समाजवादी टाइप आहेत
ते पाहतो ना आम्ही त्यांच्या घरात तर
लहानांपासून मोठ्यांपर्यंत
सगळ्यांना हाय बीपी आहे

पण मन गुंतलेले राहते आणि फार
वादविवाद मारामाऱ्या नाही होत
आणि तब्येतीची हानी कमीत कमी व्हावी
एवढे मी पाहतो याला चूक म्हणा की बरोबर म्हणा
की आपमतलबीपणा म्हणा मी आहे हा असा आहे
--- ००० ---

कवितेतली जान

सपाट शब्द जे कुठेच संबंध
नाही जागवत त्यांच्यांत जान नसते
शब्दांच्या कंगोऱ्यांना असायला हव्यात
अनपेक्षित दिशा त्याही तेवढ्याच
असे न वाटता

अनुभवाची मुरड वा पीळ
रचनेतली नवी नक्षी
कहींपे निगाहें कहींपे निशाना
किंवा असावे लागेल अशा बिंदूवरून
घेतलेले शूटिंग की त्याने अचरज
निर्माण होत कवेत यावे लागेल
अनिर्बंध बेधडकपणाचे
अविश्वसनीय जगणे

मुळात एक रूटीन जगणारे
सामान्य अस्तित्व
कोणते भान देऊ शकेल
कितीही भाषिक भर
आणला तरी

मुळात जगण्यातच कधी
कशाने येते जान
याची कवीला समज हवी
स्वत:च कंटाळलेली आणि तरीही
वाचकाकडून भारित प्रतिसादाची
याचना करणारी कविता
दयनीय असली तरी
वंचितच राहणार

स्वत:च्याच जगण्यात इंटरेस्ट
नसलेल्या कवीला सर्व एकत्र असल्याचे
कसे दिसणार
--- ००० ---

## चित्रांचे अर्थ

जग आहे असे वाटते तर असेलच
चटका बसलेला कळतोच ना
शिवाय अगणित छायाप्रकाश
चित्रकार घेतात त्यांचा वेध
आयला काय हुबेहूब मी म्हणतो
आणि लगेच येते लक्षात चित्र
असूच नाही शकत जे आहे त्याचे
त्यात जमा असतोच मूड

म्हणजेच मीही एंजॉय करतो छायाप्रकाश
ते असतात माझे मूड आणि दिसणाऱ्या
चित्रातही मी मिसळतो माझा मूड
हे जाणवून खजील वाटले

आहे खरे असे हे मान्य करून
पाहिले तर वाटले काय अर्थ आहे
स्वत:चे मूड चघळत बसण्यात
नुसताच आत्मगौरवी कालापव्यय

म्हटले जाऊ दे बाकीचे जगाचे
माझ्याकडून भले होण्यात माझे
त्रासदायक मूड कसे अडथळा होतात
याच्यात कुणी का घ्यावे इंटरेस्ट
मला मोकळीकच नाही मिळत
हे किती सांगत बसणार

म्हणून तडक मूडकडेच पाहायला हवे
हे घडताच मूड नष्टच झाला चित्रेही गायब झाली
आता माझ्या नुसत्या एका दृष्टिक्षेपात
नष्ट होते कोणतेही चित्र मला क्षणात कळतात
कोणत्याही चित्रांचे अर्थ

कळतात म्हणजे नष्टच होतात

--- ००० ---

निसर्गाचा अवमान

काळाच्या ओघात
ओघाओघाने कसे जगायचे
ते मी जमवत आलेलो आहे

फार भडक रंग वा धारदार रेषा मी वापरतच नाही
स्वत:ला पळपुटा न म्हणता
मी दुरुस्त्यांना नेहमीच वाव ठेवतो
आपली औकात अमुक आहे हे मान्य करत
किंवा ओळखत म्हणा मी साधने
फार महागडी आणि डोळ्यांवर येतील
अशी हेवादायक वापरतच नाही

त्यामुळे कधी कधी काहीजण
माझ्यात खंत निर्माण करू शकतात
ते म्हणतात की चित्रकलेत तू उगीचच इतकी वर्षे
वाया घालवलीस त्याऐवजी तू कविता
लिहिल्या असत्यास तर
पैसे तुझ्या नशीबातच नव्हते हे समजूनही
निदान काही दाखवण्यासारखे
काम तरी झाले असते

माझा मूलभूत डाव वेगळाच असतो
मला माहीत असते की यांनाही माझ्यासारखेच
काहीही कळत नाही हेही अंदाजेच भलेबुरे
वा यशापयशी झालेले आहेत
यांनी माझे गोडवे गाणे म्हणजे मी
आणखी एक खोटेपणा स्वीकारणे छोड दो

अगदीच आत्महत्या करण्यापेक्षा मला
हेच बरे वाटते की आपले आपल्याला सादर करत
गाठावा नैसर्गिक शेवट निसर्गाचा अवमान
आपल्या हातून घडू नये या विचाराची माझी प्रतिमाही
मी प्रचारात ठेवतोच
--- ००० ---

बोनाफाईड

तीस वर्षे कविता लिहिणाऱ्या कवीने
नेमकेपणाने कोणत्याही वस्तूकडे पाहणे
म्हणजे त्याच्यातल्या
चिंतनशीलतेचा अभाव ठरते
रसिक मंडळी ‘ कशाने गेले ते ‘
असा चेहरा करून सांस्कृतिक
कृतिशील राहतात समीक्षक म्हणतात
उगवतोय अजून तो तारा
उगवल्यावर पाहू

सांस्कृतिक म्हणजे मुख्यत:
आपापली दु:खे एकमेकांच्या
केस विस्कटलेल्या डोक्यांत घालणे असते

मंत्री कवीचा चरणस्पर्श करून
त्यांची सांस्कृतिक जागरूकता
आणि कलेची कदर दाखवतात

सेमिनारमध्ये काही डॉक्टर म्हणतात
दु:खाचा सखोल सोलीव कंद
या कवितेतून अलगद हाताला लागतो
पण बहुसंख्य डॉक्टर म्हणतात
समाजातल्या असंख्य समस्या आणि भूक
हे या कवीच्या गावीही नाही
याच्या दु:खासकट याच्या गांडीवर लाथ मारा

खरी बोनाफाईड दु:खे आणि बनावट
स्वत:चे महत्त्व वाढवण्यासाठी
निर्माण केलेली दु:खे
यांतला फरक ओळखणे आणि दाखवून देणे
हेच ठरते जाणकार समीक्षकांचे काम

कंदवाले कवी कावून करवादतात
--- ००० ---

याची बायको त्याची

दोघेही तसे बरोबरीचे एक यशस्वी आणि खूप
वैभवसंपन्न झाल्यावर दुसऱ्याच्या पोटात दुखणे
हे होणारच ना मानवी स्वभावाला धरून
शिवाय त्यांनी प्रदर्शन करून त्या दुसऱ्याला
खिजवायची काय गरज होती म्हणजे त्यांनाही
यश पेलले नाही तुलनेने श्रेष्ठत्व आले मनात
आता सगळेच नसले तरी काहीजण असतातच ना
माथेफिरू त्यांनी कसे वागायला हवे हे सांगणार कोण

शरण आले म्हणून त्यांना माफ केले हेच चुकले
त्यांनी मनात दुष्टपणा ठेवूनच माफी स्वीकारली
स्वार्थी तर सगळेच असतात काहींना जमते
चातुर्याने सतत वर्षानुवर्षे वर्चस्व राखणे शेवटी
सत्ताधाऱ्यांनी सैन्यबळाचा वापर केला तिथे ते
निष्प्रभ होणारच होते ना पण त्याची सूडभावना तर
टिकणारच होती ना माणसांच्या प्राथमिक गरजा
भागायला हव्यात हे तत्त्व पकडून तेलवंगण घालून
चालवायची त्यांची नुसती मशीन्स केली याला चांगले
कोण म्हणेल आपल्या जीवनपद्धतीवर दुसऱ्या कुणाचेही
आक्रमण कुणी का स्वीकारावे आणि ज्यालात्याला
आपला धर्म आपला देश श्रेष्ठ वाटणारच ना

ते ताकदवर असताना त्या वेळी त्यांनी जे केले
तेच आता यांना करायचे आहे न्याय म्हणजे त्यांनी
यांच्यावर केलेले अन्याय आज यांनी त्यांच्यावर करणे
दुसरे असू तरी काय शकते भौतिक इहवादी
विज्ञाननिष्ठ व्हायला हवे सगळे आध्यात्मिक संतांची
भंकसबाजी नको आहे निसर्गाने माल दिला पण
तो ठामपणे वापरायची ताकद नाही दिली
मग होणारच ना याची बायको त्याची हे सगळे
सगळ्यांना पटते हे तर घडणारच हे दिसतेच स्पष्ट

पण म्हणत राहायचे माणुसकीचे पोवाडे हे तर लागेलच ना
--- ००० ---

छातीपाठीवर

ही कविता ज्यांना कळत नाही
त्यांच्या छातीपाठीवर नेमकी
हरवलेल्या माणसांचीच नावे का असतात
ती माणसे होती अस्तित्वात हे इतके
डबघाईला आल्याप्रमाणे
नोंदवून का हवे असते
मालमत्ता पत्रकावर

त्यांचे त्यांचे राज्य त्यांनी चालवावे
पोरेबाळे आणि पोरीबाळी
यांना असतेच गरज
निसटून जाणाऱ्या हळुवार आरशांची

ही कविता ना कविता असेल
ना एखादे निशाचर उत्तेजन
खरे तर कुठे आहे काही स्पर्धा
ही कविता तर करणार आहे
मनालाच सतत अस्वस्थ आणि जखमी

या कवितेला खरे तर
तिचे वाचक कोण हेच नाही माहीत
इथे सत्यघटनेवर आधारित
एकही नाही आहे ओली आठवण

सामोपचाराने चालू ना एकत्र
तुमच्या सुंदर सुंदर रसिकांना
एंजॉय करेल ही कविता
ही स्थगित राहील
तुमचे संमेलन संपेपर्यंत

मग काय येतोय प्रश्न नाहीच आहे ही
अस्तित्वात खरोखर
--- ००० ---

पांढरे

कधीच वापरात न आलेले
रेझर मोडलेले औदासीन्य
पुलाच्या कठड्यावर रेलते
अनवधानाने व्हावा स्पर्श
पण तो क्षण जावा निघून
आणि राहावी फक्त आठवण
तसे त्याचे पूर्वायुष्य पडते खोटे

आता खरे तर खरे नकोच वाटते
मावळण्याच्या भीतीमुळे पांढरे पडलेले
--- ००० ---

सुखात जगू या सगळे

स्वभाव आकांक्षा सुरक्षिततेची इच्छा
वर्चस्वाची इच्छा ग्लॅमरची इच्छा
उत्तुंग यशाची इच्छा स्वत:च्या सात पिढ्यांचे
कोटकल्याण करण्याचे प्रयत्न धडा शिकवणे
हक्क मिळवणे सूड उगवणे नामोहरम करणे
देशोधडीला लावणे इज्जतीचा डंका वाजवणे
याच नीतीने वागणे हीच उपासना करणे
सर्वांचे भले मीच ठरवणार म्हणणे
मला आवडणाऱ्या परंपरा आणि उत्सव जोपासणे
माझ्या भूतकाळातून आलेल्या विचारांचे महत्त्व वाढवणे
इतिहासातले हिशोब चुकते करणे
विचारस्वातंत्र्याचा गवगवा करत
रोज एकमेकांची डोकी खाणे
देशाची चालचलन कशी असावी यावर
प्रत्येकाने विचार करत बसणे
फसलेली प्रेमप्रकरणे उगाळत बसणे
ब्रेकपची दु:खे भोगणे आपापल्या बाजू मांडत
काही ना काही सिद्ध करत राहणे
कोणतीही राजकीय भूमिका घेत तीच
यशस्वी होण्यासाठी झटत राहणे

या सगळ्या गोष्टी अनावश्यक
विषमता वाढवणाऱ्या दुफळी माजवणाऱ्या
देशाची उत्पादनक्षमता घटवणाऱ्या
हिंसा निर्माण करणाऱ्या शांतता
भंग करणाऱ्या देशाची प्रतिष्ठा धुळीला मिळवणाऱ्या
गोष्टी आहेत या सर्व छाटून टाकायला हव्यात

अमुक तास काम वर्षातून अमुक इतक्या रजा
आरोग्य-शिक्षणाची खात्री असली की बास
संस्कृती वगैरे बकवास गोष्टींची गरज नाही
रोबो होऊन शांततेत सुखात जगू या सगळे
किती तणावहीन छान जगता येईल
--- ००० ---

## एखादा उद्गार

एखादा उद्गार म्हणून आपण
टंगळमंगळ करत बाहेर पडतो
फ्रेश सकाळी हॉटेलात जातो तर
तिथे फ्रिजवर एक कबूतर दिसते
मग कळते की ते खोटे आहे
त्याने अर्थातच समाधान वाटते

आपल्याला कुणाचीतरी
वाट पाहायची असते
कोण येईल त्याची
आकर्षक कल्पनाही
करून झालेली असते
पण तिथे घुटमळणारे
आळशी मांजर
आपल्याला आवडत नाही
उगीचच ओरखडा उठत राहतो

आपण बाहेरच्या रस्त्याकडे
पाहतो तर तिथे फिरता
फुगेवाला दिसतो ही एक
कविताच आहे असे समजून
आपण अर्थाच्या फंदात पडत नाही

सुट्टी असल्याने समोर
मटणाच्या दुकानात गर्दी दिसते
त्यांच्या घरी त्यांच्या
प्रेमळ पत्न्या आणि आखवी कुटुंबेच
वाट पाहात असतील
म्हणून भराभर चालते
इथे हत्यार

राजकारण्यांनी नवीन काही
लोच्या करू नये म्हणजे झाले

--- ००० ---

नायक

मी नायकाला विचारले
तू किती युद्धे पाहिली आहेस
त्याने खिशात हात घातले
मी इरेला पडून पडदा उघडला
प्रेक्षकांच्या ऐवजी तिथे
सगळे तिकीटतपासनीस होते
तो हसला त्याने खिशातून
शंख काढला मी म्हणालो
मला नाही माहीत शिष्टाचार
माझी दु:खे हीच माझी युद्धे
बघायची आहेत का असे म्हणून
त्याने शंख फुंकला
--- ००० ---

प्रेमकविता

पुरुषांच्या प्रेमकविता
थोड्याफार क्रीडेसह
पुरुषांच्यात जसा मत्सर जागा करतात
तशा स्त्रियांच्या स्त्रियांच्यात करत नाहीत
या अंदाजाने तो ती झाला

आणि त्याच त्याच्याच प्रेमकविता
त्याने तिच्या म्हणून लिहिल्या
टोपणनावाने गुप्तपणे तरीही
कोण हा तिचा भाग्यवान म्हणून
जळफळतातच पुरुष
हे त्याच्या लक्षात आले आता
हा नवीनच होता पेच
पण एखाद्या स्त्रीला आवडावे
तसे ते त्याला आवडले
कारण आता

तो मत्सर त्याच्याबद्दल नसून
ती रूपी तो च्या
प्रियकराबद्दल होता
जो अस्तित्वातच नव्हता

काही पुरुष आपणच तो
असा अनुभव घेत खुश होत
ते मात्र त्याला आवडत नव्हते

सरळ कविता म्हणून का नाही
वाचू शकत लोक
या विचाराने तो हैराण होई

कवितेतला मी म्हणजे
कवी स्वत: असेच काही नसते
हे कुणालाच समजत नव्हते हा मूळ पेच होता
--- ००० ---

जनता

ज्यापासून स्वसंरक्षण करावे
अशी त्यांची कारणे जवळची होती
छोटीछोटी
त्यामुळे ते छोटे आणि राहणार होते
फक्त प्रादेशिकच

ज्याला कारण मोठे मिळेल
तोच व्यापेल मोठा परिसर
हे पाहून
असे कारण मिळालेल्यालाच
करावे आपले कारण
असे त्या प्रादेशिकांना ठरवणे भाग होते

पण मोठा परिसर व्यापू शकेल
असा हीरो नव्हता दृष्टीपथात
त्यामुळे छोट्यांचा नेता कोण एकूणात
हा प्रश्न मोठ्याला सुखाचा होता

टीव्हीवर बातम्या चालू
एका फोनवरून मोठ्याची
छोट्यांवर आगपाखड
आणि त्याच वेळी दुसऱ्या फोनवरून
निरनिराळ्या छोट्यांचे खंदे लढवय्ये
असे जनता दोनच कान एकच मेंदू
असूनही रिचवत राही सतत

आपली बाजू कोणती हे बहुसंख्यांचे
आधीच ठरलेले असूनही मेंदू
शिणवावाच लागे घशाला
कोरड पडेल ही चिंता सोडावीच लागे

अनेकता मे एकता म्हणत जनता
जीव खाऊन चवताळत राही सतत
--- ००० ---

मते

माझे बालपण संकटग्रस्त होते आईवडील
चिंताग्रस्त असत त्यांनी मला एका स्वामींकडे नेले
मौनातून त्यांनी त्यांच्या शिष्यामार्फत सांगितले
त्याप्रमाणे दर शनिवारी मी शेंदरी भडक मारुतीला
तेल वाहून प्रदक्षिणा घातल्या नंतर भृगू संहिता झाली
मी बरा होणार होतो पण अठ्ठावन्नला माझा मृत्यू होता
बालपणी जिवंत माशाच्या तोंडात औषध घालून तो जिवंत
गिळणे लगेच हेही मी करणे झाले होते नंतर माझा विश्वास उडाला
मी एका पोकळीत राहू लागलो निर्बुद्ध होऊन हरवलेला
मग वाचनातून जगही संकटग्रस्त असल्याचे कळले
विषमता वा धार्मिक जातीय भेदभाव नको असे मी म्हणू लागलो
मला शेजारीपाजारी म्हणू लागले कम्युनिस्ट आणि मला
विचारांचे पटणे वा न पटणे वाटू लागले संशयास्पद

नंतर मला समजले की विचाराने संकट घालवायचे तर नक्कीच
माणसांची फक्त यांत्रिक शरीरे उरतील पण तसे झाले
तरी काय हरकत आहे सगळे सारखे तरी असतील असेही
मनात काहीसे मान्य असे नाहीतरी अगदी कलाबिला
म्हटली तरी विचारांचेच तर चालते जग त्या ऐवजी हे विचार
असे वाटे नंतर समजले अमुक वाचवण्यासाठी तमुक खूप
हिंसा होईल माणसे बरीच प्रत्यक्षातही मरतील उरलेली मनांनी

माझ्यात घडून गेलेला आणि घडत असलेला मतांचा गलबला
मी नाकारायचे ठरवले कोणतेही नको आणि काहीच नको
हे कळल्यामुळे अजूनही कम्युनिस्ट असल्यासारखाच मी
सगळ्यांचा शत्रू झालो आता तर कम्युनिस्टांचाही

विचारगुटी नाकारणे आणि संकट नाकारणे एकत्रच घडले असावे

मतेच नसणे कुणालाच मान्य नव्हते हे तर माणसांतून उठणेच होते
यांची वा त्यांची मते मी स्वीकारलीच पाहिजेत असे झाले
काहींचे व्हा शत्रू पण सगळ्यांचे नाही हेच सगळे रेटत होते
--- ००० ---

## कौवा मोती खायेगा

इतके कसे मूर्ख लोक
इतके कसे मेंदू गहाण टाकलेले
इतक्या साध्या गोष्टी यांना कळू नयेत
म्हणजे काय किती हे अज्ञान
की याला अंधश्रद्धा म्हणावे

डॉक्टर्स इंजिनियर्स प्राध्यापक अकाऊंटंट
शास्त्रज्ञांपासून भाजीवाल्यांपर्यंत
हेच चालावे हे किती शोकात्म आहे

हे सगळे नालायक लोक
कलियुग घडवताहेत
कलियुग ही कालबाह्य
खोटी कल्पना असली तरी

लोकांना काय दिले पाहिजे आपण
देतोय काय कशाचे महत्त्व
वाढवतोय आपण हे कळणार तरी कधी

अगदी शाळेत असल्यापासून
आम्हाला चांगले-वाईट कळत होते
सदसदविवेक बुद्धी होती
श्रेय-प्रेय कळत होते

आमचेही पाढे पाठ होते शुभंकरोती
आम्हीही म्हटलेच की पण वेळ येताच
कात टाकावी तसे आम्ही सोडून दिले ते

साधी बुद्धी लागते साधा तर्क लागतो
इतक्या उघड गोष्टींकडे दुर्लक्ष होतेच कसे

हे असेच मरणार उड्या मारत
हसत खेळत गाणी म्हणत
कौवा मोती खायेगा हे गाणे
हेच म्हणत असतात

ते गाणे नसले पटण्यासारखे
तरी घडतेय तर तेच ना

बेसिक असते हे सगळे अगदी
प्राथमिक आणि अत्यावश्यक
आणि शेंबड्या पोरालाही कळावे असे

आशावादी तर राहावेच लागेल
नाही तर काही बोलताच येणार नाही
आणि स्वातंत्र्याचा वापरही व्हायलाच हवा
पण हे भोसडीचे कधी सुधारणार नाहीत
हेच खरे सत्योत्तर आहेत साले सगळे
--- ००० ---

की दुसरेच काही

आकाश ढगाळ आहे हे कबूल
पण सूर्यास्ताला अजून पाऊण तास आहे
या वेळी आकाशात एकही पक्षी नाही
असे होऊच नाही शकत या वेळी तर
नक्षी बदलत घराकडे परतत असतात ते
मग आजच असे का एकही नसणे आकाशात
जरा वेळाने आला बाबा एक पण एकच कसा
मग आणखी बऱ्याच वेळाने हे आणखी दोन

आज काय वेगळे असेल प्रलयाचा पाऊस
येणार असेल की काय की विजा पडणार आहेत
की आकाशातून एखादी प्रचंड वस्तू
आणि हे कळत कसे असेल त्यांना
सगळ्यांना कसा पोचत असेल संदेश
की उपजतच समजत असेल आपोआप

हे काहीतरी अघटित आहे अजब आहे
की त्यांचे जगच माहीत नसल्यामुळे तसे वाटतेय

आवाज तर येताहेत साल्यांचे म्हणजे
घरोघर जाऊन पोचलेत सगळे
घाबरलेले असतील की हे एक
रूटीनच समजत असतील ते
आज सगळे लौकर परतल्यामुळे
कौटुंबिक गप्पा मारत असतील का
भीतीने किंवा हसतखेळत की दुसरेच काही

सारांश आपले खगोलशास्त्राचे ज्ञान
कांटहेगेलचे ज्ञान जेरूसलेम संघर्षाचे
आणि जगातल्या राजकारणाचे नेमके ज्ञान
एकसारखेच असले तरी इथले राजकारण
कळतेच ना आपल्याला बास ना मग
बोलते रहेंगे बोलते रहेंगे बोलते रहेंगे
--- ००० ---

बोलबाला

असत्य तयार करणे अर्धवट
सत्याचा गैरवापर करणे
खोटे बोलणे बनावट
क्लिप्स पसरवणे आयटी सेल उभारणे धादांत
आपमतलबी विद्वत्ता वापरून
सर्वहिताचे नारे देणे उपरोध
तुच्छता द्वेष मुबलक वापरत
जिंकायचा प्रयत्न करणे
हे सगळे आणि इतर शक्यतेप्रमाणे
सामदामदंडभेद हेही मनमुराद
असणे हेच तर सगळे सत्योत्तर

आपणच विकसित करत आणलेला
हा जगन्मान्य काळ आहे
आता पुन्हा मागे जाऊन
ती जुनी मूल्ये कुठे चाटत बसता
मने वापरण्याची जगमान्य
व्यवस्था तर आपण सर्वांनीच
घडवलेली आहे उत्स्फूर्तपणे

आता रडत यायचे नाही हा मला
असे म्हणतो किंवा भांडण लावतो
निष्कारण आमच्यांत किंवा मी
मागे काही बोललो होतो
त्याचे चुकीचे अर्थ लावून हा
माझी बदनामी करतो असे म्हणत

तुमचे खोटे हरणे म्हणजे सत्याचा
पराभव तुम्ही जिंकणे हा सत्यविजय
हे तर सत्यच असत्य नाहीच
या काळात एक मात्र निष्ठेने आहे पाळणे

सत्याचा बोलबाला जोरजोरात करत राहणे
--- ००० ---

सुखवस्तू

अन्न खाणे पाणी पिणे काम करणे
थोडी करमणूक आणि झोप मिळणे
हे सुखवस्तू लाजिरवाणे जिणे
असल्याचे बिंबवले जाते
आणि तब्येतीसाठी व्यायाम करणे
हे तर फारच स्वार्थी असंवेदनशील

व्यायाम नको फालतू कुठेही काहीही खा
करमणूक नकोच आणि झोपेचे मातेरे होऊ द्या
आजाराग्रस्त व्हा त्रस्त असा सडून
लौकर मराल असे पहा कशाला स्वत:ची कोडकौतुके
आत्ममग्नता स्वार्थीपणा आणि महत्त्व
देणे स्वत:च्या सुस्थितीला यावर
आधुनिक छान आहेत उपाय सहज उपलब्ध

समाजमाध्यमांचा भरपूर वापर करणे
झोपेचे खोबरे करत सतत विचारात राहणे
आणि एकूणच परिस्थितीबाबत सतत
असमाधानी आणि वैतागलेले राहात
टीका करत कुत्सित बोलत शिव्या देत
सतत भडकलेले राहणे

याने तुमचा चेहरा खडबडीत होईल
तुम्ही गंभीर दिसाल खूप चिंता काळज्या
यांच्या योगाने तुम्ही अनुभवसंपन्न दिसाल

जगाची अवस्था तुम्हाला बघवत नाहीय
म्हणूनच हे सगळे असे घडतेय
हे तुमचे आप्तस्वकीय मित्र समजून घेतील

सतत सिगरेट आणि मोबाइल चालू द्या
दुसऱ्यासाठी मेलास तर जगलास हे राहू द्या लक्षात
याहून जास्त कशाचीच गरज नाही पडणार
--- ००० ---

## वस्तू आहेतच

वस्तू आहेतच त्या
दिसायला हव्यातच
पण त्याचबरोबर
हेही आहे की
त्या अमर्याद आहेत

अन्यथा होईल काय
की माझ्या मनाच्या
सावल्याच दिसत राहतील
नुसत्या अवास्तव

प्रत्येक सावलीत आहे
आठवण अभिमान
आणि सडलेल्या काळाचे विष

मला आहे जन्मतारीख
पण या पक्ष्यांच्या आवाजांना नाही
कारण ते असणे आणि नसणे
यांना जोडणारे
अभेद्य पूलही आहेत
आणि अनुपस्थित शब्दही

मी माझ्या दिनक्रमात
अनेकदा रमतो धडपडतो
असण्यानसण्याच्या मयसभेत
तेव्हा इथे हसायला असतात
माझ्याच प्रतिमांचे
कौरवपांडव सुष्टदुष्ट

माझे धष्टपुष्ट होणे
मलाच चेचत राहते
हे पाहूनच तर मी हेतूहीन
अंतर्धान पावत असतो
--- ००० ---

आंतरद्वंद्व

कबूल करतो की दारू हा एक आहे
माझा अधूबिंदू पण एक ना आढ्यता ना अडून बसणे
हातभट्टीपासून अत्युत्तम दर्जापर्यंत काहीही चालते
आता दुर्दैवाने उत्तम बार आणि उत्तम माहोल
हे जमूनच जाते त्याला काय करणार पण एक
मला जाणीव असते भारतातल्या कोट्यवधी लोकांची
की हे नाही असत उपलब्ध त्यांना त्यामुळे दारूच्या दोन थेंबांऐवजी
मी आधी हवेत उडवतो माझे दोन अश्रू आणि मगच म्हणतो चियर्स

नाही कसा म्हणू आणखी एक आहेच मला छंद
मी एक नामचीन खवैय्या आहे विनोद दुवाही माझे पाय धरेल
जगातली भारतातली अनेक शहरे गावे व्हेज नॉनव्हेज असंख्य
प्रकार कुठे काय उत्तम मिळते ते मी धडाधड सांगू शकतो
पण एक मला जाणीव असतेच हा मी माझ्यातला दोषच समजतो
प्रत्येक वेळी वाईट वाटत वाटत मी ताव मारत असतो
असंवेदनशीलतेने एंजॉय करणे हे माझ्या तत्त्वातच बसत नाही

मीही माणूसच तर आहे कधी आजारी पडलोच तर उत्तम आरोग्यसेवा
उत्तम औषधे घेऊन मी सत्वर बरा होतो डिस्चार्ज घेऊन घरी आल्यावर
पहिला दिवस माझा कोट्यवधींचा विचार करण्यात जातो मग त्यांची
अशी अवस्था कोणत्या व्यवस्थेमुळे झाली आहे त्यावर मी एक लेख लिहितो

खरे तर राज्यघटनेत सगळे आहे पण आपण ती पाळत नाही म्हणूनच
त्या कोट्यवधींना असे जगावे लागते आपण बोलतो एक वागतो वेगळेच

प्रत्येकाच्या मनाचे आंतरद्वंद्वात्मक असणे हेच तर नसेल या अन्यायी
व्यवस्थेचे कारण असाही येतो प्रश्न पण दुष्ट लोक तर सरळ सगळे बाहेर
दिसतच असतात ना बेफिकीर असंवेदनशील आपमतलबी आत्मसुखभोक्ते

राहतो मी विसाव्या मजल्यावर पण एक मनात ते असतेच खाली पाहताच
वाटते उडीच मारावी पण एक येते लक्षात की त्यांची बाजू घ्यायला कठोर
लढा द्यायला मी असायलाच हवे आणि याच विचाराचा आंतरद्वंद्वी नाइलाज होतो
--- ००० ---

## मांजरी आणि तिची पिल्ले

हवा अंधुक असली तरी
मांजरीच्या पिल्लांना काही फरक नाही पडत
आकाशाचे सौंदर्य बघण्यापेक्षा
ती एकमेकांची स्वप्ने चाटतात

भाषेला अर्थ असतो
हा गैरसमज ती नाही बाळगत
त्यांच्या समोर जरी कुणी अनैतिक चुंबन घेतले
तरी त्यांचे लक्ष असते ते
धोक्याच्या रहदारीवर

ती तीन असतात नाजुक आवाजांची
मांजरीला काळजी असते
त्यांचे अंग आरशात वितळण्याची

ती दिसते जरा भयप्रद
तिच्या पूर्वजांनी तिला दिलेले असते ज्ञान
कुंडलिनी कधीही जागृत होऊ न देण्याचे
अन शक्य तो रटाळ उजेडातच
प्रगती करत राहण्याचे

ती याच कॉलनीत आहे गेली काही वर्षे
इथला कचरा खूप दर्जेदार असतो
बाहेरच्याही चवी तिला माहीत असल्याने
तिच्या पिल्लांवर ती योग्य ते संस्कार करते

तिच्या मैत्रिणी त्यांच्या पिल्लांना खेळ नाच शिकवतात
हिला ते पटत नाही आपापले अन्न खाऊन
ज्यानेत्याने संवेदनशील राहिले की बास ती एवढेच
शिकवते तिच्या पिल्लांना पावसाच्या वेळी हा आडोसा पकडा
आणि आपण मराठी आहोत हे विसरू नका
आपले गुरगुरणे नीटच असायला हवे आणि तशी
याहून जास्त भाषेची गरजच नाही हेही
--- ००० ---

## तिळतिळ

तो बराचसा अहंकारी आणि अर्धवट वेडा होता
पण सर्वसामान्यांहून खूपच जास्त
कारण त्याला प्रचंड आत्मविश्वास होता
इतिहास आणि राजकारण यांच्या सखोल
अविरत आणि योग्य दिशेच्या
अभ्यासाने आणि विश्लेषणाने आलेला

देशाच्या आणि जगाच्या सर्वच समस्यांवर
त्याच्याकडे नुस्खे तयार असत ते ज्ञान
गुप्त न ठेवता तो सर्वांना निस्पृहपणे
वाटे कारण सर्वांचे भले व्हावे ही त्याला तळमळ असे

सामान्य गरीब माणसे चांगली आणि उरलेली इतर
आत्मकेंद्री असंवेदनशील आणि क्रूर
हा त्याच्या विवेचनाचा पाया असे निर्विवाद
पण माणसे अशी दुष्ट आणि चांगली
दयाळू आणि क्रूर होतातच का हा विषय
तो म्हणे अध्यात्माचा आहे माझा नाही
लोकांना अध्यात्म समजणे शक्य नाही
आणि ते समजायची वाट पाहणे हा मूर्खपणा आहे
किंबहुना अध्यात्म ही एक मानवनिर्मित आकर्षक थाप असून
खऱ्या उपायांना प्रतिबंध करणारी एक भ्रामक कल्पना आहे
हे तो पूर्ण स्पष्टतेने सांगू शके सक्तीच हवी असे तो म्हणे

त्याचे कुणी ऐकत नाही ही एकच
महत्त्वाची समस्या त्याला वाटे तो लोकशाही माने
पण लोकांना अक्कल नसल्याच्या दु:खात राही
खूपच खरे बोलायची उबळ आली तर तो
लोकांना विशेषत: मूर्ख गरिबांना
घाण शिव्या देई त्याच्या समविचाऱ्यांसह

एकत्र जमून तो अंत:करण तिळतिळ तुटण्याचा
साश्रू उत्सव साजरा करे मग ते सर्वजण दारू पीत
--- ००० ---

चव

साखर टाकलीय कपात
असे समजून चमचा ठेवला होता
पण पहिल्या घोटातच कळले
बिनसाखरेचाच राहिलाय हा चहा

मी दुरुस्ती नकोच असे ठरवले
आणि कोवळ्या उन्हात मिसळून गेलो

पण हे विसरले गेले नाही
ते वागवतच दुपार झाली
संध्याकाळ झाली ऑफिसात
बरेच काम केले जरा उशीरच झाला निघायला
तरी बॉसने बोलावले हे एवढे एक
पूर्ण करूनच जा म्हणाला
त्याला संघर्ष हवाच होता
मी दुर्लक्ष करून संध्याकाळच्या प्रकाशात
मिसळून गेलो घरी परतलो

तोवर शेजाऱ्याची तब्येत बिघडली होती
चहाच्या चवीकडे लक्षच न देता झटक्यात
तो पिऊन त्याला इस्पितळात नेले

रात्री वाटले जिभेची इच्छा आपण डावलत चाललोय
तसाच झोपेत मिसळून जायचा प्रयत्न करत राहिलो
--- ००० ---

## पत्ता

आपण एकमेकांचे भूतकाळ दुर्लक्षून
आपल्या शाब्दिक सावल्या एकत्र केल्या
तेव्हाच खरे तर
लौकिक आणि नैतिक
प्रेमाचे प्रांत
आपण विसरलो होतो

देण्याघेण्याचे ताळेबंद संपवून
तू साजरे केले होतेस
एक अमर इंद्रधनुष्य
ज्याला मी अजूनही बुजत होतो

यातूनही तूच दिलासा देत
माझ्या आवडत्या गाण्यांचा
विषय काढलास जवळ येत

भूतकाळाशिवाय
कसे असते उत्तेजनाचे सुख
हे तुझ्याच सर्जक कल्पकतेने
मला उमजत गेले

आणि मग एका क्षणी
मी माझे स्वप्न ओलांडत
अतिक्रमण केले
तुझ्या वर्तमानात
माझ्या वर्तमानाने

आधी तू यशाचे स्मित केलेस
मग अर्पण होण्याची ग्लानी
स्वीकारलीस सहज

आता ना तुझा पत्ता होता
ना माझा
--- ००० ---

## मित्र

कॉलेजच्या कँटीनमध्ये खायचो
तेव्हा खिमापाव ही माझी ठरलेली डिश असायची
माझा एक मित्र काही शाकाहारी खायचा
मग आम्ही चहा मागवायचो
माझा पिऊन झाला तरी
त्याने अजून सुरुवातही केलेली नसायची
मला नाही पिता येत इतका गरम तो म्हणायचा

हॉस्टेलवर एका मुस्लिम मित्राकडे मी जाई
तेव्हा त्याचे आणखीही मित्र तिथे असत
माझे हिंदी बोलणे ऐकून मीही मुस्लिम आहे का
असे ते मला विचारात मला छान वाटे

सांगलीला माझ्या एका मित्राकडे मी जाई
तेव्हा संध्याकाळच्या मैफलीत त्याचा एक मित्र असे
त्याला मराठी लेखकांची अनेक लफडी माहीत असत
कामीपणाची आणि बक्षिसासाठी केलेल्या लाचारीची
आणि अभ्यासाला स्वत:ची पुस्तके लावून घेण्याची
सगुण-दुर्गुण हा जोड शब्द तेव्हा वापरात येई
पण नंतर काही लक्षात राहात नसे

लता श्रेष्ठ की आशा यावर एकदा एका मित्राशी
खडाजंगी वाद झाला होता नुसते सुरेल असण्यापेक्षा
आशाच श्रेष्ठ अशी माझी बाजू होती माझ्या परगावातल्या
घरात तो आलेला होता मी भडकून त्याला चालता हो इथून म्हणालो
ती अपराधी भावना अजून आहे मनात उगीचच घडले ते

आपणही असेच काही ना काही चौकट असलेले
ठिकठिकाणचे फिक्स मित्र आहोत त्यांना काय वाटत असेल
असे मनात येई आपणही सगुण-दुर्गुणच तर आहोत हे जाणवे
मतेमतांतरे ओलांडणारीच हवी मैत्री असे मनात येई
खरे तर नकोतच अमूकच सवयी अमूकच मते असे वाटे
अन्यायाविरुद्ध मते हवीतच असे म्हणत काही मित्र माझ्यावर चिडत
--- ००० ---

विश्वनिर्मिती

आपला मेंदू हेच तर
भानाचे विचाराचे कल्पनेचे
सारसर्वस्व हाच तर आपला
विज्ञानवाद इहवाद बुद्धिप्रामाण्यवाद

परवा एक वैज्ञानिकच सटकला
की काय असे वाटावे असा
ते क्वांटम वगैरे असलेला
माझ्या मेंदूत अजिबातच न शिरलेला
एक लेख वाचला की म्हणे मेंदूशिवाय
विश्व हे स्वसंवेद्य आहे
म्हटले बाप रे मग आता
वैज्ञानिक दृष्टिकोणाचे काय होईल

खरे तर कल्पनाही अनुभवाधारितच असणार
मेंदूच्या बाहेरच्या या संवेद्यतेबद्दल
मेंदू कसा काय बोलू शकेल
तसे तर मग बुद्धीचे गोडवे गातच
नास्तिकांना आस्तिक नाही व्हावे लागणार का

माझा मेंदू भंजाळून गेला
बुद्धीने बुद्धिबाह्य कसे काही समजू शकेल

पण एक प्रकारे पटते हे साले
मेंदूची संवेद्यता फक्त अनुभवाधारितच
असल्याने मर्यादित आहे
विश्वाची निर्मिती अशी अनुभवाधारित
असूच नाही शकणार
अनुभवाचा कोणताही साठा नसताना
विश्वनिर्मिती झालीच कशी असेल

की आपल्या मेंदूला वाटतेय की झालीय
विश्वनिर्मिती पण प्रत्यक्षात ती झालेलीच नसेल

--- ००० ---

मर्मदृष्टी

विज्ञान म्हणून यातले शून्य कळत असूनही कविता म्हणून मला हे कळते आणि ग्रेट वाटते --

With this new insight into gravity, physicists at last were able to make actual predictions about the universe's behavior, turning cosmology into a science. Einstein was the first to try. Yet as events showed, even Einstein was a fallible genius. A misconception about the nature of the universe led him to propose a mysterious new gravitational effect—a notion he soon rejected. But he may have been right for the wrong reasons, and his "mistake" may yet turn out to be one of his deepest insights.

विश्वाच्या अवस्थेबाबतच्या चुकीच्या कल्पनांमुळे
त्याने एका गूढ नव्या गुरुत्वाकर्षणाची शक्यता सांगितली
पण लौकरच त्याने तिचा त्याग केला
पण त्याचे बरोबरही असू शकेल काही चुकीच्या कारणांमुळे
आणि अजूनही त्याची ' चूक ' ठरू शकते
त्याच्या सखोल मर्मदृष्टीचे एक उदाहरण.

----- वाह रे वाह ! क्या कमालकी कविता है !!!!!
--- ००० ---

काहीबाही

अंधारात शुकशुकाटात मी बाजारात होतो
शर्ट घ्यायचा होता म्हणून ओळखीच्या दुकानात गेलो
तिथे फक्त एक छोटा दिवा आणि दुकानदार होता
ओळखीचे हसून तो म्हणाला विकले आम्ही हे दुकान
खरेच ते रिकामे केलेले होते मग दुसऱ्या दुकानात गेलो
तिथे फक्त एकच शर्ट होता अहो असा
हिरव्या चौकटीचा मी नाही वापरत दुसरा दाखवा
हा बेस्ट आहे वापरून तर बघा जास्त तरुण दिसाल
तो घेतला आणि निघालो सर्व्हिसिंगला दिलेली
माझी स्कूटर घ्यायची होती स्कूटरवरच तर
फिरत होतो की मी हे कसे म्हणेपर्यंत मी पोचलोच होतो
त्या दुकानापर्यंत स्कूटर झाली होती हे कसे काय
माझी स्कूटर हिरवी कधीच नव्हती असा विचार करत निघालो
एका ठिकाणी थांबलो तर लक्षात आले की नंबरप्लेट
उलटी झालीय असे व्हायचे काहीच कारण नव्हते
पुन्हा त्या दुकानात गेलो आणि तिथल्या कामगार असलेल्या
संतोषला बोलावले चुकून झाले असेल तो हसून म्हणाला
एका मिनिटात नीट करतो मग तिथून पुन्हा निघालो
रस्त्यात उजेड नव्हता पण स्कूटरच्या प्रकाशात एक कुत्रे
सारखे मधे मधे येत होते अपघात होईल च्यायला
असा विचार करतोय तोच स्कूटरमधूनच एकदम
जोरात भुंकण्याचा आवाज आला आणि ते कुत्रे धूम पळाले
निर्मनुष्य रस्त्यात लक्षात आले की साला
गाडीचा पिकपच गेलेला दिसतोय म्हणजे आता
डिकार्ब करायला पुन्हा द्यावी लागेल बहुतेक
पण मग हे त्याने आधीच का नाही सांगितले
असा विचार आला तर जास्त पैसे मिळवण्यासाठी
तो हे सांगतोय असे मला वाटेल असे त्याला वाटले असावे
मी त्याच्यावर विश्वास टाकला असता
हे त्याला कळले नसावे पण आता उद्या टाकू गाडी
म्हणून रेटत तसाच घरी पोचलो सगळे बाहेरगावी
गेलेले होते कुलूप होते किल्ली होतीच खरे तर माझ्याकडे
पण लौकर सापडे ना शेवटी सापडली कुठे
तर त्या नव्या शर्टाच्या खिशात खरे निघाले साले
तो वापरून पाहा म्हणाला ते चांगलेच झाले

नाही तर काय केले असते रात्रभर आणि या वेळी
डुप्लिकेट चावीवाला तरी कुठे मिळाला असता
घरात गेल्यावर लक्षात आले की बोंबला जेवणार काय
बाहेरून जेवूनच यायला हवे होते त्या सगळ्या
गोंधळात लक्षात नाही आले पण चुरमुरे आणि फरसाण होते
मरू दे म्हणून एक क्वार्टर काढली आणि चखणा हाच
मेन कोर्स म्हणून सुरुवात केली
सगळे कसे असे घडते एकही काही नीट का नाही
माझेच असे होते की सर्वांचेच होत असेल मग
या जगण्याचा अर्थच काय असा गहन विचार आला
लघवीची इच्छा झाल्याने त्यातून सुटका झाली
चांगलेही घडत असतेच म्हणा काही काही
या दिलाशात झोपी गेलो पण स्वप्ने पडत राहिली काहीबाही
--- ००० ---

फलाट

एखादी लांब पल्ल्याची एक्सप्रेस
शहराच्या फलाटाला येते
तेव्हा ती एक प्रचंड घटना असते
हजारोंच्या आयुष्यांतली
तिथे असलेल्या वा नसलेल्या

त्या गाडीच्या इंजिनाला याची जाणीव असते
हे खूप मोठे काम
कर्तव्यभावनेने केल्यासारखे
ते भव्य निस्पृह आणि नम्र दिसते
अशी कामे ते रोजच करत असते
आज लोक वेगळे आहेत इतकेच
अशा विचारात जणू ते दुर्लक्षच करते
लोकांच्या कृतज्ञ डोळ्यांकडे

स्त्रिया पुरुष तरुण वयस्कर आपलेच तर
आहेत सगळे अशा भरदार पक्कतेने
ते गाडी आणून लावते

सर्व विक्रेते हमाल यांचा पूर्ण विश्वास असतो
की असे योग्य ते घडतच राहील

गाडीचे डबे असतात आज्ञाधारक
ध्येयाचे अनुगामी आणि तटस्थ

प्रवाश्यांना आणि त्यांच्या आप्तस्वकीयांना
मित्रांना मात्र असतात सुखदु:खे हास्ये
वेदना जखमा आठवणी मानापमान
हिशोब चुकते करण्याच्या इच्छा
आणि अनेक मनसुबे चेहऱ्यांमागे लपवलेले

हवा जरा पावसाळी असते पण हे सगळे
नेहमीचेच बघून जरा स्मित करत असते
--- ००० ---

## वाह चांदणे

वाह चांदणे
वाह पाऊस
असे त्याला कधी होत नसे
तसे तर चांदणे आणि पाऊस
अशा अपवादात्मक घटना सोडता
तो आकाशाकडे पाहातही नसे

एखादे फूल वा फुले पाहून सामान्यतः
स्त्रिया हरखून जातात हे पाहून
तो मनात म्हणे स्त्रियांचे मेंदू वेगळेच
चालत असणार नजाकत
हा प्रांतच त्यांचा असावा

लोक निसर्गसौंदर्य पाहण्यासाठी
शेकडो किलोमीटर प्रवास करत जातात
तो त्याला फालतू हावरटपणा वाटे
जरा एक बदल वेगळी हॉटेले
हे ठीक आहे असे तो म्हणे
इयाट काही न समजता अजिंठा
वेरूळ बदामी घारापुरी कोणार्क
पाहणाऱ्यांचेही त्याला हसू येई

सिंहगडावरचे पिठले-भाकरी
यांचा गौरव करणारे लोक पाहून
एवढे काय च्यायला कधी न खाल्ल्यासारखे
असे त्याला वाटे

मुद्दाम हिमालय वा ताजमहाल
पाहायला जावे असे त्याला
कधीच वाटत नसे

सौंदर्य इतिहास आणि संस्कृती
हे त्याला निरर्थक भ्रम वाटत
--- ००० ---

नेमके

तुझे म्हणणे एका मिनिटात सांग त्याचे साहेब म्हणत
येताना एका ठिकाणी पाच कबुतरे दिसली की काल
मी नवे बूट घेतले नेमकी सुरुवात कुठून करायची
हे त्याला कळत नसे सगळे एकत्र मिसळून येई

एकदा त्याचा मित्र थट्टेने म्हणाला त्याला की तू
आत्मचरित्र लिही बालपणातले खेळही येऊ देत
त्यात तो म्हणाला नेमके आवश्यक तेवढेच सुचेल
तेव्हाच लिहीन मी म्हणजे काय मित्राने विचारले

बोंब अशी आहे की माझ्यातले काहीच वाटत नाही
मला तसे माझे जगणे धरून हे सांगताना त्याला रडू आले
--- ००० ---

रहस्य

तुम्ही माझे आहात कुणितरी हवेच ना असे
म्हणून फक्त तुम्हाला आज मी
सांगून टाकतोय माझे एक रहस्य

अशी ढगाळ हवा असली की माझा कामाला
मूडच नाही लागत आणि तसेच कुणी जवळचे
वा माहितीतले गेल्याचे कळल्यावर एखाद्या मित्राशी
म्हणा की एखाद्या प्रिय मैत्रिणीशी दुरावा तयार झाला
तर ते नीट होईपर्यंत मी अस्वस्थ असतो

घरात काही कुरबूर होणे घरदुरुस्तीकडे
बघायला वेळच न मिळणे एक डिपॉझिट
रिन्यू करायचे राहिलेले असणे किंवा
साधी सर्दी झालेली असणे अशा गोष्टींनीही
माझा मूड गेलेला असतो नकोच वाटते काही

तरीही मी एक अत्यंत कार्यक्षम स्मार्ट माणूस
म्हणून प्रसिद्ध आहे मला लोक एनर्जीचा
साठा समजतात निस्पृहपणे मदत करणारा
माणुसकीयुक्त संवेदनशील प्रेमळ विश्वासार्ह
आणि बिनधास्त प्रेम करावे आदर बाळगावा
असा समजतात पण असे त्यांना वाटण्यासाठी
मी किती काय काय मनात दडपून टाकलेले असते
ते त्यांना माहीत नसते मुळात तसा नसतोच मी

पण हे एक बरेच आहे ना मला जरी नाही तरी
त्यांना वाटणे की मी एक यशस्वी समाधानी तृप्त
जगासाठी जे करणे शक्य होते ते सर्व
करून झालेला आता फक्त मजेत जगावे बास
एवढेच शिल्लक असलेला असा एक सज्जन
निरुपद्रवी माणूस आहे त्यामुळेच तर कधीच नव्हता

जात माझा मूड अशा समाधानात मला राहता येते
--- ००० ---

## तो मीच आहे

तो मीच आहे शाळेच्या पोषाखात
पेन्सिलीला टोक करत झोपणारा
पण सर्व जखमांतून सहीसलामत
सुटल्याची स्वप्ने पाहणारा
दिलखुलास हसणारा आणि
भरभरून रडणारा नक्की चांगलेच होणार
याचा जप करणारा

नंतर मीच पाहिले बहिर्गोल भिंगातून
आणि दिले टाकून मला उगीचच
सारखे नको ते डोळे पाणावणे
दुःखाने वा देवाच्या आठवणीने म्हणून
आताही मला खात्री होती
सत्याला मरण असूच नाही शकत

पण त्यानंतर मात्र माझ्या
चेहऱ्याला तडे गेले
नाकाच्या जागी पाय आणि
सत्याच्या जागी नकार आला
नको तो भोंदूपणा
म्हणून मी सिनेमाची गाणीच
घेतली तत्त्वे पुसण्यासाठी

मला नाही आवडत आता
वाहून जाणे रममाण होणे
एखाद्या मानलेल्या प्रेमात

परात्मता आणि अविश्वास
इथे न पोचलेले मला
म्हणू लागले रुक्ष
त्यांच्या आग्रहासाठी माझे जगणे
थोडेच होणार होते एकसंध
--- ००० ---

तुझी जीभ

नक्कीच महत्त्वाची असलेली तुझी जीभ
थेट सापडते गेट वे ऑफ इंडियाला
तिच्या मैत्रिणीसह
तुला दुप्पट करणाऱ्या

तुझ्या जिभेचे हात
घेतात आईसक्रीम
तरुणाईचे
आणि आठवतात तुला
उंबरठ्यावरचे पहिले स्पर्श

आता उत्सुकता असते
माझ्या डोळ्यांना
तुझ्या भुवयांवर
असलेली फुलपाखरे
माझ्या खांद्यावर येण्याची

ती आहेत आता
नि:संकोच
हे असते माझ्या
संयमी मनातले सत्य

मी नुसती वाट पाहातो
अपेक्षित क्षणाच्या स्पर्शाची

आता जगात जणू फक्त
माझे मनच असल्याप्रमाणे

तेवढ्यात तुझ्या जिभेला
वाचा फुटते
--- ००० ---

सार्त्र

थकवून वा बधीर करून
शांतवू पाहतो आपण
कावटीत घोंघावत्या माझ्या

किंवा आपल्याला वाटते
पश्चात्ताप उपरती वा अपराधी भाव
आहेत धर्माची पहिली पायरी

आईच्या खुनानंतर इलेक्ट्रा झाली
नाजुक भयग्रस्त विवेकबळी
तिच्या माझ्या तोडत राहिल्या
तिच्या मेंदूचे लचके

प्रत्यक्ष तलवार तर तिचा
प्रिय भाऊ ओरिस्टीसची होती
तो तर थांबलाच नव्हता
त्या हिंसेच्या क्षणावरही

तो प्रवाही होता
पण प्रवाह त्याचा नव्हता
तो शांत होता
पण शांतता त्याची नव्हती

सार्त्र सांगत होता धर्म
सर्व धर्मांना
कोणत्याही बिंदूवर
थांबायला नका सांगू

भावनांचे अवडंबर
माजवणारे जग
चकित होऊन थांबले होते
--- ००० ---

कन्नी

अटक तर तुम्हाला
कधीच झालेली आहे
हे तुम्हाला कधीच कळले नाही
तरी काफ्का काहीच नाही म्हणणार
त्याने निवेदन
के ला कळल्यापासून
सुरू केले इतकेच

तसे त्याला माहीत होते
सुटकेपेक्षा न कळण्यातच
आहे इंटरेस्ट तुम्हाला
कारण ट्रायलला तुम्ही घाबरता

तो तर होता
कन्नी कापण्याच्या
कात्र्यांचा उत्पादक

म्हणून तर त्याने मृत्यूपूर्वी
सांगितले होते नष्ट होऊ द्या हे सामान
सुटका होऊन मस्त मरण्यापेक्षा
आपापल्या निवडीने मरतील लोक

अटक झाल्याचे न कळता
दु:ख भोगत राहणे
कधीही सुखाचे

अटक झाल्याचे तर कळावे
पण सुटकेची धडपड असू नये
हेच स्वातंत्र्य अटकेला ओलांडणारे
असा तर नसेल काही आशय

गोष्ट तर अपूर्णच आहे म्हणतात
--- ००० ---

मिडास

माझे आजोबा म्हणजे आईचे वडील
वडिलांचे वडील मी पाहिलेच नाहीत
ते कधी चार दिवसांसाठी आमच्याकडे येत
ग्लुकोज बिस्किटे आणि फटाके प्रथम
त्यांच्याचमुळे माहीत झाल्याचे आठवते

ते पहाटे उठत आणि कंदिलाच्या प्रकाशात
आई चुलीवर चहा करत असताना जुने काही
सांगत तिला त्यांच्या काहीशा घोगऱ्या पण
जाड आवाजात ते मला खूप आवडे मी मस्त
ऐकत बसे काहीशा उदास खुशीत तेव्हा मला
हा धोका नसे दिसत की साले हे सगळे
आपला स्वभाव घडवत जातेय

मी कविता लिहू लागलो तर सुरुवातीला
असे त्रासिक का येते सगळे असा मला प्रश्न पडे
असे क्वचितच काही लिहिले वा वाचले जाई
जे कुणाच्या वा कशाच्याही विरुद्ध नसे

काही वर्षांनी आले माझ्या लक्षात की विशेषत:
सकाळी उठल्यावर माझा एक स्थिर मूड चालू असतो
तो असतो माझा संपृक्त स्वभाव आणि आता मात्र
अशी स्वभावाने सुरुवात होणे हे मला त्रासिक वाटे
जणू पक्ष्यांचे आवाज आणि काहीशी थंडी
यांना मी ओपनच नसे मला प्रश्न पडे
कसली ही साली डांबून घेणारी खत्रुड सवय

ज्या क्षणी सापडले याचे रहस्य
तेव्हा मी स्वभाव सोडून उभा होतो
तुकाराम पुलावर आधी मला
स्वभाव छोटा सवयीचा जखडणारा
आणि कंटाळवाणा वाटे त्याचाच एक
त्रासिकपणा वाटे पण तो सोडण्याची भीतीही वाटे

आता खूपदा मी असतो मिडास राजा

मी नुसती लिहायला सुरुवात करतो कविता
जे येतील त्या शब्दांची कविता होते
असे मला वाटते हा शाप ठरूच नाही शकत

स्वभावच नसल्याने ओपन असते सगळे जग
पाहणे असते फक्त विरोधाशिवाय
--- ००० ---

पाऊस

पावसाच्या पाठीवर थाप मारून
मी म्हणतो चालू दे आता तुझे
आता मला जरा कामे आहेत

त्याचा आवाज येत राहतो
लहान मुले खेळताहेत बाहेर
या खात्रीत मी ईमेल्स पाठवतो

आवाज थांबल्यामुळे खिडकीतून
मी बाहेर पाहतो तर आता तो नसतो
तो होता याचे पुरावे मात्र असतात

त्याने थांबून आत डोकावून
माझा निरोप घेऊन जायला हवे होते
अशा विचारात त्याच्यामुळेच

समोर आलेली भजी मी
तोंडात टाकत गाणे म्हणतो
जिंदगीभर नही भूलेगी

पाऊस जिवंत कसा असेल
मी बोललो त्याच्याशी मी भजी खाल्ली
मी असल्यामुळेच तर तो होता

आता समाधानाने माझा एकटेपणा
मी आवरून घेतो कपाटात ठेवतो
तो पुन्हा येईल तेव्हा काढू बाहेर म्हणून
--- ००० ---

अनैतिकता

बी कॉम्प्लेक्सच्या गोळ्या घेऊन
कसा करणार सामना
क्षणाक्षणाला निर्माण होणाऱ्या
टनावारी तपशीलांचा गावागावात

हट्टेकट्टे बिल्डर लोकही
वाचत नाहीत यातून हे पाहता
हा एक बलदंड सांसर्गिक रोग आहे
एवढेही कळू नये का

फक्त निवडक तपशीलांचा
कमी ओझ्याचा प्रवास
ठरू दे अडाणी

निरर्थक उकिरडे जमवत
निरुपयोगी निष्कर्ष
मिरवत टीव्हीत रक्त तापवत
क्षुद्र विद्वान होण्यापेक्षा

सगळे डोक्यात भरणे
अशक्य आहे हे कळले तेव्हा
निवडीचे स्वातंत्र्य आपोआप मिळाले
काय आणि किती ते हातात आले

बजबजपुरीचा एकाकीपणा
हा प्रश्न लक्षात येताच
कविता मोकळी झाली

ती आता ना सौंदर्याला ना
राजकारणाला ना धर्माला बांधील राहिली
खुली अनैतिकता प्राप्त झाल्याने
ती डायरेक्ट जगणारीच झाली
--- ००० ---

नोबेल

तो शर्टपँट घालून बारला जाई
त्याला आवडणारे टेबल पकडून
तो विदेशी मद्य मागवे
सोबत त्याला बटाटा वेफर्सच लागत
लौकरच कंपनी द्यायला
त्याचे तीन चेले येत

जागतिक साहित्याचा अभ्यासक
म्हणून त्याला मान्यता होती
पण त्याला अतिवास्तव वा असंगत
हे कळतच नसल्याने त्याला तो फडतूस म्हणे

तो बटरचिकन मागवे त्याचे चेले
पिझ्झा मागवत मग मात्र
त्याचा पिरीयड सुरू होई
मराठीतल्या सर्व लेखक कवींची एक्झेड
करत तो देशीवाद हाच अंतिम असल्याचे
झोडत राही सोबत त्याला कळणारे आणि इथल्या
मातीतल्या वास्तवाचे दोन भोक्ते तो गौरवाला घेई

चेले विचारत एक सांगा
भाषांतर किंवा अनुवाद किंवा अनुसर्जन
किंवा रूपांतर करावे की करू नये
इथे तो जरा गडबडे याला नकार द्यावा
तर आपण मराठीतच कुजून जाऊ
आणि नोबेलची शक्यताच मावळेल
या विचाराने तो मंद हसे
पण आज बोललेले उद्या विसरायचे
एवढेच नव्हे तर जे हवे आहे त्याला शिव्या द्यायच्या
हाच मार्ग पत्करायचे तो ठरवे

आपले जे असेल ते मराठीतच व्हावे त्या नोबेलच्या
वशिलेबाजीची आपल्याला गरज नाही असे तो म्हणे
--- ००० ---

## सहावा रविवार

सहावा रविवार म्हणून
मोडक्या खुर्चीला अग्नी दिला
मग खुशाल पडू दिले दव
उगवत्या ताऱ्यावर
उगीचच कोणते फूल
स्वत:हून म्हणेल की अमुक
सिनेमाला जाऊ या

इथे कोणत्याही झुरळाला
भाकरीची किंमतच
कळलेली नाही आणि तरीही
पाणीपुरवठा दोन दिवस
बंदच राहणार असल्याने
सर्वांनी पत्त्यांचे डाव मांडले

अर्थ लावण्यासाठी
आणलेले पिस्तूल
अहिंसक निघाले
त्यामुळे आता परदेशातून
अत्तर मागवणे भाग होते

नाही तर मग मोहिते
म्हणाले तसे निवडणुका
स्थगित ठेवून आजच द्यावी
परवानगी मादक द्रव्यांना
जाऊ देत मग बोंबलत
सगळे ड्रायव्हर्स

अर्थपूर्ण असण्याचे दिवस
संपले आता आता सत्याचे
अमर्याद क्षेत्र बघा नवे
आजवर दडपलेले
--- ००० ---

## उद्विग्न

उद्विग्न या शब्दाचे काय एवढे
मला कबूलच आहे की मी पुरेपूर
जाणतो या शब्दाचा अर्थ
जो असलेला एक शब्द लागतोच भाषेत
हाच खरे तर एक अनाकलनीय
चमत्कार असतो पण मी तुम्हाला
त्याहून भारी असा सांगतो
एक चमत्कार तो असा की
असे काही क्षण असतात माझ्या जगण्यात
की खरोखरच मी अजिबातच नाही
जाणत हा शब्द मनात त्याचा अर्थ जागवत
एकाच माणसात हे दोन्ही कसे असेल
हा प्रश्न समर्थनीय आणि वैध आहेच
पण तरीही वाटल्यास सध्या
असेल बाबा असे म्हणत थोडा
विश्वास दाखवत मनातून हे
नाकारलेत तरी चालेल

एखाद्या शब्दाचा अर्थ कळू शकतो
आणि त्याचाच अर्थ नाहीही कळू शकत
असे का अशक्य वाटते तुम्हाला

आले लक्षात जी स्मृती आहे
तिच्या त्या साठ्यासहच असणार
सारखे जगणे हे तुमचे ठरलेले आहे

मी पटवून काहीच देऊ नाही शकणार
कारण जेव्हा या शब्दाचा अर्थ
माझ्या दृष्टिपथातच नसतो
तेव्हाही खरे तर मी जागा असतो स्वच्छ
पण तुम्ही खुशाल समजा
की मला तात्पुरता स्मृतिभ्रंश होत असावा किंवा
एकूणच ही एक बंडल असावी वा माझा भ्रम असावा
--- ००० ---

साठोत्तरी

काहीही कारण नसताना सूर्य
येतात जातात येतात जातात
विचाराने दिलेले कोणतेही अर्थ
हिंसाच घडवतात हे दिसल्यावर
हिंसेला जीवनतत्त्वच मानायचे ठरते
उगीचच खोटे खोटे अहिंसक
होण्याच्या प्रयत्नात
नको शक्ती वाया घालवायला असे ठरते

मग हसत खेळत खून करावेत
संध्याकाळी पार्ट्या कराव्यात
हे रूटीन मान्य होऊन जाते

अहिंसा म्हणजे न मारणे शारीरिक
वा मानसिक दुखापत न करणे
याचा निष्कारण बोलबाला करणारे
काही लोक असत पूर्वी त्यांना
संत महात्मे वा अगदीच घाण
म्हणजे आध्यात्मिक म्हणत
असे शिकवले जाई सुमारे
२०६० नंतर म्हणजे साठोत्तरीच ना

विद्यार्थी हसत म्हणत आता कसे टेन्शनच नाही
है तो है नही तो नही समस्याच नाही काही आता
--- 000 ---

उगीचच डोकी

तुझी बारीकसारीक अस्वस्थता
कुठे करत बसतोस या टीव्ही चर्चेचा विषय
त्यापेक्षा काल तू ओकून ठेवले आहेस पायरीवर
ते पुसून घे आणि आधी दूध घेऊन ये

खरे तर ओकणाऱ्या माणसाने खाद्यपदार्थ
आणलेले मला आवडत नाहीत
पण तुझ्या संगीतसाधनेला
माझ्या ओंकारसाधनेचा त्रास तू चालवून घेतोस
म्हणून मला कृतज्ञ राहावे लागते

आपण एकाच गल्लीत लहानाचे मोठे झालो
मी नीटनेटके कपडे घालायला महत्त्व दिले
तर तू अंधारात बसून जगाचे धागे उसवत राहिलास

मी कधीच आक्षेप नाही घेतला
तुझ्या आत्मप्रौढ जबाबदाऱ्यांना
उलट लोकांनाही सांगितले की याच्याशिवाय
वस्तुसंग्रहालये ओस पडतील

हे जणू काही तुझे हक्काचेच होते
असा तू तुला हवे ते बल्ब शोधत बसलास

मी तुला अनेकदा सांगितले
तुझ्या यशापयशाशी मला देणे ना घेणे
मी कशाला तुझ्या बॉसचे कान फुंकेन
किंवा तुझे डिपॉझिट जप्त व्हावे म्हणून
पवारांची भेट घेईन

तू माझ्याबद्दल विचार करण्यात किंवा
मी तुझ्याबद्दल विचार करण्यात
वेळ न घालवणे बरे उगीचच डोकी
व्यग्र ठेवणे हा मूर्खपणा आहे
--- ००० ---

दोन मेणबत्त्या

आमच्या मोठ्या साहबांनी
शाळेतल्या अमर काणेकरांच्या
दोन मेणबत्त्या आणल्या समोर समारोपात
दुसऱ्यासाठी जगणे हेच श्रेष्ठ ते म्हणाले
मी माझे चिवडा खाणे लपवले
कारण आभारप्रदर्शन माझ्याकडे होते
मी तुतारी वाजवूनच सुरुवात केली आज
साहेबांनी अत्यंत सूत्रबद्धपणे आपल्याला
कामात आणि जगण्यात उपयोगी पडणारे
अविश्वसनीय तेजाचे मार्गदर्शनच केलेले असून
आपण सुदैवाने इथे आहोत नोकरीत म्हणूनच
आपल्याला हा लाभ झालेला आहे हे आपल्याला
कधीच विसरता येणार नाही आज साहेब जिथे आहेत
तिथे ते पोचेपर्यंत कोणते वाक्य त्यांना सतत प्रेरणा देत होते
ते आज त्यांनी काहीही हातचे राखून न ठेवता आपल्याला
उघडपणे स्पष्टपणे आणि प्रांजळपणे देऊन टाकलेले आहे
अशा अर्थाचे काहीसे भावविव्हल ( असू दे हा शब्द
चुकीचा असला तरी ) बोलून मी टाळ्या घेतल्या
हसत माझे मित्र मनात म्हणाले चतुर आहे साला
शिवाय त्याला भाषा बरी येते आणि न घाबरता
बोलता येते खोटेही अत्यंत प्रामाणिकपणे
चेहरा सद्गदित ठेवून स्वत:चे सत्य बोलत असल्याप्रमाणे

उगीचच कशाला कोण हुशारी दाखवेल आणि नोकरीत तर
सेफ खेळणे कधीही चांगलेच की आणि कवितेतही मीच जर
इतरांच्या कविता फेटाळू लागलो तर माझे काय होईल
आणि व्यवहारातही प्रियम ब्रूयात ना काय फरक पडतो

सत्कारांना हजर राहा गौरवाची भाषणे करा काय
फरक पडतो च्यायला तेव्हा हसू आले पण साले खरेच
आहे ते सूत्र तुला जगायचे असेल तर आधी
दुसऱ्यांसाठी जग आणि नाही तरी बोंबलायला
तुला तरी काय एवढे मोठे खास कळतेय समझ जाओ
--- ००० ---

मापाचे कपडे

उद्याचे उद्या पाहू
असे म्हणायची ताकदच नव्हती
एकदा वरची स्लॅब झाली की
भिंती भराभर होतील
असे फवारे उडत राहणारच होते
मनात आत्मविश्वासाचे आणि
कष्टपूर्वक कृतकृत्यतेचे

राजकीय सत्ताबदलाची
इतकी घाई नव्हती आणि अनुभव
असा होता की झाले आता ते काम
असे तिकडे बरोब्बर आपल्या
मापाचे कपडे कधीच होत नसतात
व्हावा काही चांगला बदल
आणि आयुष्यभर आता घडेल
काही चांगले असे वाटत राहावे की बास

शिवाय आयुष्य असे आले वाट्याला
की खूप सडेतोडपणाची भीती
तर वाटलीच पण त्यातल्या
निर्भय लोकांची किळसही वाटली
जणू कोणते ना कोणते सरकार
सारखेच यांच्या पँटी फाडत असते
आणि यांचे बरे दिवस भविष्यातच
असतात पण तशाच आशेला भुलून
लोकांनी मते दिली तर मात्र ते चडफडत

आपण कसले शोध नाही लावत
आपण कलेतही खुजेच राहतो
आपल्याला अजून काहीच नाही जमले
आपण सारखे वाया जात राहतो असे ते म्हणत

असे म्हणणे ते एंजॉय करताहेत असे मला वाटे
--- ००० ---

## तीन मार्ग

मला माहिती आहेत तीन मार्ग
उन्हाखालच्या अंधारात पोचण्याचे
पण कोणता वापरावा
याचा नेहमीच गोंधळ होत असल्याने
मी भेदूच नाही शकत
हे उत्फुल्ल प्रकाशाचे कवच

अंधारात नीट पोचल्याशिवाय
माझ्या पूर्ण आयुष्याची कागदपत्रे
हातात येत नाहीत
आणि अर्धवट कटिंगचा उपयोग नाही
उलट ते बेढबच दिसेल
म्हणजे प्रयत्न केला होता याचा पुरावाच
अपयशाचा उद्घोष करणारा

म्हणून मी उन्हाला सांगून ठेवतो
कुणी यशस्वी होणारा आला तर मला उठव
संकोच नको करूस

खरे तर असे अनेकदा घडते
मला उठवायचे राहूनच जाते
किंवा तसा यशस्वी होणारा
कुणी येतही नसेल आणि उन्हावर
तसे रागावताही येत नाही
तसे निष्पाप आहे बिचारे ते

म्हणून मी आता दिवसा
फारसा झोपतच नाही
रात्री अंधार सहजच उपलब्ध असतो
तरी पुन्हा त्या तीन मार्गांचा
गोंधळ असतोच

माझ्या नशिबातच नसावे सत्य हेच खरे
--- ००० ---

## घटना

घटना किती सांगणार मेकप
करून कवितावाचनाला गेलेल्या सुंदर स्त्रिया
आणि सभेच्या बंदोबस्ताला
पाठवलेल्या पोलिसाने स्वत:च भाषणात गुंगून जाणे
असे तर घडतच असते

हे बघा असे घडले ते बघा
किती वाईट किती माणुसकीहीन
असे करत करत मने जात राहतात
प्रेम जिव्हाळा राग द्वेष कळवळा सहानुभूती
अपराधी भाव स्वत:ला कळण्या-जाणवण्याचा श्रेष्ठत्वभाव
यांतून

असे घडावे आणि असे घडू नये हे समजण्याच्या
समाधानाची संस्कृती विस्तारत राहते
बरे वाटत पटणारी रहस्ये गवसत गवसत
--- ००० ---

मुंबई-पुणे पेपर टॅक्सी

बरीच जुनी आहे गोष्ट एकदा मी
मुंबई-पुणे पेपर टॅक्सीने आलो होतो रात्री
खूप फास्ट ड्रायव्हरला पेपर वाटप करत जायचे
काम असे तो सांगत असणार कुठे कुठे मी
अडीच तासांत टच करतो पुणे
त्याला नोकरी मिळावी अभिमान वाटावा
आणि मला जाता यावे म्हणूनच जणू
हे पेपर पोचवायचे काम असे

रात्रीच्या अंधारात भराभर दिवे मागे पडत
आणि मग रावेत मार्गापासून सुरू होई
झटपट वाटप कुठे दहा कुठे पन्नास कुठे पाच
कुठे एखाद्या ठरलेल्या कट्ट्यावर कुठे
एखाद्या बंद दुकानाच्या फळीवर
जिथे पन्नस शंभर असत तिथे मिनिटभर थांबून
तो ते ठेवे आणि पुन्हा फास्ट निघे

असे करत गाडी पोचे स्वारगेटला
तिथे उभ्या असत पहाटेच्या वाफमय चहागाड्या
जाऊ दे आता घरीच तर जायचेय म्हणून मी
रिक्षा पकडे घरी पोचून चहा घेऊन
जरा काढावी झोप म्हणे तेव्हा विचार येई आता
मी झोपत असताना जागे होत असतील
उद्याच्या बातम्या निर्माण करणारे कर्तृत्ववान लोक
किती एकमेकांसाठी कष्ट करतात सगळे लोक

झोप येतायेता मला विश्वदर्शनच होत गेले
सगळे संघर्ष डावपेच युद्धे आणि प्रकाशन समारंभ
घडलेच नसते तर एवढे मोठे पेपर चालले कसे असते
आणि मला कशी मिळाली असती पेपर टॅक्सी

तिकडे सुरू झाले असेल वाटप आणि विक्री आणि लोक
चहा पीत वाचत असतील त्यांचे त्यांचे पेपर या विचारात मला झोप लागली
--- ००० ---

गुरुकिल्ल्या

बघा किती वाईट आहे जगणे
ही माझी पहिली कविता
बघा किती वाईट आहे जगणे
ही माझी सतरावी कविता
बघा किती वाईट आहे जगणे
ही माझी बत्तीसावी त्रेपन्नावी
बाहत्तरावी आणि एकोणनव्वदावी कविता

येतेय ना लक्षात मी सांगतोय
कारण मला माहीत आहे
चांगले म्हणजे काय ते
आणि माझ्याशिवाय इतरांना ते कळत नाहीय हेही

बघा हे किती वाईट आहे ते
आणि तुम्ही नुसते माझ्या या
कवितांचा आस्वाद घेत वाह म्हणताय तेही
आणि कुणी माझ्याकडे नीट लक्ष देत नाहीय तेही

पण हरकत नाही सध्या
तुम्हाला माझ्या कविता ग्रेट वाटणे ही पहिली पायरी आहे
मी आशावादी आहे त्यावरच तर मी मस्त पेय घेत
पोषक आहार घेतो काही क्षण ते वाईट विसरत नेटाने
मला अकादमी मिळणे हे माझ्या कवितेचे यशच आहे

विषमता दु:ख अन्याय
आणि मुस्कटदाबी म्हणजेच स्वातंत्र्यसंकोच
हे नष्ट झाल्याशिवाय काहीही चांगले
होऊच नाही शकणार हे का कळू नये कुणाला

खरे तर खूप साधे आहे सगळे सगळ्यांचे
स्वभाव माझ्यासारखे करणे माझ्या कविता
म्हणजे एक प्रकारच्या मी दिलेल्या
गुरुकिल्ल्याच आहेत मला तरी शंकाच नाही
--- ००० ---

प्लॅन

पटतेय मला तुमचे आम्ही तुमच्याबरोबर
नाही आलो तर तुम्ही आमचे
खूप नुकसान करू शकता पण मी
तुम्हाला वेगळा सांगतोय प्लॅन
आत्ता आमचे सभासद हितचिंतक यांना
डिस्टर्ब नको करायला आमचा तुम्हाला म्हणजेच
आपला एकमेकांना उपयोग होण्यासाठी
आमची शक्ती कमी होऊन चालणार नाही

सध्या आम्हाला त्यांच्याबरोबरच राहू द्या
त्यांची ताकद वाढू नये याची आम्ही काळजी घेत राहू
एकदम निवडणुकीच्या वेळी असे काही घडवू
की आपल्याला एकत्र येता येईल म्हणजे मग
त्यांना चेपणे सोपे जाईल सध्या आम्हाला
तुमच्या विरोधातच राहू द्या फार तर तुम्हीही
आमच्या विरोधी काही करत राहा पण नंतर
ते टोकाला जाणार नाही हे पाहू

हे आज आपण भेटलो ते
शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी असे म्हणू
पण फार तर दोघेही
एकमेकांच्या विरोधाची धार जरा बोथट करू
एखादे काही चांगलेही बोलू एकमेकांबद्दल
म्हणजे आपल्या एकत्र येण्याचा धक्का
त्या वेळी जरा कमी बसू शकेल

बाकी तुमचे आमचे विद्वान आपण जे जे
करत राहू त्याचे समर्थन करतच राहतील
काही असतील स्वत:ला निस्पृह समजणारे
ते फार तर आम्हाला विश्वासघातकी म्हणतील
त्याने फारसे काही बिघडत नाही

शेवटी मतदार संभाळणे महत्त्वाचे विद्वान नव्हे
--- ००० ---

नोमथोम

नोमथोममध्येच पिचलेली
बुरसटलेली कविता ( कान धरून
आमचे गुरू पठडे बहादूर यांची आहे ही बंदिश
म्हणजे बांधलेली नव्हे बांधून ठेवणारी -- )
तर नोमथोम खूप ट्रॅफिक
दु:खात लडबडलेला तुम्ही चेहरे असे करा की
अत्यंत सचिंतपणे तुम्ही पाहाताहात
एक चित्रप्रदर्शन खूप गंभीर काळवंडलेले
( बघा जमवून एका सांस्कृतिक उंचीवर गेल्याचा
येईल अनुभव चेहरे तसेच मुरगाळत न्या -- )
सिग्नलला थांबलेली वाहने प्रचंड धूर
ओकणारी न जळलेल्या आठवणींचा
( गुरू म्हणत बसल्या जागी वेदनेने
मृत्यू पावत असल्याची भावना हवी -- )
तडफडीत लाडावून जा तिलाच शरण जा
तिलाच भोसका कातरा गुदमरवा पेटवा
दु:खानुभवाने स्तिमित व्हा पिंजारा केस वेडे व्हा
( आमचे पठडे बहादूर – क्या बात है -- )
--- ००० ---

देशीवाद

एक लक्षात घ्या
वेदकाळात हे असे नव्हते
महाभारत काळातही
स्त्री-पुरुष संबंध
जखडलेले नव्हते
अशोक घ्या चंद्रगुप्त घ्या
तेव्हाही नव्हते हे प्रश्न
बुद्ध काळ जैन काळ
हेही तसे निष्कलंकच होते

औरंगाबादच्या जमदाड्यांकडे
सापडलेय एका डच माणसाचे पत्र
त्यावरचा मजकूर
आणि शिवाजीमहाराजांच्या
सैन्यात असलेल्या
महादू अफगाण
याने त्याच्या प्रेयसीला लिहिलेल्या
पत्रातला मजकूर
या दोन्हींतही
त्या वेळी फरीदाबादला
असलेल्या एका तळ्याचे उल्लेख आहेत

इंग्रजांच्या काळातच सगळे बिघडले
खरे तर पोस्ट आणि रेल्वे हे काही
इतके अवघड वा खास काही नव्हते काम
त्यांनी केलेली इथली लूट अत्यंत
अन्यायी आणि अमानुष होती

हे सगळे विचारात घेतले तर
देशीवादाचे महत्त्व वेगळे सांगायची गरजच नाही
देशीवादानेच आपल्यांतल्या सगळ्या त्रुटी जातील
देशीवादच आपल्याला बाह्य आक्रमणांपासून तारेल
साने गुरुजींनी तर म्हणूनच ठेवले आहे की .....
--- ००० ---

घशाला कोरड

गच्ची. संध्याकाळची वेळ. शेजारी आणि त्याची छोटी मुलगी.
तिथे कसले नळकांडे होते कोण जाणे. त्यावर असणारे
मिठाईवर असते तसे जाळीचे झाकण तिने उघडले.
आणि ती आत डोकावली तर, वाटलेच होते, ती
कोसळीच आत. धावत जाऊन पाहिले तर बारीक बारीक
होत होत ती खोल कोसळत होती वेगाने.
इतकी खोल कुठे आहे ही इमारत ?

खरे तर मित्राची मुलगी अशी अपघातात गेल्यावर
मी लगेच तिकडे जाणे महत्त्वाचे होते. एक मित्र मला
त्याच्या स्कूटरवरून सोडायला तयार होता. पण माझ्या हातात
लाँड्रीत द्यायचे कपडे होते. ते टाकून पुढे जावे तर
दुकाने सगळी बंद होती, रात्र झाली होती आणि पुन्हा मागे घरी
जाऊन येण्यात वेळ खूप गेला असता. मित्र म्हणाला रस्त्यावरच
त्याच्या एका मित्राचे घर आहे तिथे ठेवून जाऊ. एवढ्या रात्री कोण
म्हणून ते घाबरलेच होते पण तरीही दार उघडून कोव्हिडच्या भीतीने
ठेवा तिकडे कडेला म्हणाले. मग उगीच त्यांनी पाणी विचारले.
आम्ही नको म्हणून बाहेर पडलो. खरे तर ते कपडे
रस्त्यात टाकून देऊन तसेच पुढे जायला हवे होते.

घशाला कोरड पडली होती
पण इलाज नव्हता.

नकोच सध्या तरी तो अपराधी भावाचा विचार
असे वाटत असतानाच एक आले लक्षात, अमुक एक
नको विचार असे तर कदापि नाही करता येत.
नको तर काहीच नको म्हणावे लागते.
मेंदूशी जोडलेली नाळच तोडावी लागते.

तसे केले आणि जाग आली. तहान लागली होती.
आणि विशेष म्हणजे कंबरदुखी खूपच गेलेली होती.

मित्राची मुलगी अर्थातच सेफ होती. तरीही त्याला फोन केला.
--- ००० ---